महाभारत
कथारुप

Sanskruti Samvardhan Pratishthan
संस्कारेणैव हि संस्कृति

नैतिक शिक्षण योजना

ज्यांच्या अमोल सहकार्यामुळे नैतिक शिक्षण योजनेचा हा उपक्रम यशस्वी होत आहे आणि संस्कारक्षम वयात मुलांना रामायण, महाभारताची गोडी लागत आहे. अशा सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळासंचालकांना...

कृतज्ञतापूर्वक धन्यवाद!

लेखिका :
श्रीमती ज्ञानदा नाईक

***

प्रकाशक :
श्री. मोहन सालेकर
संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान
७२/२, खटाव टेरेस,
डॉ. एस्. एस्. राव मार्ग,
लालबाग,
मुंबई - ४०० ०१२.
दूरध्वनी - ०२२-२४७१७६८६

***

मुखपृष्ठ व सजावट :
श्री. चंद्रशेखर जोशी

संपादक मंडळ
डॉ. श्रीमती कीर्तिदा मेहता
डॉ. चारुशीला ओक
श्रीमती अलका गोडबोले

प्रथम आवृत्ती :
दि. १९ जुलै, २०१६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन
सहयोगी मूल्य : रु. १५०/-

मुद्रक :

प्रस्तावना

बालवयातले संस्कार आपल्या अवघ्या आयुष्याला वळण देतात असे म्हटले जाते. हिंदुस्थानातील संस्काराची गंगोत्री म्हणजे **'रामायण'** आणि **'महाभारत'**. या दृष्टिकोनातून संस्कृति संवर्धन प्रतिष्ठानने **'नैतिक शिक्षण योजना'** हा उपक्रम योजला आहे. रामायण आणि महाभारतातील जीवन आदर्श मुलांच्या मनात रुजावेत हा मूळ हेतू आहे.

संस्काराचा विषय निघाला की जिजामाता आणि बालशिवाजी यांचे उदाहरण नेहमी दिले जाते. रामायण महाभारतातील कथा सांगून जिजाऊने बालशिवाजीची जडण-घडण केली. मग आपल्या मनात अशी शंका येते की इतक्या मुलांना त्यांच्या मातांनी या गोष्टी सांगितल्या पण शिवाजी एकच घडला असे का? हा फरक गोष्ट सांगण्याच्या पद्धतीतला आहे. रावण, कुंभकर्ण, सुबाहू, मारीच यांचे वर्णन करताना आजही असे अनेक राक्षस सभोवताली दिसत आहेत. त्यावेळी अशा राक्षसांचा निःपात करणारा राम तयार झाला हे दाखविणारी जिजाऊ एकटीच होती. 'आजही भोवती कंस आणि जरासंध आहेत. त्यांना मोडून काढणारा कृष्ण तू का नाही होणार? तुला कृष्ण व्हायला हवे.' असा आग्रह जिजाऊने धरला. म्हणूनच अन्यायाविरुद्ध उठणारा, स्वराज्यासाठी तळमळणारा शिवाजी ती गोष्ट घडवू शकला.

आजही रामायण, महाभारतातील कथा, शिवचरित्रातील आणि क्रांतिकारकांच्या कथा केवळ मनोरंजनासाठी न सांगता अशा तळमळीने सांगितल्या, तर त्या ऐकणारी पिढी भावी इतिहासावर सुवर्णाक्षरांनी आपली नावे कोरणारी निपजेल यात शंका नाही. संस्कृति संवर्धन प्रतिष्ठानचा हा प्रयत्न हे त्या दिशेने टाकलेले छोटसे पाऊल आहे.

या पुस्तकाच्या लेखिका श्रीमती ज्ञानदा नाईक यांनी आजचा विद्यार्थी डोळ्यासमोर ठेवून कथा लिहिल्या आहेत. प्रत्येक कथेच्या शेवटी शब्दकोडी अथवा तत्सम स्वाध्याय दिला आहे. त्यामुळे विद्यार्थी या कथा अधिक समजून वाचतील. त्यावर विचार करतील. चित्रकार श्री. चंद्रशेखर जोशी यांनी प्रत्येक कथेचे चित्र अगदी विचारपूर्वक काढले आहे. प्रतिष्ठान या दोन्ही मान्यवरांचे ऋणी आहे. या पुस्तकाच्या निर्मितीत श्रीमती शब्दगंधा कुलकर्णी यांचेही मोलाचे सहकार्य आम्हाला लाभले आहे. या कार्यात सहकार्य करणारे सर्व शाळा संचालक, शिक्षक, पालक आणि देणगीदार यांचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतो. पुस्तकातील म जकुराविषयी, पुस्तकाच्या मांडणीविषयी सूचनांचे स्वागत आहे. पुढील आवृत्ती अधिक चांगली करण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

धन्यवाद!

मोहन सालेकर
विश्वस्त सचिव
संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान

अनुक्रमणिका

१	महाभारत	१
२	राजा शंतनू	५
३	भीष्म प्रतिज्ञा	९
४	कर्णजन्म	१३
५	पांडवजन्म	१६
६	कौरवजन्म	१९
७	श्रीकृष्णजन्म	२२
८	पांडवांचे शिक्षण	२६
९	लक्ष्यवेध	२९
१०	भीमावर विषप्रयोग	३५
११	अमृतकुंभ	३८
१२	कंस वध	४१
१३	अंगराज कर्ण	४४
१४	द्रुपदाचा पराभव	४७
१५	पांडवांची ज्वालासमाधी	५०
१६	बकासुरवध	५४
१७	मत्स्यवेध	५७
१८	शिशुपाल वध	५९
१९	मयसभा	६३
२०	द्यूत	६५
२१	दिव्यास्त्रप्राप्ती	६८
२२	यक्ष प्रश्न	७१
२३	अज्ञातवास	७६
२४	दानशूर कर्ण	७९
२५	श्रीकृष्णाची मदत	८२
२६	कुरुक्षेत्र	८५
२७	भगवद्गीता	८८
२८	चक्रव्यूह	९१
२९	कर्णाचा पराभव	९४
३०	युद्ध संपले	९७
३१	अश्वमेध	१००
३२	श्रीकृष्णायन	१०३

१. महाभारत

'महाभारत' हे नाव तुम्ही अनेकदा ऐकलंय. भीष्म, कृष्ण, पांडव, कौरव, द्रौपदी अशी नावंही माहित आहेत तुम्हाला. पण नेमकी गोष्ट मात्र माहित नसते. कुठे एखादं गोष्टीचं पुस्तक, कधी कुठली तरी दूरदर्शनवरची मालिका, आजी आजोबांनी सांगितलेल्या गोष्टी, यातून आपल्या मनात एक कहाणी निर्माण होते. प्रत्येकाची स्वत:पुरती एक कहाणी. म्हणजे, ज्याचं त्याचं वेगळं महाभारत.

पण असं कसं चालेल? खरं महाभारत कोणी, केव्हा, कसं आणि का रचलं, हे जाणून घ्यायलाच हवं ना. त्यातल्या मूळच्या कथा वाचायलाच हव्यात.

व्यास ऋषींनी महाभारत रचलं, असं आपण सर्रास म्हणतो. पैकी, 'रचलं' हा शब्द अगदी चुकीचा. 'रचलं', म्हणायला, काही ती व्यासांच्या कल्पनाशक्तीतून घडलेली 'काल्पनिक' गोष्ट नाही. खऱ्याखुऱ्या घडलेल्या गोष्टी व्यासांनी शब्दबद्ध केल्या, असं म्हणता येईल.

थोडक्यात, कुरुवंशातल्या काही घडामोडींचा इतिहासच व्यास सांगत आहेत. महाभारत हे काही नुसतं काव्य नाही, तर तो इतिहास आहे, हे लक्षात ठेऊनच ते वाचले पाहिजे.

कुरुक्षेत्र नावाच्या युद्धभूमीवर कौरव आणि पांडव यांचं, म्हणजे सख्ख्या चुलत भावाचं मोठं युद्ध झालं. अठरा दिवस चाललेल्या या युद्धात अखेर पांडवांचा 'जय' झाला. युद्धात विजयी झालेल्या राजाच्या पराक्रमाचे पोवाडे गायला कुणाला नाही आवडणार? मग व्यास ऋषींनी या युद्धाचा इतिहास गोष्टीरूपानी सांगितला. तुम्ही कशा लहानपणी शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकल्यायत, तशाच या गोष्टी होत्या. युद्धाचे सेनापती कोण, सैनिक किती, सैन्याची रचना कशी होती, शस्त्र कोणकोणती वापरली, कुणी कुणाला मारलं आणि मुख्य म्हणजे, शेवटी पांडवाचा कसा 'जय' झाला. त्याबद्दलच्या ज्या गोष्टी व्यासांनी लिहून एकत्र केल्या, त्याचं नावही त्यांनी 'जय' असंच ठेवलं. तसा छोटासाच ग्रंथ होता तो ८ - ९ हजार श्लोकांचा.

पुढे शे-दीडशे वर्षांनी, पांडवांचा पणतू राजा जनमेजय ह्यानं आपल्या पूर्वजांचा हा 'जय' नावाचा गोष्टीरूप इतिहास ऐकला. पण त्याच्या मनात शंभर प्रश्न आले. व्यासांच्या परंपरेतले एक ऋषी, वैशंपायन, हे या कुरुवंशाचे कुलपुरोहित होते. जनमेजयानं त्यांना विचारलं, ''पण गुरुवर्य, हे युद्ध का झालं?'' ''अरे, राज्य कुणाचं, या मुद्यावरुन!'' ''मग ते आधीच का

नाही नीट ठरवलं?'' ''कारण तेव्हा पांडव वनवासात होते ना, म्हणून'' ''पण इंद्रप्रस्थाचे राजे असूनही वनवास का?'' ''ते द्यूतात हरले. त्याची अटच होती तशी.''

जनमेजयाचं काही समाधान होईना. त्याला या पूर्वीच्या इतिहासाबद्दल कुतूहल होतं. आपल्या घराण्याचा इतिहास जास्त तपशीलवार जाणून घेण्याची उत्सुकता होती त्याला. शेवटी वैशंपायनांनी त्याला सगळी पार्श्वभूमी सांगायला सुरुवात केली. अगदी राजा भरतापासून (ज्याच्या नावावरुनच आपला देश 'भारत' म्हणून ओळखला जातो) आरंभ केला त्यांनी. मधेमधे जनमेजयाचे प्रश्न चालूच होते:

''गुरुवर्य, राजसूय का करतात?''

''मयसभा म्हणजे काय?''

''अज्ञातवासात पांडवांनी कोणाचा वेश घेतला?''

''श्रीकृष्ण त्यांना कधी आणि कसा भेटला?''

त्याच्या प्रश्नांना उत्तर देताना वैशंपायन त्याबद्दलचा इतिहास गोष्टीरूपांनी सांगायला लागले. हां हां म्हणता बऱ्याच गोष्टी वाढत गेल्या. आता काही हा फक्त युद्धाच्या अठरा दिवसांचं वर्णन असलेला ऐतिहासिक पोवाडा नव्हता, तर संपूर्ण कुरुवंशाच्या, भरतवंशाच्या इतिहासाची ती बखर होती. चांगलीच वाढ झाली होती श्लोकसंख्येत आता जवळ जवळ २४ ते २५ हजार श्लोक झाले. भरतांचा इतिहास आला यात म्हणून याचं नाव पडलं, ''भारत''.

आताच्या आधुनिक युगात या गोष्टी समजणं अवघड आहे की एखाद्या ग्रंथात अशी भर पडतेच कशी! उत्तर सोप्प आहे. त्या काळी अर्थातच छापलेली पुस्तकं नव्हती. हातानी लिहिलेले, ज्याला हस्तलिखित म्हणतात, ग्रंथही तसे कमीच. सगळ्या गोष्टी 'सांगायच्या' आणि 'ऐकायच्या'. याला मौखिक परंपरा म्हणतात. मग सांगणारा थोडी भर घालून सांगतो, ऐकणाराही ही गोष्ट दुसऱ्याला समजावून सांगताना आणखी थोडे तपशील किंवा माहिती पुरवतो आणि शेवटी, श्लोकसंख्या वाढत वाढत 'जया'चं 'भारत' होऊन जातं.

दोन तीनशे वर्षानंतरची गोष्ट. शौनक नावाच्या ऋषींनी 'द्वादशसत्र' नावाचा एक मोठा यज्ञ करायचं योजलं. संपूर्ण भारतवर्षातून विद्वान आले, पुरोहित जमले, याज्ञिक गोळा झाले. दिवसभर होम हवन करुन संध्याकाळी सगळे जण एकत्र यायचे. गप्पागोष्टी चालायच्या. कधी वादविवाद व्हायचे. ज्ञानाची देवाणघेवाणही चालायची. आपापल्या भागातल्या घडामोडी इतरांना सांगितल्या जायच्या. अशातच एक दिवस कुणीतरी म्हणालं. ''मागे कुणीतरी मला

असं सांगितलेलं आठवतंय की चारेकशे वर्षांपूर्वी तिकडे उत्तरेला फार मोठं युद्ध झालं होतं. खूप माणसं मारली गेली. पांडव की कोण ते जिंकले वाटतं. माहित आहे का कुणाला याबद्दल?''

बहुतेकांच्या चेहेऱ्यावर प्रश्नचिन्हंच होती. कुणालाच फारसं काही धड माहित नव्हतं. पण एका व्यक्तीचा चेहेरा मात्र उजळलेला होता. ती व्यक्ती होती राजदरबारातील 'सूत' म्हणजे 'भाट'. राजाच्या दरबारात रोज उपस्थित रहायचं. घडतंय ते नीट बघायचं आणि मग त्यावर आधारित असं राजाचं कोडकौतुक करणारं कवन, म्हणजे कविता रचून ते गायचं, हेच त्याचं काम. हे भाट दरबारात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे साक्षीदार असल्यामुळे एका अर्थाने इतिहासकारच म्हणायला पाहिजेत.

ह्या भाटांचे नावही मोठं भारदस्त होतंः उग्रश्रवस लोमहर्षणि. त्याचा चेहेरा उजळला आणि तो म्हणाला. ''अश्रौषम्। हो, हो, मी ऐकलंय त्याबद्दल. त्याचं असं झालं, की...'' आणि असे म्हणून त्यानं ५०-६० श्लोकात महाभारताची गोष्ट सांगून टाकली. ती अद्भुत आणि रोमांचक कथा अशी थोडक्यात ऐकून कुणाचंच समाधान झालं नाही. त्याची उत्सुकता चाळवली. ''नीट सांगा'', ''तपशील पुरवा'', ''हे का झालं'', ''ते कसं घडलं?'' - अनेक आवाज उठले. मग सूत म्हणाला, ''आपण असं करू या की उद्यापासून रोज संध्याकाळी मी मला माहित असलेला कथाभाग सांगत जाईन. चालेल का?''

सगळ्यांनी एका सुरात 'हो ऽऽऽ' म्हणून आपली पसंती दर्शवली.

आणि मग सुरू झालं रोजचं कथाकथन. सगळे जमायचे आणि सूत बोलायला लागायचा. मग एखादा म्हणायचा. ''हो हो, त्या युद्धासाठी आमच्या कामरूप देशाचे सैनिक सुद्धा पाठवले होते आमच्या राजाने. त्याचं काय झालं की म्हणे पांडवांचा दूत आला होता...'' झालं, म्हणजे त्या कामरूप राजाची गोष्ट ही जोडली जाणार तर मूळ गोष्टीला.

दुसरा कोणी सांगायचा, आमच्या चोळ वंशातही अस्संच घडलं बघा. राजा आणि त्याचे बंधू यांच्यात युद्ध...'' आता चोळ वंशाची गोष्टही शिरली आत.

तिसऱ्या कुणी म्हणावं, ''पांडवांनी राज्य मात्र चांगलं केलं असेल, नाही? त्यांना राजधर्म माहित असावा. खरा राजधर्म म्हणजे...''

मग सुरु व्हायचं राजधर्माचं विवेचन. कुणी त्यात आपली मतं घुसवायचा, तर कुणी त्यातला एखादा विचार खोडून काढायचा. मग गरमागरम चर्चा, संवादही आणि वादविवादही. प्रश्न शंभर - त्यांची उत्तरं हजार. राजधर्म आला म्हणजे युद्धनीती आली, शस्त्रास्त्रांची

माहिती आली. सेवकधर्म आला, सेनापतीची कर्तव्यं आली. युवराजांना आवश्यक असे शिक्षण विषय आले आणि हे सगळं कंटाळवाणं होऊ नये म्हणून त्याच्याशी निगडीत अशा गोष्टीही आल्या. हजारों ऋषी-मुनींचे हजारो विचार, हजारो तत्वज्ञान, लाखो गोष्टी आणि अनेक संदर्भ आता या ‘भारत’ नावाच्या ग्रंथाभोवती जमू लागले. ‘वाढता वाढता वाढे भेदिले शून्यमंडळा’ या न्यायाने ‘भारता’ची श्लोकसंख्या वाढायला लागली, आकार मोठमोठा होत गेला. ‘भारता’तल्या २४,००० श्लोकांमधे भर पडून पडून जवळ जवळ चौपट, म्हणजे एक लाख श्लोक झाले जमा.

विचार करा, की एवढ्या मोठ्या ग्रंथाला नुसतं ‘भारत’ म्हणावं की ‘मोठ्ठं भारत, म्हणजेच ‘महा’ भारत म्हणणं योग्य ठरेल? असा झाला महाभारताचा जन्म!

‘महाभारत’ हे खऱ्या अर्थाने ‘महा’ काव्य आहे. नुसत्या प्रचंड श्लोकसंख्येवरून नाही, तर त्यातल्या मोठ्या आशयामुळे, निरनिराळ्या कथांमुळे, तऱ्हेतऱ्हेच्या अभ्यासात्मक विवेचनामुळे आणि मुख्य म्हणजे, त्यातल्या प्रबोधनपर उपदेशामुळे महाभारत ‘मोठं’ झालं. लोकप्रियही झालं. फक्त भारतवर्षातच नव्हे, तर श्रीलंका, थायलंड, लाओस, कंबोडिया, अशा कितीतरी देशात महाभारत पोचलं. त्या त्या भाषांत त्याची भाषांतरं झाली. महाभारताचं मोठेपण आजही तितकंच महत्त्वाचं आहे. स्थल-कालाच्या मर्यादा ओलांडून हजारो वर्ष टिकून राहिलंय ते.

असं म्हणतात, की जे महाभारतात आहे, तेच सगळ्या जगभर दिसून येतं आणि जे इथं नाही, ते कुठेच दिसणार नाही. (व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं)

याचा प्रत्यय घ्यायचा असेल, तर चला, उलटूया पानं आणि शिरूया या महाभारताच्या कथा भांडारात.

२. राजा शंतनू

हस्तिनापूर ही कुरूवंशाने निर्माण केलेल्या विस्तीर्ण साम्राज्याची राजधानी. हस्तीन राजाने ती वसवली. हस्तीन ह्या राजाचा नातू म्हणजे शंतनू. प्रतीष राजा आणि त्याची राणी ह्यांच्यापोटी झालेला हा मुलगा पूर्वजन्मी 'राजा महाभिष' ह्या नावाने प्रसिद्ध होता.

तो अतिशय पुण्यवान होता. त्याच्या संचित पुण्यामुळे मृत्युनंतर त्याला स्वर्गलोक मिळाला आणि तो ब्रह्मदेवाच्या सभेत बसू लागला. एकदा तो ब्रह्मदेवाच्या सभेत बसला असताना गंगा नदीचे तेथे आगमन झाले. दोघांनीही एकमेकांकडे पहाता क्षणीच त्यांचे एकमेकांवर मन जडले. सभा अध्यक्ष ब्रह्मदेवाच्याही हे लक्षात आले आणि त्याने महाभिष राजा आणि गंगा नदी ह्या दोघांनाही पृथ्वीतलावर जन्म घेण्याचा शाप दिला. महाभिष कुरुवंशात जन्म घेईल व गंगा नदी त्याची पत्नी होईल असेही त्याने सांगितले. म्हणून हस्तीन राजाच्या मुलाच्या - राजा प्रतीषच्या पोटी महाभिषाने जन्म घेतला. त्याचे नाव शंतनू असे ठेवण्यात आले. राजा प्रतीषानंतर तो हस्तिनापूरच्या गादीवर कुरुवंशीय सम्राट म्हणून आरुढ झाला.

एकदा सम्राट शंतनू जंगलात शिकारीला गेला. शिकार हा बहुधा त्याकाळी प्रत्येक राजाच्या हौसेमौजेचा एक भाग होता. प्रजेला त्रास देणाऱ्या जंगली प्राण्यांचा संहार करून प्रजेला त्रासमुक्त करणे हाही एक उद्देश त्यात असतो. त्या निमित्ताने राजा आपल्या राजधानीतून बाहेर पडून आपल्या शस्त्रास्त्र-ज्ञानाचीही चाचणी घेत असावा.

राजा शंतनू शिकारीसाठी सावज शोधीत होता. सावज शोधत, शोधत तो एकटाच जंगलात बराच पुढे गेला. बरोबरचे निवडक लोक खूप मागे राहिले. अचानक त्या घनदाट जंगलात नदीच्या तीरावर त्याला एक अतिशय सुंदर तरुण स्त्री दिसली. तो तिच्यावर तत्क्षणीच इतका लुब्ध झाला, की सावज सोडून तो तिच्याकडेच वेगाने गेला. त्याने तिला लग्नाची मागणी घातली. तीही राजा शंतनूवर भाळली होती. तिनेही तत्काळ त्याच्याबरोबर विवाह करण्याचे कबूल केले. पण तिने राजाला एक अट घातली. ''मी जे काही करेन, ते मला न अडविता करू द्यावे. मी सदैव तुमचीच राहीन. पण ज्या क्षणी तुम्ही मला अडवाल, त्या क्षणी मी अदृश्य होईन, निघून जाईन.''

त्या दिवसापासून राजा शंतनू आपल्या वनराणीबरोबर सदैव राहू लागला. कालांतराने त्यांना एक मुलगा झाला. राजाला परमानंद झाला. पण त्याच मध्यरात्री राणी बाळाला घेऊन बाहेर पडली आणि तिने आपले तान्हुले गंगेच्या प्रवाहात सोडून दिले. ''आई, तुझा पुत्र तुझ्याच कुशीत असावा'', असे गंगा नदीला सांगून मगच तिने तिचा पुत्र गंगेच्या प्रवाहात सोडून दिला. राजाने हे सर्व पाहिले, त्याच्या जिवाचा थरकाप झाला, तो व्याकूळ झाला. आपल्या प्रिय राणीला अडवायला पुढे धावला. पण जागच्या जागीच खिळून राहिला. त्याला राणीने घातलेल्या अटीची आठवण झाली. मान खाली घालून, दु:खाने, नाईलाजाने तो आपल्या महालाकडे परतला.

कालांतराने राणीला दुसरा पुत्र झाला. तोही राणीने गंगार्पण केला. तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा. सात पुत्र झाले. सातही पुत्र राणीने ''आई तुझा पुत्र तुझ्याच कुशीत...'' म्हणून गंगार्पण केले. प्रत्येक वेळी राजा शंतनू हतबल व्हायचा, बापुडा, केविलवाणा दिसायचा, दु:खाने वेडापिसा व्हायचा. पूर्णपणे मोडून जायचा. पण आपल्या राणीच्या सौंदर्यापुढे, प्रेमापुढे तो पार विरघळून जायचा. आपल्या राणीच्या सान्निध्याने तो सारं काही विसरून जायचा.

पण आठवा पुत्र झाला आणि राजा शंतनूमधला पिता सजग झाला, दक्ष झाला. राणीच्या प्रेमापलिकडे जाऊन पुत्रासाठी तो आतुर झाला. राणी तिचा आठवा पुत्र घेऊन महालाबाहेर निघाली. गंगार्पण करण्यासाठी तिने बाळाला घट्ट कुशीत घेतले होते. गंगेजवळ ती येताच राजा शंतनूने तिला अडविले. ''राजा, तू मला अडविलेस. आता मी जाते. आपली भेट ह्यापुढे होणार नाही. तुझा हा पुत्र मी घेऊन जात आहे. तुला तो यथावकाश भेटेल. तो तुझ्या कुळाचा उद्धारकर्ता होईल. आजवर मी सात वसूंना मुक्ती दिली. आठवा तुझा पुत्र!'' असे म्हणून राजा शंतनूची राणी म्हणजे गंगा नदी आपल्या प्रवाहात लुप्त झाली.

राणी नाहिशी होताच राजा भानावर आला. सैरभैर झाला. राणीला नदीच्या प्रवाहात लांबवर नजर टाकून शोधू लागला. त्याने आसपासच्या वनातही शोध घेतला. उदास झाला. त्यानंतर तो रोज त्या ठिकाणी येऊ लागला. आपल्या राणीला शोधू लागला. आपला पुत्र कुठे तरी असेल म्हणून त्यालाही शोधू लागला. पण उदास होऊन, दु:खित अंत:करणाने परत जाऊ लागला.

अशी काही वर्षे गेली, दु:ख, उदासी आता रोजचीच झाली. आता त्या जोडीला एवढ्या वर्षांचा एकाकीपणाही होता सोबतीला! एके दिवशी तो गंगाकिनारी आला. त्याला एके ठिकाणी पाण्याचा प्रवाह क्षीण झालेला दिसला. त्याच ठिकाणी, थोड्या अंतरावर एक तेज:पुंज बालक नदीच्या पात्रात बाण मारीत उभा होता. त्याने मारलेल्या बाणांमुळे नदीचे पाणी अडविले जात होते. बांध तयार होत होता. राजा आश्चर्यचकित होऊन त्या मुलाकडे पहात राहिला. मुलाचे लक्ष त्याचवेळी राजाकडे गेले. मुलाने तत्काळ नदीत उडी घेतली आणि नदीच्या प्रवाहात तो लुप्त झाला. राजाला आपल्या प्रिय राणीची - गंगेची आठवण झाली. तिने तिच्याबरोबर नेलेल्या आपल्या आठव्या मुलाची आठवण झाली. गंगेच्या पात्रात जाऊन त्याने आपल्या प्रिय पत्नीला विचारले, ‘‘देवी, हा पुत्र कोणाचा? ह्याला शस्त्रास्त्रांचे एवढे ज्ञान एवढ्या लहान वयात कोणी दिले?

''महाराज, हा आपलाच आठवा पुत्र - देवव्रत! क्षत्रिय कुलानुसार ह्याला सर्व शस्त्रास्त्रांचे शिक्षण दिले आहे. हा युद्धात अजेय असेल. ह्याला सर्व वेदविद्याचेही शिक्षण दिले आहे. हा दीर्घायुषी आहे. भरतकुलाचा उद्धारकर्ता आहे. हा तुमचा पुत्र. ह्यापुढे ह्याचा सांभाळ तुम्ही करावा'', असे म्हणून गंगेने त्या पुत्राला महाराजा शंतनूच्या स्वाधीन केले आणि आपल्याच प्रवाहात ती मिसळून गेली.

महाराजा शंतनू देवव्रताला घेऊन राजधानीत आला. हळूहळू तो त्याच्यावर विसंबून राहू लागला. त्याने आपला राज्यकारभार पुत्राच्या हाती दिला.

प्रश्न:

१) या गोष्टीत आलेल्या शब्दांपैकी आठ शब्द खालील कोड्यात लपलेले आहेत, ते शोधा.

य	ळ	ल	अ	प्र	सि	द्ध
घ	न	दा	ट	ती	र	ड
टा	म	हा	भि	ष	ठि	ण
त्र	ब्र	म्ह	दे	व	व्र	त
त्य	ध	ज्ञा	स	न	झ	ज

२) या गोष्टीवरून तुमच्या काय लक्षात आले? योग्य वाटणाऱ्या वाक्यांवर '√' खूण करा.

- लहान वयातच सर्व प्रकारचे शिक्षण घेतले पाहिजे.
- जंगली प्राण्यांची शिकार करावी.
- दुसऱ्याला दिलेले वचन पाळले पाहिजे.

३. भीष्मप्रतिज्ञा

राजा शंतनू कुरू वंशाच्या विस्तीर्ण साम्राज्याचा सम्राट होता. पण त्याचा पुत्र देवव्रत सर्व राज्य कारभार अतिशय कुशलतेने करीत होता. प्रजेच्या हिताचे सर्व निर्णय धडाडीने अंमलात आणीत होता. राज्याची संरक्षण व्यवस्था त्याने अतिशय बळकट आणि अभेद्य अशी केली होती. दिवसेंदिवस शंतनूराजा देवव्रतावरच्या अधिक विश्वासाने आणि निर्धास्तपणे शिकार करण्यात आपला वेळ व्यतीत करू लागला होता.

एकदा सावजाचा पाठलाग करीत असताना तो थकूनभागून यमुनेच्या किनारी विसावला. यमुनेचा प्रवाह, किनाऱ्यावरची लगबग, माणसे, ये-जा करणाऱ्या नौका पहात, पहात त्याची दृष्टी सर्वत्र फिरत होती. ती अचानकपणे एके ठिकाणी थांबली, स्थिरावली.

सौंदर्याची खाण असावी अशी एक नवयौवना प्रवाशांची वाट पहात आपली नौका घेऊन उभी होती. तिच्या अंगप्रत्यंगातून तिचे सौंदर्य खुणावत होते. राजा ताडकन उठला आणि नौकेपाशी जाऊन त्याने तिला विवाहाची मागणी घातली. त्या सुंदरीने त्याला आपल्या पित्याची - धीवर राजाची परवानगी घेण्यास सांगितले.

धीवर राजाची मानलेली कन्या सत्यवती ही खरे तर त्याला यमुनेच्या वाहत्या प्रवाहात सापडली होती. बरेच दिवस पाण्यात असल्यामुळे असेल कदाचित, पण तिच्या सर्वांगाला माशांचा वास येत असे. त्यामुळे तिला मत्स्यगंधा असेही म्हणत. कोळ्यांचा राजा असलेला हा धीवर ऋषी-मुनी आणि इतर तापसांना त्याच्याकडून कोणतेही मूल्य न घेता यमुना नदी पार करण्याचे पुण्यकर्म वर्षानुवर्षे करीत होता. त्यामुळे सत्यवतीही मोठी झाल्यावर ते काम करू लागली. एकदा तिने पराशर ऋषींना असेच यमुना नदीपार नेले. त्यांनी तिच्या पोटी महर्षी व्यास येतील, अशी योजना केली आणि महर्षी व्यासांचा जन्म झाला होता.

अशी होती ही सत्यवती, मत्स्यगंधा: सौंदर्याची खाण, धीवरराजाची मानसकन्या. त्याच्या काळजाचा एक तुकडा!

त्यामुळे राजा शंतनू जेव्हा धीवर राजाकडे आला, तेव्हा धीवर राजा पिता म्हणून अतिशय दक्ष झाला. शंतनू राजाने त्याच्या कन्येशी विवाह करण्याची आपली इच्छा प्रदर्शित करताच धीवर राजाने सांगितले, ''जर सत्यवतीच्याच मुलाला हे राज्य मिळणार असेल आणि तो तुझा उत्तराधिकारी होणार असेल, तरच मी तुला तिच्याशी विवाह करण्याची परवानगी देऊ शकतो. अन्यथा नाही.''

राजा शंतनू गडबडला, ''हे कसे शक्य आहे? सबल, सक्षम, सर्वोत्तम कारभार करणाऱ्या पुत्र देवव्रताला का म्हणून ही शिक्षा? नाही, नाही. मी असे करणार नाही'', असे म्हणून तो जड पावलांनी राजवाड्याकडे परतला.

दिवसांमागून दिवस गेले. राजा अधिकाधिक उदास होत गेला. सत्यवतीच्या सौंदर्याने त्याला वेडे केले होते. त्याचे कशातच लक्ष लागेना. तो देवव्रतापासूनही दूर-दूर राहू लागला. हे देवव्रताच्या लक्षात आले. राजा शंतनूने त्याला काहीही सांगण्याचे टाळले. देवव्रताने राजाबरोबर शिकारीला गेलेल्या अमात्य, मंत्री आणि इतर सेवकवर्गाकडे विचारणा केली. राजा, सत्यवती आणि धीवर राजा ह्यांच्यात झालेल्या बोलण्यातील मतितार्थ त्याला समजला.

तो तडक धीवर राजाकडे गेला. शंतनू राजाच्या वतीने त्याने सत्यवतीला मागणी घातली. धीवर राजाने राजा शंतनूला जे सांगितले होते तेच पुन्हा देवव्रताला ऐकविले. ''माझा नातू - सत्यवतीचा मुलगाच - शंतनू राजानंतर गादीवर बसला पाहिजे. तसे होणार असेल तरच माझी मुलगी - सत्यवती राजा शंतनूची राणी होऊ शकेल.''

''धीवर राजा, मी तुला ह्या सर्व प्रजाजनांसमोर सांगतो की ह्या क्षणापासून मी माझा

माझ्या पित्याच्या राज्यावर असलेला सर्व हक्क सोडत आहे. तुझा नातूच ह्या राज्याचा उत्तराधिकारी होईल.'' असे देवव्रताने धीवरराजा आणि उपस्थित सर्व लोकांना सांगितले.

''युवराज, तुमचे म्हणणे तुम्ही नक्कीच पाळाल. तुम्ही धर्मनिष्ठ आहात. पण तुमच्या मुलांनी तसा हक्क सांगितला तर? तुमच्या नातवाने तसा हक्क मागितला तर? त्यांच्यावर तुमचे वचन कसे काय बंधनकारक राहील?'' धीवर राजाने देवव्रताला विचारले.



''हे राजा, मी देवव्रत, हस्तिनापूरचा युवराज, महाराजा शंतनूचा ज्येष्ठ पुत्र आज ह्या क्षणी प्रतिज्ञा करतो की मी आजन्म ब्रह्मचारी राहीन. त्यामुळे माझे पुत्र-प्रपौत्र किंवा अन्य कोणीही वंशज ह्या गादीवर हक्क सांगणार नाही. ह्या गादीवर महाराजा शंतनू आणि महाराणी सत्यवती ह्यांना होणारा पुत्र आणि प्रपौत्रच ह्या राज्याचे उत्तराधिकारी होतील, असतील. माझी ही प्रतिज्ञा माझ्याकडून कधीही भंग होणार नाही. देव-देवता-सूर्य-चंद्र ह्या सर्वांनी मला त्यासाठी आशीर्वाद द्यावेत'', असे निश्चयपूर्वक सांगून देवव्रताने दोन्ही हात जोडून ''माते'' म्हणून सत्यवतीला आदराने हाक मारली.

देवव्रताच्या ह्या घोर प्रतिज्ञेने धीवर राजा, सत्यवती आणि सर्वच उपस्थित प्रजाजन आश्चर्याने थक्क झाले. काहीतरी प्रचंड चुकीचे घडून गेले आहे ह्याची त्यांना जाणीव झाली. त्याच क्षणी ''भीष्मा! भीष्मा! भीष्मा!'' अशी आकाशवाणी झाली. देवव्रताचा दृढनिश्चयीपणा सर्वश्रुत झाला. भीष्म म्हणजे भयंकर. देवव्रताच्या या कठोर प्रतिज्ञेनंतर 'भीष्मप्रतिज्ञा' असा वाक्प्रचार मराठीत रुढ झाला.

महाराणी सत्यवतीला घेऊन देवव्रत हस्तिनापूरला आला. त्याने महाराजा शंतनूला प्रणाम केला आणि महाराणी सत्यवतीलाही प्रणाम केला. राजा शंतनूला आपल्या ह्या गांगेय पुत्राचा अभिमान वाटला. आजवर कधीही, कोणत्याही पुत्राने पित्याचा आनंद कशात आहे हे जाणून आपल्या पित्यासाठी असा त्याग केलेला नव्हता. राजा शंतनूने त्याला ''इच्छामरणी होशील'' असा आशीर्वाद दिला.

देवव्रताने ''हस्तिनापूर राज्याचे आणि भविष्यात होणाऱ्या सर्व राजे-महाराजांचे रक्षण करीन'' असे वचन आपल्या पित्याला दिले. आपले आजन्म ब्रह्मचर्यपालनाचे व्रतही त्याने पाळले. सत्यवतीला कायम मातृस्थानीच मानले. त्याच्या घोर प्रतिज्ञापालनासाठी त्याला सर्व जग भीष्माचार्य असे म्हणू लागले.

प्रश्न:

१) तुम्ही तुमच्या कुटुंबियांसाठी प्रतिज्ञा केली आहे काय? कोणती? ती पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न करणार आहात? (अद्याप प्रतिज्ञा केली नसेल, तर यापुढे कोणती प्रतिज्ञा करणार आहात ते सांगा.)

२) देवव्रतामध्ये खालील श्रेष्ठ गुण होते, त्यामुळे तो आदरणीय ठरला.
पितृभक्ती, मातृभक्ती, कठोरनिश्चय, प्रजादक्षता, त्यागीवृत्ती, निर्लोभीपणा, एकवचनीबाणा. या गुणांपैकी तुमच्यात कोणते गुण आहेत, ते उदाहरणे देऊन सांगा.

४. कर्णजन्म

अंग देशाचा राजा कर्ण हा त्याच्या तारुण्यापासून ते महाभारतातील कौरव-पांडवांच्या शेवटच्या महायुद्धापर्यंत दुर्योधनाचा प्रिय मित्र आणि कौरव साम्राज्याचा प्रमुख संरक्षणकर्ता होता. पण तो कुंतीपुत्र होता. कुंतीचा पहिला मुलगा होता. सर्व पांडवांचा वरिष्ठ बंधू होता. सूर्यपुत्र होता.

कुंती ही राजा कुंतीभोजाची मानसकन्या. कुंतीभोजाचा आतेभाऊ असलेल्या यादव कुळातील राजा शूरसेनाची पहिली मुलगी, हे त्याचे पहिले अपत्य. 'मला होणारे पहिले अपत्य मी तुला देईन' असे राजा शूरसेनाने राजा कुंतीभोजाला सांगितले होते. म्हणून त्याने आपली पहिली मुलगी पृथा, कुंतीभोज राजाच्या हवाली केली. लहानपणापासूनच कुंतीभोज राजाच्या राजवाड्यात पृथा मोठी झाली. कुंतीभोज राजाच्या मांडीवर बसूनच राजाचे कर्तव्य आणि राज्यकारभाराचे धडे तिने गिरविले. लाडाकोडातच वाढलेल्या ह्या मुलीचे पृथा हे खरे नाव न घेता त्याऐवजी सर्वजण तिला कुंतीभोज राजाची लाडकी म्हणून कुंती म्हणू लागले. नंतरही तिचे कुंती हेच नाव रूढ झाले.

कुंती जसजशी मोठी झाली तसतशी ती राजमहाल, राजदरबार आणि राजाकडे येणाऱ्या महत्त्वाच्या राजांची, अतिमहत्त्वाच्या इतर व्यक्तींची, ऋषी-मुनींची आतिथ्य-व्यवस्था पाहू लागली. तिच्या कर्तव्यतत्परतेने, अगत्यशील स्वभावामुळे आणि तिच्या मृदुभाषेमुळे येणारा प्रत्येक पाहुणा अतिसंतुष्ट होऊन, समाधानाने परत जाई. जाताना तो कुंतीला भरभरून आशीर्वाद देई.

एकदा महर्षी दुर्वास राजा कुंतीभोजाकडे आले. त्यांची सर्व व्यवस्था कुंतीने इतकी व्यवस्थितरीत्या केली की दुर्वास ऋषींना आपले अनुष्ठान तिथे राहून सहजरीत्या पूर्ण करता आले. कुंतीने ते सर्व अनुष्ठान विना-अडचणी होईल, ह्याची काळजी घेतली. दुर्वास ऋषी त्यामुळे कुंतीवर प्रसन्न झाले. ''कन्ये, मी तुला काय आशीर्वाद देऊ ते सांग. मी तुझ्यावर अतिशय प्रसन्न झालो आहे. माग मुली, काय हवे ते माग'', दुर्वास ऋषींनी कुंतीला सांगितले.

''गुरुवर. माझ्या बाबांच्या राज्यात सदैव सुख-शांती नांदावी. एवढाच आशीर्वाद द्या. आपली सेवा करण्याची संधी मला माझ्या बाबांमुळेच मिळाली'', असे म्हणून कुंतीने दुर्वास ऋषींना साष्टांग नमस्कार घातला. कुंतीचे हे बोलणे ऐकून दुर्वास ऋषी अधिकच प्रसन्न झाले

''मुली, मी तुला अभिसार मंत्राची दीक्षा देतो. ह्या मंत्राचे उच्चारण करून तू ज्या देवतेचे स्मरण करशील, तीच देवता तुझ्या पोटी पुत्र म्हणून जन्माला येईल. तुला जेव्हा आवश्यकता वाटेल, तेव्हा तेव्हा तुला ह्या मंत्राचे उच्चारण करता येईल'', असे म्हणून दुर्वास ऋषींनी कुंतीला तो मंत्र दिला आणि आपली पुढील मार्गक्रमणा करण्यासाठी ते निघून गेले.

दुर्वास ऋषींनी सांगितलेल्या सर्वच गोष्टी कुंतीला पुरेशा कळल्या नव्हत्या. शिवाय देवतेचे स्मरण केले तर ती देवताच आपल्या पोटी जन्म घेईल ही कल्पनाच तिला अतिशय कुतूहलपूर्ण आणि गंमतीची वाटली. एकदा भल्या पहाटे, उगवत्या सूर्यनारायणाचे दर्शन घेता घेताच तिने अभिसार मंत्राचे उच्चारण केले. साक्षात सूर्यदेवच दुसऱ्या क्षणी तिच्या समोर प्रकट झाले.



कुंती त्या दैदिप्यमान प्रकाशाने बावरली. पण तिची चूकही तिच्या लक्षात आली. तिने सूर्यदेवतेची क्षमा मागितली आणि तिने ''मी आता कोणत्याही पुत्राची माता होऊ इच्छित नाही. मला क्षमा करा'', अशी प्रार्थना केली. पण पुत्र प्रदान न करता परत जाणे असे काही भगवान

सूर्यदेवांना करणे शक्य नव्हते. ते अभिसार मंत्राचे उल्लंघन करू शकत नव्हते. आपले सर्व तेज कुंतीच्या उदरात ठेवून सूर्यदेव परत गेले.

यथावकाश कुंतीला एक पुत्र झाला. पण कुमारीपुत्र म्हणून त्याची अवहेलना होईल म्हणून कुंतीने ह्या पुत्राला राजचिन्हे घालून, एका टोपलीत ठेवले व टोपली नदीच्या पात्रात सोडून दिली. ती टोपली धृतराष्ट्राचा सारथी अधिरथ ह्याला मिळाली. त्याने त्या बाळाचा सांभाळ केला. त्यालाच पुढे कर्ण असे म्हणू लागले.

प्रश्न:

१) या कथेतून कुंतीचे कोणते गुण व दोष तुम्हाला वाटतात ते सांगा. (पुढे दिलेल्या शब्दांपुढे गुण/दोष यापैकी योग्य शब्द लिहा.)

कर्तव्य तत्परता	क्षमायाचना	मृदू भाषा	अवहेलनेची भीती
वडीलधाऱ्यांचा आदर	पितृभक्ती	कर्तव्यापासून दूर	उतावळेपणा
अतिउत्सुक			

२) या कथेत आलेले काही शब्द पुढे दिले आहेत. त्यापासून तुम्ही शब्दकोडे बनवा.
शब्द: अभिसार, उच्चारण, अगत्य, नारायण, अधिरथ, सारथी, रथ.

५. पांडवजन्म



राजा शंतनू आणि राणी सत्यवती ह्यांचा सुखी संसार सुरू झाला. त्यांना चित्रांगद आणि विचित्रवीर्य असे दोन पुत्र झाले. चित्रांगद हा ज्येष्ठ पुत्र, चित्रांगद नावाच्याच गंधर्वाकडून युद्धात मारला गेला. विचित्रवीर्याचा अंबिका आणि अंबालिका ह्या काशीराज्याच्या दोन कन्यांशी विवाह झाला. परंतु ह्या दोन अतिसुंदर राण्यांशी तो इतका रममाण झाला की त्याचे त्याला भान राहिले नाही आणि तो अकाली मरण पावला.

विचित्रवीर्याच्या जन्मानंतर लगेचच राजा शंतनू स्वर्गलोकी परत गेला होता. सत्यवतीचे दोन्ही पुत्र जग सोडून गेले होते. राज्याला कोणी वारसच नव्हता. 'भीष्माने राज्यावर बसावे विवाह करून कुरूवंश चालू ठेवावा' अशी विनंती सत्यवतीने भीष्माला केली; पण भीष्मांनी त्याला नकार दिला.

महर्षी पराशरांच्या प्रसादाने तिला व्यास नावाचा पुत्र झाला होता, असे सत्यवतीने भीष्मांना सांगितले. ''व्यासमुनींच्या तप:सामर्थ्याने अंबिका आणि अंबालिका ह्यांना पुत्र होऊ शकतील व कुरूवंश तसाच पुढे चालू राहू शकेल'' असे सत्यवतीने भीष्माचार्यांना सांगितले. ''मी तसे करू का?'' असे तिने भीष्मांना विचारले. त्यांची अनुमती घेऊन तिने महर्षी व्यासांची प्रार्थना केली आणि त्यांनाही हे सांगितले.

महर्षी व्यासांच्या मंत्रसामर्थ्याने व प्रसादाने अंबिकेच्या पोटी धृतराष्ट्र जन्मला आणि अंबालिकेच्या पोटी पंडू जन्मला. धृतराष्ट्र जन्मांध होता. त्यामुळे पंडू हस्तिनापूरच्या गादीवर बसला. तो अतिशय पराक्रमी होता. त्याने अश्वमेध यज्ञ केला आणि आपल्या सामर्थ्याची द्वाही (घोषणा) फिरवली.

एकदा तो कुंती आणि माद्री ह्या आपल्या दोन्ही राण्यांसह शिकारीला गेला. सावजाचा पाठलाग करीत असताना तो हरणांच्या एका कळपासमोर आला. हरणांची एक जोडी क्रीडा करीत असताना त्याला दिसली. त्याने एकामागून एक बाण सोडून त्या दोन्ही हरणांना मारले. शिकार केल्याच्या आनंदात तो पुढे धावला. त्यावेळी एक हरीण मनुष्यवाणी उच्चारित त्याला म्हणाले, ''राजा, मी किंदम ऋषी आहे. मी हरीण रुप घेऊन माझ्या हरीणरुपी पत्नीबरोबर क्रीडा करीत होतो. परंतु तू आम्हाला मारलेस. तूही तुझ्या पत्नीबरोबर क्रीडा करू लागलास तर अशाच पद्धतीने, तत्क्षणी मृत्यू पावशील.'' पंडू राजा अतीव दु:खी झाला. त्याने दोन्ही राण्यांना हे सांगितले. राज्यकारभार भीष्मांच्या हाती सोपवून पंडू राजा वल्क परिधान करून वानप्रस्थाश्रमी गेला. जंगलात राहू लागला. 'पुत्र होणे नाही, प्रयत्न केल्यास जीवित राहाणे नाही' हे त्याच्या मनावर पक्के कोरले गेले होते. तो अतिसंयमाने रहात होता. त्याने जणू वानप्रस्थाश्रम स्वीकारला होता.

एकदा तो आणि कुंती दोघेच गप्पागोष्टी करीत बसले होते. बोलता बोलता कुंतीने तिला मिळालेल्या अभिसार मंत्राची माहिती पंडूराजाला सांगितली. ती ऐकताच पंडू राजाच्या मनावरील दु:खाचे सावट दूर झाले. आपल्या वंशाची वेल वाढू शकते, हे त्याला समजले. त्याने कुंतीला अभिसार मंत्राचा उच्चार करून पुत्रप्राप्तीचे वरदान घेण्याचा आग्रह केला. यथावकाश तिला युधिष्ठिर, भीम आणि अर्जुन असे तीन पुत्र झाले. माद्रीनेही पुत्रेच्छा व्यक्त केली आणि यथावकाश तिला एक जुळे झाले. त्यांची नावे नंतर नकुल आणि सहदेव अशी ठेवण्यात आली.

युधिष्ठिर हा यमधर्माचे स्मरण करून झाला होता. भीम वायुदेवाचे स्मरण करून झाला होता. इंद्रदेवतेची प्रार्थना केल्यामुळे अर्जुनाचा जन्म झाला होता. माद्रीने अभिसार मंत्राचे उच्चारण करताना अश्विनीकुमारांचे स्मरण केले होते आणि त्यामुळे तिला नकुल आणि सहदेव असे दोन पुत्र झाले होते. हे पुत्र होताना अनेक शुभशकुन झाले होते. देवदेवतांनी आकाशवाणीद्वारे सर्वांना शुभाशीर्वाद दिले होते.

पंडू राजाचे पुत्र म्हणून ह्या पाचही पुत्रांना सर्व जण पांडव असे म्हणू लागले.

प्रश्न:

१) 'मानवाच्या हातून चूक घडते, संकटे व अडचणी येतात. परंतु त्यामुळे खचून जाऊ नये. कारण त्यातून योग्य मार्ग नक्कीच निघतो', असे ही कथा वाचून वाटते का, यावर तुमच्या मित्रांशी चर्चा करून तुमचे अनुभव सांगा.

२) खालील घटना जर घडल्या नसत्या तर काय झाले असते?

अ) पंडू राजाने हरिणांना बाण मारला.

ब) मृत्यूच्या भीतीने पंडू राजा राज्य सोडून वनात गेला.

क) कुंतीने अभिसार मंत्राची माहिती पंडूराजाला सांगितली.

ड) विचित्रवीर्याला मोह आवरला नाही.

इ) भीष्माने कुरुवंश चालवण्यासाठी विवाह करण्यास नकार दिला.

६. कौरव जन्म

हस्तिनापूरच्या गादीवर राजा धृतराष्ट्र बसला होता. तो जन्मत:च अंध होता. त्याची पत्नी गांधारी. तिने तर धृतराष्ट्राशी विवाह होताच आपल्या डोळ्यांवर घट्ट पट्टी बांधून ठेवली होती आणि ती अंध नसूनही अंधाचेच जीवन जगत होती. त्यांनाही पुत्र प्राप्ती झालेली नव्हती.

परंतु कुंतीला मिळालेल्या अभिसार मंत्रामुळे तिला तीन पुत्र झाले. कुंतीने तो मंत्र माद्रीलाही सांगितला आणि त्यामुळे माद्रीलाही जुळे झाले. हे पाच पुत्र पंडुराजाचा वंश पुढे चालवत होते.

पण धृतराष्ट्राच्या वंशाचे काय? त्याला अजून एकही पुत्र झालेला नव्हता. पुत्र झाला नाही, तर राजगादीवर परत पंडूचीच मुले बसणार होती. धृतराष्ट्राचा वंश तिथेच खुंटणार होता. त्याचा राजगादीवरचा हक्कही तिथेच संपणार होता. त्यामुळे धृतराष्ट्र-गांधारी ह्यांना पुत्र प्राप्ती होणे फार आवश्यक होते.

हस्तिनापुरी येणाऱ्या ऋषीमुनींचा आदरसत्कार करणं, व आतिथ्य करणे तसेच त्यांचा निवास शांत वातावरणात व्हावा, यासाठी सर्वच राजघराणे सदैव तत्पर असे. गांधारीदेवी ह्या सर्व गोष्टी अगदी मन:पूर्वक, सश्रद्धपणे करीत असे.

एकदा महर्षी व्यास हे हस्तिनापुरी आले. गांधारीने त्यांची अतिशय आदरपूर्वक आणि प्रेमाने सेवा केली. ते प्रसन्न झाले. त्यांनी तिला शंभर पुत्रांची माता होशील, असा आशीर्वाद दिला. गांधारीने व्यासमुनींना वाकून नमस्कार केला. पण ती फारशी आनंदी झाली नाही. हात जोडून उभी राहिली. धीर एकवटून ती महर्षी व्यासांना म्हणाली, ''ऋषीवर, आपण मला हा वर दिलात, त्यामुळे मी धन्य धन्य झाले. परंतु ह्यापूर्वी मला साक्षात पशुपतीनाथांनीही असाच वर दिला होता. आपण स्वत: माझ्या पतीदेवांनाही हाच वर दिला होता. एवढी वर्षे झाली तरीही आजवर एकदाही माझी कूस उजवली नाही. पुत्र किंवा कन्यारत्न काहीच पोटी आलेले नाही. माझ्याकडून किंवा माझ्या पतीराजांकडून काही चूक झाली आहे का?

''गांधारी, माझा आशीर्वाद वाया जाणार नाही. तू निश्चितपणे १०० पुत्रांची माता होशील''. व्यासमुनींनी तिला आश्वासित केले.

काही दिवस गेले. काही महिने गेले. काळ पुढे जातच होता. गांधारीच्या लक्षात आले, की आपल्याला दिवस गेलेले आहेत. ती आतुरतेने नऊ महिने, नऊ दिवस मोजू लागली.

नऊ महिने झाले. नऊ दिवसही झाले. तिला खूप वेदना होत राहिल्या. परंतु पुत्र प्राप्ती झाली नाही. तिच्या यातना मात्र वाढतच गेल्या. तिला श्वासोच्छवास करणेही कठीण होऊ लागले. परंतु दिवसामागून दिवस गेले तरी तिला पुत्रप्राप्ती झाली नाही. ती असहनीय वेदनांनी विव्हळत राहिली. मनोमन महर्षी व्यासांची प्रार्थना करू लागली. त्यांना विनवू लागली.



एक दिवस व्यासमुनीच प्रत्यक्ष तिच्यासमोर उभे राहिले. त्यांनी तिचे दुःख दूर केले. तिच्या मस्तकावर हात ठेवून तिला शांत केले. तशाही परिस्थितीत गांधारीने शंभर पुत्र व्हावेत, पण त्यांना किमान एक तरी बहिण असावी अशी इच्छा प्रदर्शित केली. महर्षि व्यासांनी तिला ''तथास्तु'' असा आशीर्वाद दिला. मंत्रोच्चार करून शास्त्रोक्त विधींची पूर्तता केली. आणि काही दिवसातच गांधारीला एकामागून एक असे शंभर पुत्र आणि एक कन्या झाली. कन्येचे नाव दुःशला असे ठेवले गेले आणि मुलांची नावे दुर्योधन, दुःशासन, विकर्ण अशी ठेवली होती.

धृतराष्ट्राच्या दुसऱ्या एका राणीलाही नंतर युयुत्सू नावाचा आणखी एक पुत्र झाला. धृतराष्ट्राचे सर्व १०१ पुत्र आणि एक कन्या हे कौरव म्हणून ओळखले जाऊ लागले.

प्रश्न:

१) खालील विधानांशी तुम्ही सहमत आहात का, ते सकारण सांगा.
- गांधारीने स्वत:च्या डोळ्यांवर पट्टी बांधून अंधांचे जीवन जगणे योग्य होते.
- कुंतीने अभिसार मंत्र माद्रीला सांगितला हे योग्य होते.
- पंडूराजाने वानप्रस्थाश्रम स्वीकारला, ते योग्य झाले.

२) गांधारीने शंभर पुत्रांबरोबर एक मुलगीही आपल्याला व्हावी, पुत्रांना बहिण मिळावी, अशी मागणी व्यासमुनीकडे का केली असावी?
तुम्ही व तुमची बहिण यांच्या एकमेकांच्या नात्याबद्दल एक/दोन ओळी लिहा.



७. श्रीकृष्णजन्म

महाभारतातील कौरव-पांडव ह्यांच्या आयुष्यात श्रीकृष्णाचे स्थान सगळ्यात महत्त्वाचे आहे. महाभारत जसे घडले तसे घडण्याला श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्त्व खूपसे कारणीभूत आहे. श्रीकृष्ण पांडवांचा पाठीराखा होता. परंतु त्याने कौरवांना कधीही शत्रू मानले नाही. त्याने वेळोवेळी त्यांना योग्य ते साह्यही केले. कौरव-पांडव युद्धात तर त्याने आपले संपूर्ण सैन्यच दुर्योधनाच्या पाठीशी उभे केले. भगवद्‌गीता हा भारतीयांचा एक सर्वात जास्त महत्त्वाचा, प्रत्येकाला कार्यप्रवण करणारा ग्रंथ आहे. हे भगवद्‌ज्ञान श्रीकृष्णाने अर्जुनाला प्रत्यक्ष युद्धभूमीवरच दिले.

श्रीकृष्ण हे एक अद्भूत रसायन होते. चोरून लोणी खाणारा, गाईगुरे वळणारा गुराखी, गोपींशी खेळणारा श्रीकृष्णच. न्यायाची चाड बाळगणारा, जशास तसे वागणारा, कार्यप्रवण करणारे तत्त्वज्ञान सांगून कार्यप्रवृत्त करणारा आणि सरतेशेवटी ''मीच विश्वाचा कर्ता-धर्ता आहे. मला शरण या.'' असे सांगणारा श्रीकृष्ण महापुरूष होता.

त्याचा जन्म आणि त्याचे बालपणही गूढ, रम्य आणि उज्ज्वल होते. त्याच्या आईचे नाव देवकी आणि वडिलांचे नांव वसुदेव.

मथुरेचा राजा उग्रसेन ह्याची देवकी ही कन्या. राजा उग्रसेनाच्या पुत्राचे, देवकीच्या भावाचे नाव कंस. कंसाने तारूण्यात पदार्पण करताच आपल्या पित्याला - उग्रसेनाला - तुरुंगात टाकले आणि तो मथुरेच्या गादीवर बसला. गादीवर आल्याबरोबर त्याने आपले स्थान बळकट करण्यासाठी प्रजाजनांच्या मनात स्वत:विषयी भीती निर्माण केली, त्यांचा छळ सुरू केला. प्रजाजन त्रासले, पिचले, कंसाला शिव्याशाप देऊ लागले.

कंसाने त्याची पर्वा केली नाही. पण आपल्या बहिणीवर - देवकीवर - मात्र त्याचे अतोनात प्रेम होते.

वृष्णी वंशातील वसुदेवाशी त्याने देवकीचा विवाह ठरविला. लग्नाच्या वरातीत त्यानेच तिच्या रथाचे सारथ्य केले. पण वरात आनंदात चाललेली असतानाच एक आकाशवाणी झाली. ''कंसा, ज्यांच्या रथाचे तू सारथ्य करीत आहेस त्यांचाच आठवा पुत्र तुझा काळ ठरणार आहे.'' कंस आपल्या बहिणीचा - देवकीचा - वध करण्यासाठी धावला. वसुदेवाने त्याची विनवणी करून देवकीला वाचविले. परंतु ''आमच्या आठव्या पुत्रापासून तुझ्या जिवाला धोका असेल तर आमचा

आठवा पुत्र जन्मताच आम्ही तुझ्या हवाली करू'' असे त्याने कंसाला सांगितले. संतापलेल्या कंसाने ते मानले पण वसुदेव आणि देवकीला त्याने कारागृहात टाकले, कड्याकुलुपात बंद आणि नंग्या तलवारींचा सभोवार पहारा ठेवला.

यथावकाश देवकीला पहिला पुत्र झाला. पण तो पहिला की आठवा हे कसे ठरविणार? म्हणून त्याने वसुदेव - देवकीचे पहिलेवहिले अपत्यही ठार मारण्याचे ठरवले. देवकीच्या मांडीवर पडून, डोळे मिटून दूध पिणारे तान्हुले खसकन् ओढले आणि कारागृहाच्या भिंतीवर आपटून ठार मारले. वसुदेव - देवकी दुःखाने वेडेपिसे झाले. कंसाचे ते क्रौर्य पाहून देवकी मूर्च्छित पडली.

त्यानंतर हे नेहमीचेच झाले. दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे, सहावे असे सहाही पुत्र कंसाने असेच मारले. सातव्या वेळी देवकी गर्भवती झाली, पण नऊ महिने पूर्ण होण्याआधीच तिच्या पोटातील गर्भ नाहिसा झाला. तो गर्भ रोहिणीच्या पोटी रुजला. रोहिणी ही वसुदेवाचीच दुसरी पत्नी होती. तिला पहिला मुलगा झाला पण तो देवकीचा सातवा पुत्र होता. त्याचे नाव बलराम. तो वसुदेवाचा ज्येष्ठ पुत्र म्हणून जन्मला. कारागृहाबाहेर त्याचा जन्म झाला त्यामुळे तो कंसाच्या ध्यानीमनीही आला नाही.

त्यानंतर देवकीला आठव्यांदा दिवस गेले. कंस जास्त चिंताक्रांत झाला. पहारा आणखीनच वाढला. देवकीने वसुदेवाला कळवळून विनवणी केली. ''नाथ, काही झाले तरी हा पुत्र कंसाच्या हाती पडू देऊ नका. आठ मुलांची माता होऊनही मला निपुत्रिक म्हणून मरायचे नाही.''

देवकीला कळा येत होत्या पावसाने जणू कंसाचीच बाजू घेतली होती. तो मुसळधार कोसळत होता. थंडगार वाराही सुटला होता. कंस आपल्या महालात चिंताग्रस्त बसला होता. मुलाच्या पहिल्या - वहिल्या रडण्याच्या आवाजाची वाट पहात होता. त्याला मारून टाकण्यासाठी तो अधीर झाला होता.

अशा अवघड परिस्थितीत देवकीचे आठवे बाळ जन्माला आले. ते जन्माला येताच कोठडी प्रकाशाने भरून गेली. कोठडीत स्वर्गीय सुगंध पसरला. बाळाच्या ओठावर मंद स्मित उमटले. देवकीच्या चेहऱ्यावर समाधान फुलले. आवाज न करता वसुदेवाने कोठडीत पडलेल्या एका टोपलीत जुनीपानी अंथरुणे-पांघरुणे पसरली. त्यात ह्या तान्हुल्या बाळाला ठेवले आणि तो त्वरेने कोठडीबाहेर निघाला. कोठडीला लावलेली कुलुपे आपोआप उघडली गेली. सुस्तावलेले पहारेकरी घोंगडी पांघरून गाढ झोपलेले होते. झपझप पावले टाकीत वसुदेव यमुनाकिनारी आला.

यमुना नदी दुथडी भरून वहात होती. तिच्या पुराचे पाणी चहुकडे पसरले होते. दृष्टी जाईल तेथवर पाणीच पाणी होते आणि वसुदेव त्या वाढत्या पुराच्या पाण्यात शिरला. बेभान

होऊन चालत राहिला. तो जसजसा पुढे जात होता तसतसे पुराचे पाणी ओसरत होते. वसुदेवाचा पुढील मार्ग मोकळा होत होता. वसुदेव हे अघटित पाहून आश्चर्यचकित होत होता. पण त्याच्या डोक्यावरील तान्हुले सुरक्षित होते. तो तसाच त्याच्या परम मित्राच्या - नंदाच्या घरी पोहोचला. नंदाची पत्नी यशोदा नुकतीच एका कन्येची आई झाली होती. वसुदेवाने आपल्या टोपलीतील बाळ यशोदेच्या कुशीत ठेवले. तिच्या कुशीतील नवजात कन्या आपल्या टोपलीत ठेवली आणि आल्या पावली परत फिरला. देवकीच्या पोटी जन्माला आलेला तिचा आठवा पुत्र नंद आणि यशोदेच्या घरी लहानाचा मोठा झाला. हाच तो श्रीकृष्ण - भगवान श्रीकृष्ण.

प्रश्न:

१) श्रीकृष्णाचे वर्णन करणारे कोणते शब्दसमूह कथेत आले आहेत?

शूर/पराक्रमी पुरुष	न्यायाची चाड बाळगणारा
सुंदर देखणे व्यक्तिमत्त्व	पांडवांचा पाठीराखा
महापुरुष/गोपींचा खेळगडी	कार्यप्रवृत्त करणारा
धनाचा मोह असणारा	चोरून लोणी खाणारा
प्रजेचे हित जपणारा	द्वारकेचा राजा

२) नगरीचा एक राजा या नात्याने कंसाचे प्रजेबरोबरचे वागणे/व्यवहार कसा होता?

३) जोड्या लावा.

भगवद्गीता	मैत्रीस जागणारा
श्रीकृष्ण	पुत्रापुढे हतबल
उग्रसेन	क्रूर, स्वार्थी
कंस	धैर्यवान
वसुदेव	महत्त्वाचा ग्रंथ
नंद	देवकीचा तान्हा

४) व्यक्ती आणि नाती यांच्या योग्य जोड्या लावा.

कृष्ण, बलराम	मायलेक
उग्रसेन, कंस	पिता पुत्र
वसुदेव, देवकी	भाऊ - भाऊ
कंस, देवकी	पती, पत्नी
रोहिणी, बलराम	भाऊ बहिण

८. पांडवांचे शिक्षण

पंडू राजा आपल्या दोन राण्या कुंती आणि माद्री आणि आपले पाच पुत्र - पाच पांडव ह्यांच्यासह आनंदाने वनात रहात होता. कुंती आणि माद्री ह्यांच्या अंगाला स्पर्शही नको म्हणून तो अतिशय व्रतस्थ जीवन जगत होता. आपले राज्य, आपल्या मुलांचा त्यातील वाटा, राजवैभव अशा कुठल्याच गोष्टी त्याच्या मनात देखील येत नव्हत्या. आपल्या मुलांशी खेळण्यात, त्यांच्या बाललीला पहाण्यात त्यांचा दिवस कसा जाई, हे त्यांचे त्यांनाच कळत नव्हते.

पण अचानक काहीतरी अघटित घडून गेले. पाणी भरण्यास गेल्यामुळे ओलेत्या झालेल्या माद्रीच्या कमरेला पंडू राजाचा हात नकळत लागला. ''तुझ्या पत्नीला तुझा स्पर्श जरी झाला तरी तुझा प्राण जाईल.'' हा किंदम ऋषींनी दिलेला शाप त्याच्या डोळ्यासमोर चमकून गेला आणि दुसऱ्याच क्षणी तो धाडकन् खाली कोसळला. माद्री त्याच्याकडे धावली पण पंडूचे प्राण गेले होते. माद्री त्याच्या कलेवरावर कोसळली. धाय मोकलून रडली आणि पंडू राजाबरोबरच सती गेली. ''माझ्या नकुल - सहदेवांचा सांभाळ करा'' असे तिने कुंतीला सांगितले आणि त्यांना कुंतीच्या पदरात ठेवले.

वास्तविक कुंतीही माद्रीएवढीच दु:खी झाली होती, गलबलून गेली होती, उध्वस्त झाली होती. पण आपल्या पाच लहानग्यांकडे पाहून ती अस्वस्थ होती. ''त्यांचा सांभाळ मी एकटी आता कशी करू?'' अशा विचारांनी ती सैरभैर झाली होती. पण वनातील सर्व ऋषीमुनींनी तिची समजूत काढली. तिला शांत केले. ''मुलांच्या भवितव्याचा विचार करणे आवश्यक आहे. तू आता दु:ख करू नकोस. ह्या मुलांना घेऊन तू आता हस्तिनापूरला जावेस. आम्ही तुझ्याबरोबर येतो'', असे सांगितले. तिला घेऊन ते हस्तिनापूरला निघाले.

कुरू कुलाचे ज्येष्ठ, वरिष्ठ भीष्माचार्य ह्यांच्याकडे ते आले. त्यांच्याकडे त्यांनी पंडू आणि माद्री ह्यांचे अस्थिकलश दिले. कुंतीने आपल्या पाच पुत्रांसह भीष्माचार्यांच्या पायावर डोके ठेवून त्यांचा आशीर्वाद घेतला. भीष्माचार्यांनी पाचही पांडवपुत्रांना आपल्या कवेत घेतले आणि ते कुंतीसह पंडू राजाच्या महालात आले. तेव्हांपासून ते सर्व पंडू राजाच्याच महालात राहू लागले.

भीष्माचार्यांनी पांडवांचे उपनयन केले. इतर धार्मिक विधी केले आणि त्यांना आवश्यक ते सर्व शिक्षण देण्यास सुरुवात केली.

कुरू कुलाचे आचार्य द्रोणाचार्य हे त्यांचे प्रमुख आचार्य होते. इतर कौरव पुत्रांबरोबर पांडवही शिक्षण घेऊ लागले. त्यांची बुद्धिमत्ता तीव्र होती. शिकवलेली कुठलीही गोष्ट ते पटकन आत्मसात करीत. त्यांचे रूप गोंडस होते. ते अतिशय नम्रतेने आणि आर्जवीपणे बोलत असत. सदैव स्मितहास्य त्यांच्या चेहऱ्यावर दिसे. ह्या सर्व गुणांमुळे ते लवकरच राजवाड्यातील सर्वांचे अतिशय लाडके झाले.

ते सर्व खेळातही कायम पुढे असत. चपळ असल्यामुळे सहजपणे जिंकत असत. भीम आडदांड आणि खोडकर असल्यामुळे त्याची सतत दंगामस्ती चालू असे. पण प्रत्येकाची विशेष आवड वेगवेगळ्या विषयात, कलेत आणि शस्त्रास्त्रात होती. युधिष्ठिर हा वेद-विद्या-धर्म-यम-नियम-चर्चा ह्या बाबतीत विशेष ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करी. अर्जुन धनुष्यबाण लीलया हाताळीत असे. भीमाला गदा फिरविणे आणि कुस्ती खेळणे ह्यात विशेष रुची होती. नकुल आणि सहदेव तर अतिशय राजबिंडे होते आणि त्यांची गती सारथ्य, अश्व, रथ ह्या विषयांत सर्वांपेक्षा जास्त होती.

सर्वांना शिक्षण सारखेच मिळे. पण विशेष रुची असलेल्या विषयात, विशेष गती असलेल्या विषयांत त्यांना अधिक शिक्षणही मिळत असे.

ह्या बरोबरच राजवाड्यातील चालीरीती, थोरामोठ्यांचा मानसन्मान, ऋषीमुनींचे आतिथ्य, दरबारातील कामाची पद्धत ह्या विषयांचे ज्ञानही त्यांना सोदाहरण दिले जात असे.

वनविहार, जलविहार, धनुर्विद्या, मल्लविद्या, गदायुद्ध, वेदविद्या, यमनियम, न्याय अशा विविध विषयांचे शिक्षण त्यांना गुरु द्रोणाचार्य स्वत: देत असत. त्या त्या विषयांतील परीक्षा घेतल्यामुळे प्रत्येकाची त्या त्या विषयांतील समज पारखली जाऊ शकत असे आणि त्याप्रमाणे त्यांचे शिक्षण वरच्या पायरीवर सरकत असे.

परंतु त्यांच्या बरोबरीने शिकणाऱ्या कौरवांच्या मनात मात्र पांडवांविषयी पराकोटीचा द्वेष निर्माण झाला होता व तो वाढतच होता.

प्रश्न:

१) विद्यार्थी दशेतील पांडवांचे कोणते गुण तुमच्यात आहेत, असे तुम्हाला वाटते? योग्य शब्दांसमोर '√' अशी खूण करा.

नम्रता	तीव्रबुद्धी	आतिथ्यशीलता
आर्जवीवृत्ती	चपळपणा	आदरभाव
हसतमुख	चालीरीतींचे पालन	

२) तुम्हाला कोणत्या गोष्टी शिकायला आवडेल?



९. लक्ष्यवेध

शंभर कौरव आणि पाच पांडव. सारे कुरूकुलातले राजपुत्र. त्यांनी युद्धकलेत निपुण व्हावे ही तर कुलपरंपराच होती. सगळ्या प्रकारची आयुधे वापरणे आणि त्यात प्राविण्य मिळविणे ही प्रत्येक राजपुत्राची इच्छा-आकांक्षा असायची. त्या इच्छा-आकांक्षांना फुलविणे, त्याची पूर्तता करण्यासाठी त्यांना सक्षम करणे हे गुरुकर्तव्य होते.

त्यांना गुरुही तसेच युद्ध-धुरंधर, सर्व शस्त्रास्त्रात प्रावीण्य असलेले असणे आवश्यक होते. तसेच महागुरु ह्या सर्व राजपुत्रांना लाभले होते : गुरु द्रोणाचार्य.

गुरु द्रोणाचार्य सर्व शस्त्र वापरण्यात नुसते वाकबगारच होते असे नाही. ते त्यात प्राविण्य मिळविलेले अजोड योद्धेही होते. परिस्थितीने गरीब असले तरी ते युद्धकलेत अतिश्रीमंत होते. शिवाय राजनीतीची त्यांना अतिशय उत्तम जाण होती. राजकुलातल्या सर्व गोष्टी त्यांना अवगत होत्या. आपल्या सर्व शिष्यांना फुलविण्याची ताकद त्यांच्यात होती. प्रत्येक राजपुत्राचे गुण जाणून त्याप्रमाणे ते सर्वांना शिक्षण देत होते.

कुरूकुलातले सर्वच राजपुत्र त्यांना यथायोग्य मान देत होते, त्यांचे आज्ञापालन करीत होते. दुर्योधन, दु:शासन, धर्मराज, भीम, अर्जुन आणि इतर सर्व राजपुत्र द्रोणाचार्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी पूर्ण निष्ठेने करीत होते.

द्रोणाचार्य आपल्या सर्व शिष्यांना मल्लविद्या, धनुर्विद्या, गदायुद्ध अशा विद्या शिकवित होते. ममत्त्वाने, प्रत्येक शिष्याच्या प्रगतीकडे लक्ष देत होते. एकाच शिस्तीने त्या सर्वांना प्रत्येक विद्येत प्रावीण्य मिळविण्यासाठी प्रशिक्षण देत होते.

एकदा त्यांच्या मनात आले, आता आपण आपल्या सर्व शिष्यांची परीक्षा घ्यावी. सुरुवात धनुर्विद्येने झाली.

त्यांनी सर्व शिष्यांना एके दिवशी सकाळीच एका झाडाखाली एकत्र केले. परीक्षेची माहिती दिली.

''हे झाड नीट बघा. उंचच उंच आहे. फांद्या हिरव्यागार पानांनी भरलेल्या आहेत. दाट आहेत. झाडावर बरेच पोपट बसलेले आहेत. ते पानापानात लपलेले आहेत. अगदी टोकाच्या फांदीवरही एक पोपट आहे. आता मी प्रत्येकाला बोलावून त्या पोपटाचा डोळा फोडायला सांगणार आहे. तो एकाच बाणात फुटला पाहिजे. मी आजवर तुम्हाला जी धनुर्विद्या शिकविली

त्याची आज परीक्षा आहे. आवाज न करता आता ह्या झाडापासून आपण दूर जाऊ या. एका ठिकाणी उभे राहूया. एकामागून एक अशा प्रकारे मी प्रत्येकाला बोलावीन आणि प्रत्येकाची परीक्षा घेईन.''

द्रोणाचार्यांनी सर्व राजपुत्रांना त्या झाडापासून काही योजने दूर नेले. ठरविलेल्या ठिकाणी सर्वजण उभे राहिले. प्रत्येकजण झाड निरखून पहात होता. पोपटाला शोधीत होता. उंच शेंड्यावर बसलेला पोपट त्यांना दिसत होता. फांद्या हलल्यावर त्यांच्या दृष्टिआड होत होता.

गुरुंनी सांगितल्याबरोबर धर्मराज पुढे झाला. त्याने प्रत्यंचा ताणली आणि बाण चढविला. एकटक तो झाडाकडे बघू लागला.

''धर्मराजा, तयार आहेस?''

''हो गुरुदेव.''

''काय दिसतंय तुला?''

''गुरुदेव, मला झाड दिसतंय, त्याच्या फांद्या दिसतायत, त्यांची पानं दिसतायत.''

''आणखी काही?''

''अधून मधून पोपट दिसतोय, गुरुदेव''

''उत्तम. झाली तुझी परीक्षा.''

धर्मराज हिरमुसला. बाण सोडण्याची संधी त्याला मिळालीच नाही. तो बाजूला झाला.

''दुर्योधना, आता तू ये.'' द्रोणाचार्यांनी दुर्योधनाला सांगितले.

छाती पुढे काढून, राजाच्या थाटात दुर्योधन पुढे झाला. धनुष्याला बाण लावून सज्ज झाला.

''दुर्योधना, तुला काय दिसतंय?''

''गुरुदेव, मला झाड, फांद्या, आकाश सारं काही दिसतंय.''

''पोपट दिसतोय का?''

''नाही, गुरुदेव. तो दिसत नाहीये अजून.''

''दुर्योधना, झाली तुझी परीक्षा.''

''भीम, ऽऽ!'' गुरु द्रोणाचार्यांनी भीमाला हाक मारली.

''पण गुरुदेव, तुम्ही मला पोपट शोधायची संधीच दिली नाहीत.''

दुर्योधन कुरबुरला. ''मग परीक्षा कशी होणार?''

''दुर्योधना, अरे मला जे पहायचे होते, ते मी पाहिले. परीक्षा घेण्यासाठी बाणच सोडायला पाहिजे असे नाही.



आणि तू धनुर्विद्या शिकलेला आहेस.
तुला ती चांगली अवगत आहे''
गुरुदेवांनी दुर्योधनाची समजूत काढली.
भीम आला.
दु:शासन आला.
नकुल आला.
सहदेव आला.
एकामागून एक सर्व शिष्य आले.
बाण चढवून सज्ज झाले.
गुरुदेवांनी प्रत्येकाला तेच प्रश्न विचारले.
''काय दिसतय?''
''आणखी काय दिसतय?''

सगळ्यांची उत्तरे जवळपास सारखीच होती.

कोणाला झाड दिसत होते, कोणाला आकाश! कोणाला फांद्या दिसत होत्या, कोणाला पोपट!

गुरुदेवांनी शेवटी अर्जुनाला बोलाविले.

अर्जुनाने द्रोणाचार्यांना वंदन केले.

धनुष्याला बाण लावला नि एकटक तो झाडात बघू लागला. उंच गेलेले झाड, फांद्या सगळीकडे पसरलेल्या. हिरव्या-हिरव्या पानांनी गच्च भरलेल्या. त्याच्या शेंड्यांवर दिसणारा एक पोपट आणि पोपटाचा एक डोळा! त्या डोळ्यावर दृष्टी स्थिर ठेवून तो एकटक बघत होता.

''अर्जुना, तुला काय दिसतंय?''

''गुरुदेव मला एक डोळा दिसतोय!''

''आणखी काय काय दिसतंय?''

''नाही गुरुजी मला फक्त डोळाच दिसतोय!''

''अर्जुना, तिथे एक झाड आहे ना?''

''गुरुदेव, मला दुसरे काहीच दिसत नाहीये. मला फक्त एक डोळाच दिसतोय.''

''अर्जुना, अरे असे कसे होईल?

इतर सर्वांना झाड, फांद्या, पाने हे सर्व काही दिसले. हे सर्व तुझ्या अगदी समोर आहे. तुला कसे ते दिसत नाही?'' द्रोणाचार्यांनी अर्जुनाला विचारले.

कुरूकुलातील सर्व राजपुत्र हसले.

''असा कसा हा अर्जुन? त्याला इतर काहीच कसे दिसत नाही? काही तरी काय? म्हणे फक्त डोळाच दिसतोय!''

''अर्जुना, पुन्हा एकदा नीट बघ.

मला विचारपूर्वक सांग, पण तुला नक्की जे समोर दिसत आहे तेच सांग''

द्रोणाचार्यांनी अर्जुनाला दटावले.

''नाही गुरुजी. मला डोळ्याव्यतिरिक्त दुसरे काहीही दिसत नाहीये, समोरही येत नाहीये.'' अर्जुनाने नम्रपणे गुरुदेवांना परत तेच सांगितले.

''अर्जुना, ठेव धनुष्याला बाजूला.

झाली तुझी परीक्षा.'' गुरुदेवांनी अर्जुनाला सांगितले.

अर्जुनाची फजिती झाली, त्याला इतर काहीच दिसू शकले नाही म्हणून सगळे कौरवपुत्र आनंदी झाले. धर्मराज, भीम, नकुल, सहदेव मात्र मनातून खट्टू झाले.

अर्जुन बाजूला झाला. पुन्हा एकवार त्याने गुरुदेवांना वंदन केले.

गुरुदेव द्रोणाचार्य पुढे झाले. आपला हात वर करून सर्व राजपुत्रांना शांत केले.

''राजपुत्रांनो, आज आपण तुमच्या धनुर्विद्येतील कौशल्याची परीक्षा घेतली.''

''पण गुरुदेव, धनुर्विद्येची परीक्षा झालीच नाही. कोणीच बाण मारून पोपटाचा डोळा फोडला नाही.'' दुर्योधन म्हणाला.

''दुर्योधना, होय, तू म्हणतोस ते खरे आहे. कोणीच बाण सोडला नाही. कारण अर्जुनाव्यतिरिक्त तो डोळा कोणाला दिसलाच नाही.'' एकट्या अर्जुनालाच फक्त डोळा दिसला आणि डोळ्याव्यतिरिक्त इतर काहीच दिसले नाही. पोपटाच्या डोळ्याचा वेध घेण्याची क्षमता फक्त अर्जुनातच आहे हे त्याने सिद्ध केले. इतर कोणीही नाही. युद्धभूमीवर आपल्याला आपले लक्ष्यच नेमके दिसायला हवे. बाकीच्या इतर गोष्टीच जर आपल्याला दिसत असतील तर आपण लक्ष्यवेध करणार तरी कसा? आपणापैकी प्रत्येकाने बाण सोडला असता तरी पोपटाचा डोळाच आपल्याला दिसला नसेल तर तो फुटणार तरी कसा? पोपट मात्र उडून गेला असता.''

''शिष्यवरांनो, एक गोष्ट पक्की लक्षात ठेवा. अस्त्र कुठले आहे, हे जेवढे महत्त्वाचे आहे, त्यापेक्षा लक्ष्य कोणते आहे आणि कुठे आहे, हे दिसणे आवश्यक आहे. ते आणि तेवढेच आपल्याला दिसले पाहिजे. आपले तन-मन आपण त्या लक्ष्यावरच केंद्रित केले पाहिजे. तरच आपण लक्ष्यवेध करू शकू. अर्जुनाने नेमके तेच केले. बाण सुटला असता तर त्याने लक्ष्यवेध केलाच असता.''

''तुमची धनुर्विद्येची परीक्षा संपली आणि त्यात फक्त अर्जुनच उत्तीर्ण झाला!''

गुरु द्रोणाचार्यांनी धनुर्विद्येच्याच नव्हे तर सर्व युद्धविद्यांचे मर्मच सर्वांना सांगितले.

आपले लक्ष्य ठरवावे आणि तन-मन सर्वकाही त्या लक्ष्यावरच एकाग्रतेने केंद्रित करावे.

प्रश्न: खेळ: निरीक्षण: कृती:

१) कौरव-पांडव कोणत्या कुलातील होते?

२) गुरुकर्तव्य काय असते?

३) गुरु द्रोणाचार्यात कोणता गुण होता?

४) गुरु द्रोणाचार्य सर्व शिष्यांना कसे प्रशिक्षण देत होते?

५) गुरु द्रोणाचार्यांनी कोणती परीक्षा घेतली?

६) प्रत्येक राजपुत्रासमोर कोणते लक्ष्य होते?

७) त्या राजपुत्रांना काय दिसले?

८) अर्जुनाला बोलाविल्यावर त्याने काय केले?

९) त्याला काय दिसले?

१०) ह्या गोष्टीचे सार काय आहे?

११) जवळपास असलेल्या कुठल्याही मोठ्या झाडाजवळ जाऊन त्याचे निरीक्षण करा, त्यावर असलेले पक्षी कोणकोणते आहेत ते बघा.

१२) तुम्ही द्रोणाचार्य आहात असे समजून तुमच्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांची एकाग्रता कशी आहे, ती कशी वाढवता येईल यासंबंधी त्यांच्याबरोबर चर्चा करा.

१३) तुमच्या जवळपास असलेल्या कोणत्याही झाडावर संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी किती पक्षी जमतात ते मोजा.

१४) वेगवेगळ्या झाडांची पाने कशी वेगवेगळी आहेत ते नीट बघा व त्यासंबंधी अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करा.

१५) पोपट किती प्रकारचे असतात त्याची माहिती मिळवा.

१६) एका मोठ्या कागदावर वेगवेगळी चित्रे चिकटवून त्यातल्या कुठल्यातरी एकाच चित्रावर तुमची दृष्टी स्थिर राहू शकते का बघा.



१०. भीमावर विषप्रयोग

कौरव आणि पांडव असे १०५ राजकुमार विविध प्रकारचे प्रशिक्षण घेत होते. भीष्माचार्यांच्या कडक शिस्तीत आणि द्रोणाचार्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सर्वच राजपुत्र तयार होत होते. पण पाचही पांडव सर्वच कलांत आणि शास्त्रांत, अस्त्रांचा वापर करण्यात अधिक कुशल ठरत होते. कौरवपुत्र त्यामुळे चिडत होते. संतापत होते. त्यातल्या त्यात दांडगाई करणाऱ्या बलभीमावर त्यांचा फारच राग होता. (भीम बलवान असल्याने त्याला बलभीमही म्हणत.) दुर्योधनाची फजिती करायची आणि गडगडाटी हसायचे, हा तर भीमाचा आवडता खेळ होता.

दुर्योधनाच्या ध्यानीमनी सतत भीमाचाच विचार असे. काहीही करून त्याला नाहिसे करावे, भीम बाजूला झाला की मग आपल्या वाटेला बाकीचे पांडव जाणार नाहीत, असे त्याला वाटत असे.

त्याने ''आपण सगळे जलविहाराला जाऊया'' असे सर्व पांडवांना सांगितले. जलक्रीडा आणि जलविहार मुक्तपणे करायला मिळणार म्हणून सर्वच पांडव आनंदित झाले. त्यांनी तत्काळ होकार दिला.

दुर्योधनाने जलविहाराला जाण्याचा दिवस नक्की केला आणि तो तयारीला लागला. विविध प्रकारची पक्वान्ने आणि खाण्याचे पदार्थ त्याने स्वत: बल्लवाकडून तयार करून घेतले. लाडू त्याने खास भीमासाठी - त्याला खूप आवडतात म्हणून तयार करून घेतले. त्यात त्याने स्वत: गुंगीची औषधे आणि विष घालून ठेवले होते. हे सर्व लाडू त्याने आपल्या स्वत:च्या ताब्यात घेतले. त्याने भीमाला मारण्याची जय्यत तयारी केली. महाराज धृतराष्ट्राची परवानगी घेतली आणि सर्व कौरव - पांडव जलविहार करण्यासाठी गंगाकिनारी पोहोचले.

सकाळपासून त्यांचे एकत्रित आणि वैयक्तिक असे विविध खेळ सुरू झाले. राजकुमार असले तरी सारे जण मैदानी खेळ खेळण्यात तरबेज होते. दिवसभर विविध प्रकारचे खेळ खेळून सर्वच दमले. त्यांना कडाडून भूक लागली. सगळे जण जेवणावर तुटून पडले. समोर येईल तो पदार्थ संपत होता. स्वत:च्या देखरेखीखाली तयार करून घेतलेले लाडू घेऊन दुर्योधन आला. भीमाला आग्रह करकरून खाऊ घालू लागला. भीमाला प्रचंड भूक लागली होती. तो एकामागून एक ताटे रिकामी करीत होता. त्याने किती लाडू खाल्ले त्याचे त्यालाच समजले नाही. पोट तुडुंब भरून गेले तरी तो खातच होता.

थोडीशी विश्रांती घेऊन, थोडासा दम खाऊन सगळे नदीत उतरले. एकमेकांच्या अंगावर पाणी उडविण्यापासून सुरुवात झाली आणि प्रत्येकजण वेगवेगळ्या प्रकारे, वेगवेगळ्या वेगाने पोहू लागला. एव्हाना भीमाच्या अंगात विष भिनू लागले होते. गुंगीचे औषध त्याच्यावर परिणाम करीत होते. त्याच्या डोळ्यांवर झापड येऊ लागली होती. हे पहाताच दुर्योधन, दु:शासन आणि इतर कौरव राजपुत्रांनी त्याला एका बाजूला ओढत नेले, जवळपास सापडलेल्या पाणवेलींनी बांधून टाकले आणि नदीच्या प्रवाहातील खोलभागी नेऊन सोडून दिले.

शुद्ध हरपलेला, वेलींनी करकचून बांधला गेलेला भीम पाण्याच्या भोवऱ्यात थोडा वेळ वरखाली झाला आणि भोवऱ्याच्या मध्यभागी अडकला. तो तसाच सरळ, खोलवर खाली,

खाली पाण्यात बुडत, बुडत दिसेनासा झाला. पाण्यावर काही वेळ बुडबुडे येत राहिले. पाण्यातला भोवरा मात्र तसाच फिरत राहिला. नदीच्या पृष्ठभागी दिसणारे भोवऱ्याचे तोंड कळेल - न कळेल असे संथपणे फिरत होते. त्याचा पाण्याखालील खोलवर गेलेला भाग मात्र अतिवेगाने पाणी मध्यभागी ओढून घेत तळाशी नेत होता. पाणवेलींनी घट्ट बांधलेल्या भीमाचे गाठोडे पाण्याच्या भोवऱ्यात गरगर फिरत पाण्याच्या तळाशी जाऊन आदळले.

प्रश्न:

१) दुर्योधन व इतर कौरव पांडवांचा द्वेष का करत होते?

२) दुर्योधनाचा स्वभाव स्पष्ट करणारे दोन शब्द सांगा.

अविचारी   आततायी

कपटी   कारस्थानी

३) भीमाच्या कोणत्या गुणदोषांमुळे तो संकटात सापडला?

४) खालील कोड्यात लपलेले या कथेतील १० शब्द ओळखा.

काही शब्द आडव्या ओळीत, काही उभ्या ओळीत तर काही तिरक्या ओळीत आहेत. काही अक्षरे सामाईक आहेत.

कौ	ए	पां	ऊ	छ	ग	आ	थ
थ	र	ड	रा	ऐ	उ	थ	ज
ब	ल्ल	व	पा	णी	ब	द्द	गं
ल	भो	ट	ण	ट	ण	रू	गा
मी	ऊ	फ	वे	दु	र्यो	ध	न
म	द	ज	ल	वि	हा	र	दी



११. अमृतकुंभ

गंगाविहार उत्तमपणे पार पडला. अंधारून आले. ''राजगृही जायला उशीर होईल, तसे झाले तर महाराज धृतराष्ट्र, गांधारीदेवी आणि कुंतीदेवी सर्वच काळजी करत राहतील त्यामुळे आपण लगेचच निघू या, चला लवकर, लवकर!'' असे म्हणून दुर्योधनाने सर्वांना हस्तिनापुरी जाण्यासाठी तयार केले. प्रत्येक जण भराभरा समोर असेल त्या रथात बसून पुढे निघाला. कोण कुठे बसले आहे, सर्वजण आले आहेत की नाही, हे बघावे असेही कोणाला वाटले नाही. सगळेच खूप थकलेले होते.

हस्तिनापुरी आल्यावर सर्वजण आपापल्या गृहात परत आले. बराच वेळ झाला, पण भीम मात्र कोणालाच दिसला नाही. युधिष्ठिर, अर्जुन, नकुल, सहदेव ह्या सर्वांना कुंतीने विचारले. पण कोणालाच काही माहीत नव्हते. प्रत्येकजण दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात राहिला. त्यांनी दुर्योधनाला विचारले. ''भीम खेळून आणि खूप खाऊन सुस्तावला होता. तो बहुधा आपल्या आधीच परत आला आहे'' असे उत्तर त्यांना मिळाले. त्यांनी परत राजवाड्यात सर्वत्र भीमाचा शोध सुरु केला. भीम कुठेच नव्हता. कुंतीने सर्वांनाच जाब विचारला आणि विदुराला बोलावणे पाठवले. तो येताच तिने विदुराच्या कानावर सर्व प्रकार घातला. पांडव आणि काही कौरव सैनिक भीमाच्या शोधासाठी गंगाकिनारी निघाले, परंतु त्यांना यश आले नाही.

पाणवेलींनी घट्ट बांधलेल्या भीमाचे गाठोडे पाण्याच्या भोवऱ्यात गरगर फिरत पाण्याच्या तळाशी जाऊन आदळले. आपल्या नागलोकाचे रक्षण करणाऱ्या वासुकीला ते हादरे जाणवले आणि तो तत्परतेने पुढे झाला आणि भीमाला घेऊन तो नागलोकात पोहोचला. तेथील सर्व नागदेवतांनी भीमाभोवतीच्या सर्व पाणवेली तोडून प्रथम भीमाला मोकळे केले. त्याला एका भव्य मंचकावर झोपवून त्याची शुश्रूषा केली. हळूहळू त्याच्या शरीरातील सर्व विष त्यांनी शोषून घेतले. त्याच्या महाकाय देहातील सर्व शिथिलपणा त्यांनी दूर केला. थोड्याच दिवसात भीम परत पहिल्यासारखाच ताकदवान, जलदगती, तीक्ष्णबुद्धी असा पांडव झाला. नागलोकांत गेल्यापासून बऱ्याच नागदेवता त्याच्यावर लुब्ध झाल्या होत्या. भीमाने आता नागलोकातच रहावे व त्यांच्या प्रेमाचा स्वीकार करावा, असा आग्रह त्या त्याला करू लागल्या. नागराज वासुकीनेही त्याला तसाच आग्रह केला. आपल्या कन्येचा स्वीकार

करून भीमाने नागलोकातच रहावे, म्हणून नागलोकाचे राज्य त्याला देऊ केले. भीमाने त्याला सत्य परिस्थिती सांगितली. विषप्रयोग झाला असण्याची शक्यताही बोलून दाखवली.

वासुकीने त्याला जीवन तर दिलेच होते, पण ह्यापुढे असा विषप्रयोग भीमावर झालाच तर त्याच्या परिणामापासून तो मुक्त राहावा म्हणून वासुकीने त्याला अमृत प्यायला दिले. नागलोकात असलेले अमृतकुंभाचे आठ रांजण भीम प्यायला. तेव्हा कुठे त्याची तहान भागली. वासुकीने त्याला सुवर्णालंकार देऊन त्याचा आदरसत्कार केला व त्याला पुन्हा गंगाकिनारी आणून सोडले. पाण्याच्या मध्यभागातून किनाऱ्याकडे चालत येणाऱ्या भीमाला पहाताच आजूबाजूचे सर्वच लोक आश्चर्यचकित झाले. तो तेथून तडक राजगृही येऊन कुंतीच्या पाया पडला. सर्व बंधूंना भेटला. त्यांना झालेला सर्व प्रकार सांगितला. दुर्योधनाच्या

कारस्थानाविषयी शंका बोलून दाखवली. दुर्योधनाच्याच नव्हे तर सर्वच कौरवांच्या मनात पांडवांविषयी किती विष कालवले गेले आहे हे सगळ्या कुरूकुलासमोर आले.

प्रश्न:

१) नागराज वासुकी आणि इतर नागदेवतांनी भीमाला कशाप्रकारे मदत केली?
   अ) विष शोषून घेतले.
   ब) अमृत दिले
   क) नागलोकात राहण्याचा आग्रह केला.

२) भाऊ म्हणून कौरवांचे पांडवांशी वागणे योग्य होते का? भावंडांनी एकमेकांशी कसे वागायला हवे?

३) या कथेत आलेल्या शब्दांपैकी काही शब्द खाली दिले आहेत. त्यापासून शब्द कोडे तयार करा.
   शब्द : अमृत, नकुल, अर्जुन, कुरकुल, जीवन, कौरव

१२. कंस वध

आपल्या पित्यालाच कारागृहात टाकून कंस मथुरेचा राजा झाला. राजा झाल्यावर त्याने संपूर्ण राज्यावर आपली दहशत बसवायला सुरुवात केली. त्याने केलेल्या अनन्वित अत्याचारांनी प्रजा त्रासून गेली. त्याचे अत्याचार मूकपणे सहन करण्याव्यतिरिक्त प्रजा काहीच करू शकत नव्हती. त्याला प्रतिकार करणे अशक्यच होते. त्याच्याविरुद्ध एक अक्षरही उच्चारणे म्हणजे प्राण गमावणे, हे सूर्यप्रकाशाएवढे प्रखर सत्य होते.

आठव्या वेळी देवकी प्रसूत झाली आणि झालेल्या बाळाने जन्मताच जोरजोराने रडायला सुरुवात केली. तिच्या आक्रोशाने सारी बंदिशाळा खडबडून जागी झाली. घोंगड्या फेकून देऊन पहारेकरी सजग झाले. नंग्या तलवारींचा पहारा सुरु झाला. ताडताड पावले टाकित कंस कारागृहाकडे आला. देवकीने छातीशी घट्ट धरलेल्या बाळाला त्याने हिसकावून घेतले. बाळाचे पाय धरून त्याने त्याला गरगर फिरवले आणि कारागृहाच्या भिंतीवर आपटले. विकट हास्य करून त्याने असहाय्य देवकीकडे पाहिले आणि तो संतापाने वेडापिसा झाला. त्याच्या हातातून ते बाळ निसटून गेले होते. ती एक मुलगी होती. क्षणार्धात ती मुलगी विजेसारखी आकाशात चमकली आणि नंतर कडाडली. ''राजा तुला मारणारा, देवकीचा आठवा पुत्र सुरक्षित आहे.''

गोकुळात नंदाच्या घरी मात्र यशोदेचे बाळ पहाण्यासाठी गर्दी उसळली होती. जन्मत:च हसणारे असे तेजस्वी बाळ सर्वजण पहिल्यांदाच पहात होते. त्याचा नामकरणविधी झाला आणि त्याचे नाव 'कृष्ण' असे ठेवण्यात आले.

कंसाला ह्याची काहीच कल्पना नव्हती. पण आपल्याला मारणारे बाळ सुरक्षित आहे ह्या जाणिवेने तो अस्वस्थ होता. त्याने मथुरेतील एक-दोन दिवसाच्या सर्व बाळांना मारण्याचा सपाटा लावला. असंख्य मातांनी त्याला शिव्याशाप दिले. मथुरेच्या जवळपास असलेल्या सर्व गावात त्याने आपले सेवक पाठविले. त्यांनी असंख्य नवजात अर्भके मारली. पण ते सर्व श्रीकृष्णापर्यंत पोचू शकले नाहीत. त्याच्या आधीच त्यांचे मरण ओढवले. कसे झाले, त्यांना कोणी मारले, हे कोणालाच कळले नाही.

तरीही कंसाला समजले की, श्रीकृष्ण हा जरी नंद - यशोदा ह्यांच्या घरी वाढत असला तरी तोच देवकीचा आठवा पुत्र आहे, तोच आपला वध करणार आहे, त्याला एक बलराम नावाचा मोठा भाऊ आहे. हे सर्व त्याच्या कानावर आले होते. कपटाने त्यांना मारण्याचे सर्व

प्रयत्न फसले होते. वयाने लहान असूनही दोघे अत्यंत चपळ होते. बलवान होते. त्या दोघांना युक्तीप्रयुक्तीने मथुरेत आणावे आणि देवकीच्या इतर बाळांना आपण जसे मारले तसे सर्व मथुरावासीयांसमोर त्यांनाही मारावे असे त्याने ठरविले.

मथुरेत त्याने एक महोत्सव आयोजित केला. नागरिकांच्या मनोरंजनासाठी त्याने अनेक कार्यक्रम आयोजित केले. खाण्यापिण्याची रेलचेल केली. सर्व प्रजाजनांना खूष ठेवण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला आणि ह्या कार्यक्रमासाठी त्याने बलराम आणि कृष्ण ह्यांना खास आमंत्रित केले. त्यांचा आदरसत्कार केला. मल्लयुद्ध चालू असताना त्याने बलराम आणि कृष्ण ह्या दोघांनाही आपल्या चाणूर नावाच्या मल्लाशी कुस्ती खेळण्यास सांगितले. चाणूर हा कंसाच्या दरबारातील एक महाबलवान दैत्य मल्ल होता. त्याच्यापुढे आजवर कोणत्याच दुसऱ्या मल्लाचा टिकाव लागला नव्हता. त्याच्या एकाच पकडीत बलराम आणि कृष्ण ह्यांच्यासारखी चिमुरडी, ८ - १० वर्षांची मुले सहजपणे मरणार होती.

कंसाने विचारताच बलराम आणि कृष्ण दोघेही चाणूराशी कुस्ती खेळण्यास तयार झाले आणि कंसाला काही कळायच्या आतच चाणूराला मारून ते उडी मारून कंसासमोर उभे ठाकले. कंसाने त्यांना पोरे समजून झटकून टाकायचा अतोनात प्रयत्न केला. पण कृष्णाने त्याला मारलेल्या मगरमिठीतून तो स्वत:ला सोडवू शकला नाही. कृष्णाने त्याच्या असे काही वर्मी गुद्दे मारले की कंस धाडकन् कोसळला. रक्त ओकत खाली पडला, तो उठलाच नाही. देवकीच्या आठव्या बाळाने - श्रीकृष्णाने - त्याचा वध केला. श्रीकृष्णाने आपल्या मातापित्याची वसुदेव - देवकीची - कारागृहातून मुक्तता केली. मथुरावासीयांनी कृष्ण - बलरामाचा जयजयकार केला.

प्रश्न:

१) मथुरेचा राजा झाल्यावर कंस प्रजेशी कसा वागला? राजाने प्रजेशी कसे वागायचे असते?

२) श्रीकृष्ण आणि बलराम बालवयात चपळ आणि बलवान होते. शरीर सुदृढ व्हावे अंगी चपळता यावी यासाठी तुम्ही कोणते प्रयत्न करता?



१३. अंगराज कर्ण

कौरव आणि पांडव ह्यांचे शिक्षण एकत्रच चालू होते. गुरु द्रोणाचार्यांच्या कडक शिस्तीत ते शिकत होते. सर्व शास्त्रांत आणि अस्त्रांत गुरु द्रोणाचार्य अत्यंत निष्णात होते. त्यामुळे त्यांच्या सर्वच शिष्यांचा दर्जाही सर्वसामान्यांपेक्षा जास्त उंच होता. शिवाय ते राजकुमार असल्यामुळे सर्व सामान्यांपेक्षा विशेषत्वाने वेगळेही होते. गुरु द्रोणाचार्य स्वतः त्यांनी सर्व राजकुमारांना दिलेल्या शिक्षणाबाबत समाधानी होते. आपल्या शिष्यांच्या प्रगतीवर आणि त्यांनी आत्मसात केलेल्या कौशल्यावर खूष होते.

सर्वसाधारणपणे, आपल्या शिष्यांनी आत्मसात केलेली विद्या आणि कौशल्य सर्वांनी पहावे अशी प्रत्येक गुरुची इच्छा असते. गुरुने आपल्या शिष्यांना काय काय शिकविले आहे ते सगळ्या लोकांना कळावे, असेही गुरुला वाटत असते. त्यामुळे त्यांच्या शिष्यांची क्षमता आणि गुरूंची महतीही लोकांना कळते. गुरु द्रोणाचार्यांच्या मनातही असाच विचार आला. आपण कौरव-पांडव राजकुमारांना काय काय शिकविले आहे, हे राजा धृतराष्ट्र, राणी गांधारी, कुंतीमाता, अमात्य विदुर आणि राजघराण्यातील इतर सर्वांना कळावे, तसेच जनतेलाही कळावे ह्या हेतूने त्यांनी सर्व राजपुत्रांच्या शस्त्रास्त्र कौशल्यांचे प्रात्यक्षिक होईल असा एक महामहोत्सव आयोजित केला. त्यासाठी आखाडे, मैदाने, अश्व, सर्व काही सुसज्ज केले.

प्रात्यक्षिकाच्या दिवशी सर्व नगरवासी उत्साहाने जमले. प्रेक्षागारे भरून गेली. आपले राजकुमार काय शिकले आहेत हे पहाण्याची इच्छा सर्वांनाच होती. किंबहुना त्यांची उत्कंठा वाढलीच होती. राजा धृतराष्ट्र, गांधारीदेवी, कुंतीमाता, विदुर ह्या सर्वांच्या उपस्थितीत प्रात्यक्षिके सुरू झाली.

कौरव-पांडव राजकुमारांनी, सर्वांनी मिळून, प्रथम सांघिक प्रात्यक्षिके दाखवली. धनुर्विद्या, मल्लविद्या, गदायुद्ध, अश्वारोहण, तलवारबाजी, भालाफेक, अशी एक अन् अनेक शस्त्रास्त्रांची प्रात्यक्षिके त्यांनी करून दाखवली. गजारोहण आणि अश्वारोहण ह्यांचीही अनेक कौशल्ये त्यांनी सहजपणे सादर केली. अनेक जणांनी अनेकविध शस्त्रास्त्रांनी केलेला हल्ला कसा परतवून लावायचा ह्याचेही प्रात्यक्षिक करून दाखविले.

आपल्या राजकुमारांनी विद्याभ्यास उत्तम प्रकारे केलेला आहे आणि गुरु द्रोणाचार्य असल्यामुळेच हे होऊ शकले आहे हे सर्वांना समजले. राजा आणि प्रजा दोघेही मनोमन

निश्चिंत झाले. आपण सर्वच विद्या चांगल्या प्रकारे शिकू शकलेलो आहोत हे सर्व कौरव-पांडव राजकुमारांनाही समजले.

ह्यानंतर द्रोणाचार्यांच्या आज्ञेने अर्जुन मैदानात उतरला. त्याने विविध शस्त्रास्त्र चालविण्याचे कौशल्यपूर्ण प्रात्यक्षिक सादर केले. पळत्या घोड्यावरून उडणारा पक्षी टिपणे, एका घोड्यावरून जात असताना दुसऱ्या पळत्या घोड्यावर स्वार होणे, केवळ आवाजाच्या रोखाने पळत्या जनावराची शिकार करणे, एकामागून एक बाण सोडून एखादे प्रवेशद्वार बंद करणे अशी एक अन् अनेक प्रात्यक्षिके त्याने सादर केली. त्याच्या कौशल्यपूर्ण प्रात्यक्षिकांनी सर्वच आश्चर्यचकित झाले आणि जोरजोराने घोषणा देऊन अर्जुनाचे कौतुक करू लागले. राजा धृतराष्ट्र, गांधारीदेवी, कुंतीमाता, विदुर सारेच अर्जुनाची वाहवा करू लागले.

तेवढ्यात एक तरूण ताडताड पुढे झाला. राजा धृतराष्ट्राला त्याने वंदन केले. गुरु द्रोणाचार्यांना त्याने वंदन केले. अर्जुनाने सादर केलेली सर्व प्रात्यक्षिके त्यानेही तितक्याच कौशल्याने सादर केली. त्याच्या हालचालीत स्वतःच्या क्षमतेचा आणि आत्मविश्वासाचा गौरव दिसत होता. त्याची प्रात्यक्षिके पाहून सर्वजण थक्क झाले. पण तो तरूण त्यावर संतुष्ट नव्हता. त्याने अर्जुनाला द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिले. तो त्याच धुंदीत मैदानाच्या मधोमध उभा राहिला. अर्जुन आणि द्रोणाचार्य ह्यांच्याकडे कुत्सित नजरेने पहात त्याने पुन्हा एकवार सांगितले, ''मी अर्जुनाने दाखविलेली सर्व प्रात्यक्षिके करून दाखवली आहेत. त्याने आता माझ्याशी द्वंद्व करावे.''

गुरु द्रोणाचार्य पुढे होऊन म्हणाले, ''द्वंद्व हे समसमान योग्यतेच्या, घराण्याच्या, क्षमतेच्या व्यक्तींमध्ये होऊ शकते. अर्जुन हा राजकुमार आहे. आपण आपले कुल-शील सांगितलेत तर आपण द्वंद्वाचा विचार करू शकतो.'' हे ऐकल्याबरोबर तो वीर निराश झाला. मैदानात चहुबाजूंनी भरलेल्या जनसमुदायाकडे पाहू लागला. राजा धृतराष्ट्राकडे तो दीनवाणेपणे बघून त्यांच्या मदतीची वाट पाहू लागला.

दुर्योधन तिथेच होता. धृतराष्ट्रानंतर त्यांचा ज्येष्ठ पुत्र म्हणून कौरव कुलातील तोच राज्याचा भावी वारसदार आहे असे त्याला वाटत होते. तो ताबडतोब पुढे झाला. त्या वीराजवळ जाऊन त्याने त्याचा हात उंचावून धरला. ''केवळ कुळ मोठे म्हणून आज अर्जुन मोठा ठरला आहे. परंतु कुळापेक्षा पौरुष आणि शौर्यच माणसाची योग्यता ठरविते. ह्या वीराने आज हेच येथे सिद्ध

केले आहे. म्हणून मी आजपासून ह्या वीराला अंगदेशाचा राजा म्हणून घोषित करीत आहे. त्याचा राज्याभिषेकही आता येथेच करीत आहे.'' असे घोषित केले. त्याच्या डोक्यावर राजमुकुट ठेवून त्या वीराला दुर्योधनाने अंगदेशाचा राजा केले. तो तरुण वीर दुर्योधनाच्या ह्या औदार्याने भारावून गेला. ''राजा, मी तुला वचन देतो की ह्या क्षणापासून मी माझ्या जिवात जीव असेतोवर तुझ्यासाठी माझे जीवन खर्च करीन. माझ्या सर्वस्वावर केवळ तुझाच हक्क राहील'' असे म्हणून त्या वीराने दुर्योधनाला वाकून नमस्कार केला. आणि पुढे आयुष्यभर दुर्योधनाची सोबत केली. त्या वीराचे नाव होते कर्ण! अंगराज कर्ण!

प्रश्न:

१) कर्णाबद्दल तुमच्या मनात कोणती भावना निर्माण होते? (√) खूण करा.

दया   कीव   अभिमान

राग   दुःख   हळहळ

२) माणसाची योग्यता ठरविण्यासाठी काय आवश्यक आहे? (√) खूण करा.

घराणे   पराक्रम   प्रतिष्ठा   श्रीमंती

३) माणसाची योग्यता व .... यांचा घनिष्ठ संबंध असतो.

रिकाम्या जागी पुढीलपैकी योग्य शब्द लिहा.

(पराक्रम, शौर्य, शिक्षण, सौंदर्य, धनदौलत)

१४. द्रुपदाचा पराभव

गुरु द्रोणाचार्यांनी विविध प्रकारचे शिक्षण कौरव पांडवांना दिले. राजकुमारांना आवश्यक असे राज्यकारभार करण्याचे शिक्षण, न्यायनिवाडा, धर्मशास्त्र, शस्त्रास्त्रविद्या, अश्वारोहण, गजारोहण ह्या सर्व गोष्टींचे शिक्षण त्यांनी कौरव आणि पांडव राजकुमारांना दिले. त्यांनी आत्मसात केलेल्या सर्व गोष्टी त्यांना व्यवस्थित समजल्या आहेत ह्याची त्यांनी खात्री करून घेतली. राजा धृतराष्ट्र, गांधारीदेवी, कुंतीमाता, विदुर आणि हस्तिनापूरच्या प्रजेला तशी खात्री पटवून दिली. राजा आणि प्रजा दोघांनीही सर्व राजकुमारांचे कौतुक केले. गुरु द्रोणाचार्यांनी दिलेल्या शिक्षणाचे सार्थक झाले. गुरु द्रोणाचार्यांचे समाधान झाले.

पण त्यांना असे वाटले की आपण आता आपल्या शिष्यांकडून काहीतरी दक्षिणा घ्यावी. गुरुदक्षिणा मागावी. मग त्यांनी सर्व कौरव-पांडवांना एकत्र बोलाविले. त्या सर्वांनी मिळून राजा द्रुपदाचा पराभव करावा आणि सर्वांनी त्याला पकडून आणावे अशी मागणी केली.

गुरु द्रोणाचार्य हे द्रुपदाचे समवयस्क. दोघेही एके काळी खूप जवळचे मित्र होते. राजा यज्ञसेन द्रुपद जरी द्रोणाचार्यांचा जवळचा मित्र असला, तरी द्रोणाचार्य पूर्वी अतिशय गरीब होते. एकदा घरच्या दारिद्र्याला कंटाळून द्रोणाचार्य राजा द्रुपदाकडे गेले. राजा द्रुपदाने त्यांना अर्धे राज्य देण्याचे वचन दिले होते. त्याची द्रोणाचार्यांनी राजाला आठवण करून दिली. परंतु राजाने ''केवळ एक दुभती गाय दिली तरी चालेल'' असेही राजाला विनविले. राजा द्रुपदाने भर दरबारात त्यांचा अपमान केला. ''मी पांचाळ नरेश आहे. तुमच्यासारखा दरिद्री ब्राह्मण माझा मित्र होऊच शकत नाही. तुला माझ्याकडून काही दान हवे असले तर बाकीच्या ब्राह्मण याचकांबरोबर ये. मी तुला एकच काय, दहा गायीसुद्धा देईन'' असे त्यांना ऐकविले.

द्रोणाचार्य अति अपमानित झाले. राजा द्रुपदाचे शब्द त्यांच्या जिव्हारी लागले. ''मी माझ्या शिष्यांकडून तुझा पराभव करवीन आणि तुझ्या मुसक्या बांधून माझी माफी मागायला लावीन'' असे भर दरबारात त्यांनी राजा द्रुपदाला सांगितले.

गुरु द्रोणाचार्यांनी ही सर्व कथा कौरव-पांडव राजकुमारांना सांगितली आणि साऱ्या राजकुमारांचे बाहु फुरफुरू लागले. द्रुपदाचा पराभव करून त्याला पकडून आणावे असे त्यांना वाटू लागले.

दुर्योधनाने आपल्या सर्व बांधवांसह एक सेना उभारली. त्याचे अधिपत्य कर्णाकडे दिले

आणि राजा द्रुपदाला पकडून गुरु द्रोणाचार्यांसमोर उभे करण्याची शपथ घेतली. त्याचे सैन्य पांचाल देशावर, पांचाल नरेश द्रुपदावर चालून गेले. त्यांनी अतिशय निकराने युद्ध केले. परंतु राजा द्रुपदाच्या सैन्याने त्यांचा हल्ला परतवून लावला. कौरव सैन्य पळून जाऊ लागले. कर्ण आणि दुर्योधन ह्यांना पळण्याशिवाय काही गत्यंतरच उरले नाही. द्रुपदाच्या सैन्याने त्यांना चारी बाजूंनी घेरले.

युधिष्ठिरानेही आपली पांडव सेना दुर्योधनाच्या सैन्याबरोबर ठेवली होती. द्रुपदाचा पराभव करून द्रोणाचार्यांना सर्वांनी मिळून गुरुदक्षिणा द्यावी असे त्याने ठरविले होते. परंतु दुर्योधनाने एकट्याने सर्व श्रेय घ्यायचे ठरविल्यावर त्याने आपली सेना मागे ठेवली होती. दुर्योधनाने जे ठरविले आहे ते त्याला करू द्यावे असे त्याला वाटत होते.

परंतु द्रुपदाच्या सैन्याने दुर्योधनाच्या सेनेचा पराभव केला आहे. कौरव सैन्य जीव वाचविण्यासाठी धावत आहे, पळत आहे, हे त्याने पाहिले आणि आपले सैन्य द्रुपदाच्या सैन्यावर घातले. भीम, अर्जुन आपले सर्व सामर्थ्य एकवटून द्रुपदाच्या सैन्यावर तुटून पडले. द्रुपदाला समजण्याच्या आतच त्याच्या सैन्याचा दारूण पराभव झाला. द्रुपद बंदिवान झाला. पराभवाने अपमानित झालेल्या द्रुपद राजाला त्यांनी द्रोणाचार्यांच्या समोर उभे केले.

द्रोणाचार्यांनी पुढे येऊन राजा द्रुपदाच्या डोक्यावर मुकुट ठेवला. त्याला बंधमुक्त केले आणि त्याला गाढ आलिंगन दिले. ''राजा, तुझे राज्य मला नको. तुझे राज्य तू सुखाने आनंदाने कर. तुझे सैन्य, संपत्ती सर्व तुझीच आहे पण ह्या क्षणी ह्या सर्वांचा अधिपती मी आहे. त्यामुळे मी परत तुला तुझ्या वचनाची आठवण करून देऊ इच्छितो. मला तुझी मैत्री हवी आहे. परंतु, एक राजाच दुसऱ्या राजाचा मित्र होऊ शकतो असे तुला वाटते. म्हणून आता अर्धे राज्य तुझे आणि अर्धे राज्य माझे. ते राज्य आणि तुझी मैत्री ही माझी गुरुदक्षिणा. आता माझे सर्व शिष्य गुरु ऋणातून मुक्त झाले आहेत. आता तुझ्याकडे माझे कोणतेच मागणे नाही.''

गुरु द्रोणाचार्यांनी हे सर्व राजा द्रुपदाला सांगितले आणि आदराने त्याला हात धरून त्याच्या रथापाशी नेले. आपली प्रतिज्ञा त्यांनी अशा रीतीने पूर्ण केली. पांडवांनी रणांगणावरील आपला पहिला विजय मिळविला आणि आपल्या सामर्थ्याचा परिचय राजा द्रुपदाला आणि सर्व जगाला करून दिला.

प्रश्न:

१) जोड्या लावा.

द्रुपद	विचारी
द्रोणाचार्य	स्वार्थी
दुर्योधन	निःस्वार्थी
युधिष्ठिर	गर्विष्ठ

२) दोन व्यक्तींमधील कोणत्या गुणांमुळे मैत्री निर्माण होते व टिकून राहते?

योग्य पर्यायांवर (√) अशी खूण करा.

व्यक्तीचे स्वाभाविक गुण -

ढोंगीपणा, दुष्टपणा, प्रेमळपणा, भांडखोरपणा, क्षमाशीलता, रागीटपणा, परोपकारी वृत्ती, गुणग्राहकता, चिडकेपणा, समजूतदारपणा

व्यक्तीचे बाह्य गुण-

सौंदर्य, शक्ती, धनदौलत, मोठे घराणे, शिक्षण

३) राजा द्रुपदाचे द्रोणाचार्यांबरोबरचे वागणे तुम्हाला कसे वाटते? का?

१५. पांडवांची ज्वालासमाधी

राजा द्रुपदचा पराभव केल्यामुळे पांडवांच्या शौर्याची महती सर्वत्र पसरली. अर्जुन आणि भीम ह्यांचे धनुर्विद्येतील आणि मल्लयुद्धातील, गदायुद्धातील कौशल्य सर्वांना समजले. पांडवांचा पराक्रम आणि महती म्हणजे इतर कौरव राजकुमारांना त्यांच्याविषयी द्वेष वाटण्याचे एक प्रमुख कारण. त्यांचा काटा काढावा, असे वाटण्याजोगी परिस्थिती. दुर्योधनाला नेमके हेच वाटत होते. कसेही करून पांडवांचा नाश करावा, त्यांना नाहीसे करावे, असे सारखे त्याला वाटत राही. राजा धृतराष्ट्राच्या मनातही असेच काहीसे येत असावे. पांडव एवढे प्रबळ आहेत हे बघितल्यावर त्याच्या मनात आपल्या स्वतःच्या पुत्रांविषयी काळजी उत्पन्न होणे साहजिकच होते. त्यामुळे दुर्योधनाने पांडवांच्या नाशाचा काही उपाय सांगितला तर राजा धृतराष्ट्र त्याला मूक संमती देत असे. पण विदुर मात्र न बोलता पांडवांना साह्य करीत असे. त्यांना अशा कटकारस्थानांची पूर्वकल्पना तो देत असे. त्यातून त्यांनी सहीसलामत बाहेर पडण्यासाठी उपाययोजना करीत असे. त्यामुळे पांडवांचा काटा काढायचा असेल तर त्यांना हस्तिनापूरापासून दूर कुठेतरी पाठवणे आवश्यक होते. दुर्योधनाच्या सुपीक डोक्यातून सर्व पांडवांना वारणावताला पाठवावे आणि तिथेच त्यांचा काटा काढावा अशी कल्पना जन्माला आली. त्याने ती राजा धृतराष्ट्राला सांगितली आणि तशी कार्यवाही सुरू केली.

वारणावत हा प्रदेश हस्तिनापूरच्या राज्याचा एक भाग होता. राजाचे प्रतिनिधी तेथे जाऊन कामकाज बघत असत. तेथे दरवर्षी शिवपूजेचा एक महोत्सव होत असे. त्यासाठीही राजा धृतराष्ट्र आपला विशेष प्रतिनिधी पाठवित असे. ''युधिष्ठिरा, ह्या वर्षी माझा प्रतिनिधी म्हणून तू वारणावताला जावेस असे मला वाटते. तिथे काही दिवस राहून त्या भागाची पहाणी करावीस. तेथील लोकांच्या अडीअडचणी समजावून घ्याव्यास'' असे धृतराष्ट्राने युधिष्ठिराला सांगितले. कुंतीमातेसह पाचही पांडव वारणावताला जाण्यासाठी सहर्ष तयार झाले. मुक्तविहार करण्याची संधी त्यांच्या दृष्टीने अत्यंत स्वागतार्ह आणि आवश्यकच होती.

दुर्योधनाच्या मनात मात्र ह्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घ्यावा, एकही पांडव

वारणावताहून जिवंत परत येता कामा नये, असेच पक्के होते. त्याने पुरोचन नावाच्या आपल्या एका मंत्र्याला पांडवांसाठी एक नवा, स्वतंत्र वाडा बांधण्यास सांगितले. ''तो वाडा कापूस, राळ, लाकडे, लाख ह्या आणि अशा प्रकारच्या ज्वालाग्राही पदार्थांनी बांधावा. त्या वाड्याला एकच प्रवेशद्वार असावे. वाड्यातील सर्व सामानसुमान हेही लाखेपासूनच तयार करावे. परंतु त्याला सोन्याचा मुलामा द्यावा,'' असे सांगितले.

विदुराने पांडवांना हस्तिनापुराच्या वेशीपर्यंत सोबत केली. त्याने पांडवांना वाड्याची सविस्तर माहिती सांगितली. ''सदैव सावध रहा'' असे त्यांने पांडवांना निक्षून सांगितले.

वारणावताला पोहोचल्यावर पांडवांनी तो भव्य वाडा पाहिला. वाड्याच्या आसपास असलेल्या जंगलाची, जंगलवाटांची, चोरवाटांची नीट माहिती करून घेतली. वारणावतातील प्रमुख नागरिकांच्या घरी जाऊन पांडव त्यांना भेटले.

पांडवांचा वनविहार चालूच होता. वारणावतातील शिवपूजा महोत्सवात तर ते देहभान विसरून सामील झाले होते. त्यांच्या साध्या आणि निगर्वी बोलण्याचालण्याने, रहाणीने वारणावतातील सर्व नागरिकांना ते आवडू लागले होते.

एकदा एक पारधी पांडवांकडे आला. ''विदुराने सांगितलेले सर्व खरे आहे. तुम्ही सावध रहावे. दक्षता म्हणून मी तुमच्या रहाण्याच्या, झोपण्याच्या खोलीपासून थेट गंगेच्या काठावर येईल इतके लांब भुयार खणीत आहे. तेथे मी तुमच्यासाठी नौका सज्ज ठेवीन. सावध रहा.'' असे त्या पारध्याने पांडवांना सांगितले.

पांडवांनी विचारविनिमय केला. नेहमीप्रमाणे आपला जीवनक्रमही चालू ठेवला. पारध्याने सांगितल्याप्रमाणे भुयार खणून ठेवले. भीमाने भुयारातून जाऊन सर्व वाटा पुन्हा पुन्हा बघून ठेवल्या.

शिवपूजेचा उत्सव संपला. मोठे अन्नदान झाले. हजारो माणसे जेवली. वारणावतातील साऱ्या जनतेने पांडवांचा जयजयकार केला. एक पाच पुत्रांची माता आपल्या पाचही पुत्रांसह जेवली आणि रात्रीची सोय म्हणून पांडवांच्या वाड्यात झोपायला आली. पांडवांनी खास आग्रह करून पुरोचनाला भरपूर मदिरा पाजली. कसातरी भेलकांडत तो आपल्या कक्षात गेला आणि बेशुद्ध झाला.

सर्व पांडव भुयारातील वाटेने वाड्याबाहेर पडले. भीमाने त्यांच्या वाड्याला सर्व बाजूंनी आग लावली आणि तातडीने तो वाड्याबाहेर पडला.

वाडा धडाडून पेटला. राळ, लाख, कापूस ह्या आणि अशा ज्वालाग्राही पदार्थांनी वाडा बांधला असल्यामुळे सर्व बाजूंनी तो पटापट पेटला. त्याच्या उंच, उंच ज्वाळा आकाशात उसळल्या. सारे वारणावत गोळा झाले. सारे पांडव त्या वाड्यात जळून मेल्याचे त्यांना अतीव दुःख झाले. ''दुर्योधनानेच हे कारस्थान रचले. त्यानेच पांडवांना मारले.'' असे ते उघडपणे बोलू लागले. वाडा जळून गेला. त्यात एक स्त्री आणि तिच्या पाच मुलांचे जळून खाक झालेले देह सापडले. ''पांडव मेले'' म्हणून दुर्योधनाने खूप शोक केला. धृतराष्ट्र आणि गांधारी ह्यांनी पाचही पांडवांचे, कुंतीचे दिवस, श्राद्धपक्ष केले. फार मोठा दानधर्म केला. परंतु राज्याचा एक

वारस नाहीसा झाला म्हणून त्यांना मनोमनी आनंदच झालेला होता.

पांडव भुयारातून पुढे, पुढे धावत होते. आग पसरण्याची शक्यता होती. म्हणून त्यांनी कुंतीमातेला खांद्यावर उचलून घेतले. गंगाकिनारी पोहोचताच त्यांनी तेथे बांधून ठेवलेल्या नौका पाहिल्या. सर्वजण नौकेत बसून वाऱ्याच्या दिशेने जेवढे दूर जाता येईल तेवढे दूर जात राहिले. तेथे त्यांनी नौका सोडून दिल्या. निबिड अरण्यातून वाट काढीत ते पुढे पुढे चालत राहिले.

प्रश्नः

१) पुढे वेगवेगळ्या गुणांची यादी दिली आहे. त्यांची सद्‌गुण व दुर्गुण (म्हणजेच चांगले गुण व वाईट गुण) अशा दोन भागात विभागणी करा.

गुण - साधेपणा, ढोंगीपणा, सावधानता, कपटवृत्ती, द्वेषभाव, दूरदृष्टी, निर्भयता, क्रूरपणा, मत्सरी वृत्ती, निगर्वी वृत्ती, व्यसनाधीनता, न्यायनिष्ठता

सद्‌गुण :

दुर्गुण :

२) पारध्याने वाड्यापासून गंगेपर्यंत भुयार खणून व नौकांची सोय करून पांडवांना मोलाची मदत केली. एखाद्या छोट्या संकटातून, अडचणीतून सुटण्यासाठी तुम्ही कोणाला मदत केली आहे का? कशा प्रकारे?

१६. बकासुरवध

पाचही पांडव कुंती मातेसह वनवासी होऊन कालक्रमणा करीत होते. ह्या प्रवासात आणि ठिकठिकाणच्या निवासात आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून ते अतिशय साधेपणाने रहात असत. आपल्याकडे कोणाचेही विशेषत्वाने लक्ष जाऊ नये म्हणून काळजी घेत असत. एकाच ठिकाणी फार दिवस कधीही रहात नसत.

ते एकचक्रा नगरीत रहात होते, ते अतिशय साधेपणाने रहात होते. भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत होते. एका ब्राह्मण कुटुंबाच्या घराच्या आवारात ते रहात होते. कुंती मातेची काळजी घेण्यासाठी पाच पांडवांपैकी कोणीतरी एक जण घरी थांबे आणि इतर चौघे जण भिक्षा मागून आणत. भीमाच्या अवाढव्य देहामुळे, रुपामुळे त्याला कोणीही सहजरीत्या ओळखले असते. त्यामुळे बहुधा भीमच घरी थांबे. दिवसा उजेडी तो फारसा घराबाहेर पडत नसे. एकदा तो असाच घरी थांबून कुंतीमातेशी बोलत होता. अचानक त्याला ब्राह्मणाच्या घरातून जोराजोरात रडण्याचा आवाज ऐकू आला.

कुंतीमाता ब्राह्मणाच्या घरात गेली. सगळे स्तब्ध झाले. ''काय झाले आहे? आपण का रडता आहात? आम्ही काही मदत करू शकू का?'' असे तिने ब्राह्मणाला विचारले. तिचा प्रश्न कानी पडताक्षणीच सर्व ब्राह्मण कुटुंबीय पुन्हा जोरजोराने रडू लागले. त्यांच्यासमोर बरेच अन्न शिजवलेले दिसत होते. घराबाहेर नव्यानेच दोन धष्टपुष्ट रेडे बांधलेलेही कुंतीला दिसले. रडता रडता सर्व ब्राह्मण कुटुंबीय एकमेकांना घट्ट मिठ्या मारून थोपटत होते. परत तेवढ्याच जोराने आक्रोश करीत रडत होते. हळूहळू रडणे कमी झाले. कुंती माता पुन्हा पुन्हा त्यांना रडण्याचे कारण विचारीत होती. शेवटी ब्राह्मणाने मुसमुसत सांगितले, ''बकासुर नावाच्या एका राक्षसाचे एकचक्रा नगरीवर स्वामित्व आहे. तो केव्हाही, जाता-येता कोणालाही उचलून कच्चा खात असे. सर्व नगरी कायम भयभीत होत असे. शेवटी काहीतरी मार्ग काढून अनिश्चितता संपवावी असे नागरिकांनी ठरवले. सर्व नागरिक बकासुराला भेटले. आणि त्याला 'रोज एक गाडाभर अन्न, दोन रेडे आणि एक माणूस खायला देऊ' असे त्यांनी बकासुराला सांगितले. बकासुराने ते मान्य केले. त्याप्रमाणे सर्व नागरिक पाळीपाळीने त्यांच्या घरातील कोणातरी एका पुरुषाला गाड्या-रेड्या बरोबर पाठवीत आहेत. उद्या माझी पाळी आहे.'' कुंतीने हे ऐकले. ''आज तुमच्यापैकी कोणीही जाऊ नका. मी माझ्या एका मुलाला पाठविते'' असे तिने

ब्राह्मणाला सांगितले. मुसमुसणारा, रडणारा ब्राह्मण आश्चर्यचकित झाला. एक आई इतक्या सहजपणे आपल्या मुलाला एका राक्षसाच्या तोंडी द्यायला तयार आहे ह्या नुसत्या कल्पनेनेच तो कासावीस झाला. तो विस्फारलेल्या डोळ्यांनी कुंतीकडे पहात राहिला. ''ज्यांनी आपल्याला आसरा दिला त्यांच्यावर आलेले संकट दूर करण्याची जबाबदारी अतिथी म्हणून आपली आहे. ते आपले कर्तव्य आहे.'' कुंती भीमाला म्हणाली.

दुसऱ्या दिवशी दोन रेडे आणि गाडाभर अन्न घेऊन भीम गावाबाहेर ठरल्या ठिकाणी गेला. गाड्यातील सर्व अन्न खाली मांडून तो मिटक्या मारीत ते अन्न खाऊ लागला. नेहमीप्रमाणे बकासुर दाणदाण पावले टाकीत आला. आपले अन्न एक माणूस खात आहे हे त्याने पाहिले. तो संतापला. त्याने भीमाला मारायला सुरुवात केली. तो भीमाला वेडेवाकडे मारत राहिला. भीमाचे खाणे चालूच राहिले. बकासुराचा संताप वाढत गेला. भीमाचे खाणे संपताच त्याने गर्रकन् फिरून बकासुराला पुढे ओढले. बकासुर बेभान झाला. तो शर्थीचा प्रयत्न करीत भीमाला मारू लागला. पण त्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी होत होते. त्याला मात्र जोरदार मार मिळत होता. शेवटी भीमाने बकासुराला हवेत गरागरा फिरविले आणि ताडकन् खाली आपटून मारले.



बकासुराची मान मोडली, बरगड्या मोडल्या. बकासुर छिन्नविछिन्न होऊन मेला. भीमाने बकासुराचे धूड गाड्यात घालून गावाच्या वेशीबाहेर आणून टाकले आणि घरी गेला. त्याला सुखरूप परतलेला पाहून ब्राह्मण कुटुंब फार आनंदले. घरी आलेल्या पाहुण्याला आपण मृत्युमुखी धाडले या पश्चातापाने ते कुटुंब फार दुःखी झाले होते. स्वतःला दूषणे देत होते.

दुसऱ्या दिवशी ग्रामस्थांना वेशीपाशी मृत बकासुर दिसला. वार्ता पसरली. लोकांच्या झुंडी वेशीपाशी लोटल्या. आपल्याला कुणी ओळखू नये म्हणून पांडवांनी मात्र कुंतीसह तात्काळ एकचक्रा नगरी सोडली.

प्रश्न:

१) घरी येणाऱ्या अतिथीशी आपण कसे वागले पाहिजे?

२) दुसऱ्याकडे अतिथी म्हणून गेल्यावर तुम्ही कसे वागता?

३) 'अतिथी देवो भव।' असे आपली संस्कृती का सांगते?

१७. मत्स्यवेध

एकचक्रा नगरीत बकासुराचा वध करून भीमाने नगरवासीयांचे संकट दूर केले. त्यांना सुख-शांती दिली. पण लगेचच नगरी सोडून त्यांचा प्रवास सुरू झाला. जेथे शक्य असेल तेथे, जेवढे शक्य वाटेल तेवढे दिवस रहायचे आणि पुढे जायचे असा त्यांचा प्रवास चालू होता. ते कांपिल्य नगरीत येऊन राहिले. भिक्षा मागून रहायचे, हे तर नेहमीचेच होते. ह्यावेळी ते एका कुंभाराच्या घरी राहिले. राजा यज्ञसेनाने आपल्या कन्येचे स्वयंवर मांडले आहे, असे त्यांना समजले. भोजन, दक्षिणा चांगली मिळेल, आदर सत्कार होईल म्हणून सगळे ब्राह्मण स्वयंवरास निघाले. त्यांच्याबरोबर पाचही पांडव सर्व सामान्य नागरिकांना बसण्यासाठी जेथे व्यवस्था होती त्या मंडपात सर्वात मागे बसले. द्रोणाचार्यांनी पांडवांकरवी केलेल्या अपमानामुळे राजा यज्ञसेन अत्यंत दुःखी झाला होता. आपल्याला आता पुत्र असता तर आपल्यावर अशा प्रकारे अपमानित होण्याची पाळी आली नसती असे त्याला वाटले होते. आपल्याला शूरवीर पुत्र व्हावा म्हणून त्याने पुत्रकामेष्टी यज्ञ केला होता. त्यानंतर त्याला धृष्टद्युम्न आणि द्रौपदी अशी दोन अपत्य झाली होती. धृष्टद्युम्न अत्यंत पराक्रमी होता. द्रौपदी अतीव सुंदर होती. आपल्या लाडक्या कन्येला तितकाच तोलामोलाचा वर मिळावा म्हणून त्याने तिचे स्वयंवर मांडले होते. द्रौपदीच्या सौंदर्याचे वर्णन ऐकून देशोदेशीचे राजे-महाराजे-राजकुमार स्वयंवराला आले होते. बलराम-कृष्ण आले होते. दुर्योधन-कर्ण आले होते. द्रौपदी आपलीच व्हावी असे प्रत्येकालाच वाटत होते.

स्वयंवराचा 'पण' सर्वांना सोपा वाटत होता. पण पाण्याने भरलेल्या हौदाच्या मधोमध एक खांब होता. त्याच्या वरच्या टोकावर एक फिरते चक्र लावले होते. त्या फिरत्या चक्रावर एक मासा लावला होता. त्या फिरणाऱ्या माशाचे प्रतिबिंब खाली असलेल्या हौदात फिरताना दिसत होते. ते फिरते प्रतिबिंब पाहून वर असलेल्या मत्स्ययंत्राच्या माशाला अचूकपणे बाण मारायचा होता. जो हे करू शकेल त्याला पांचाल नरेशाची कन्या द्रौपदी वरमाला घालणार होती.

धृष्टद्युम्न वधुवेशातील द्रौपदीला घेऊन स्वयंवर मंडपात आला. त्याने सर्वांना 'पण' समजावून सांगितला. द्रौपदीच्या सौंदर्याने वेडे झालेले अनेक राजे-महाराजे मत्स्यभेद करण्यासाठी पुढे धावले. त्यांना धनुष्यच उचलता आले नाही. ते धनुष्य अतिशय जड होते. एकामागून एक राजे येत होते. मान खाली घालून परत जात होते. नागरिक उपहासाने हसत होते. द्रौपदीच्या स्वयंवराचा हा 'पण' कोणी पुरा करू शकणार आहे की नाही, ह्याबद्दल राजा यज्ञसेन आणि धृष्टद्युम्न ह्यांच्या मनात एक अंधुक शंका येऊन गेली.

तेवढ्यात, कौरव राजकुमार जेथे बसले होते तेथून एक वीर पुरुष उठला. जेथे धनुष्य बाण ठेवले होते तेथे जाऊन त्याने धनुष्यावर बाण चढविला आणि तो लक्ष्यवेध करणार तेवढ्यात ''मी सूतपुत्राला वरमाला घालणार नाही'' असे द्रौपदीने सांगितले. अतिशय अपमानित होऊन, तो वीरपुरुष - अंगराज कर्ण - आपल्या स्थानावर परत गेला. स्वयंवर मंडपात अचानक स्मशान शांतता पसरली. दुर्योधन संतापला. राजा यज्ञसेन चमकला.

ब्राह्मणवेशातील पांडव अस्वस्थ होते. अर्जुन चुळबुळत होता. आपण हे करू शकू पण



त्यामुळे आपले अस्तित्वही जग जाहीर होईल. अशा विचाराने तो शंकित होता. ह्या अनिश्चिततेतच तो धनुष्यबाणापाशी पोचला, त्याने धनुष्यावर बाण चढविला, कुंतीमातेचे स्मरण केले आणि बाण सोडला. गरगर फिरणाऱ्या मत्स्याचा त्याने अचूक वेध घेतला. एक यःकश्चित ब्राह्मणाने क्षत्रिय कन्या जिंकली म्हणून उपस्थित सर्व राजा-महाराजांनी असंतोष व्यक्त केला. ते खवळले. अर्जुनावर धावून गेले, भीम अर्जुनाच्या साह्याला धावला. अर्जुन आणि भीम दोघांनी सर्व क्षत्रिय राजांचा समाचार घेतला. बलराम आणि कृष्ण ह्यांनी सर्व राजांची समजूत काढली. अखेर सर्व राजे शांत झाले. द्रौपदीने वरमाला घातली 'तो अर्जुन आहे'. त्याच्या बरोबर आलेले चौघे त्याचे भाऊ आहेत. हे पाच पांडव आहेत. क्षत्रिय आहेत. राजे आहेत. हे सर्व उपस्थितांना समजले.

प्रश्नः

१) 'मी सूतपुत्राला वरमाला घालणार नाही' असे कर्णाला पाहून स्वयंवराच्या वेळी द्रौपदी म्हणाली. वास्तविक 'स्वयंवराचा पण' पूर्ण करण्यास कर्ण समर्थ होता. 'पराक्रम श्रेष्ठ की कूळ श्रेष्ठ', चर्चा करा. उदाहरणे द्या.

१८. शिशुपाल वध

खांडव राज्यासारखे सुसंपन्न राज्य पांडवांनी अल्पावधीतच उभे केले. इंद्रप्रस्थासारखी कल्पनेतही असू शकणार नाही अशी एक वैभवसंपन्न राजधानी त्यांनी उभी केली. त्यांचे राज्य आणि त्यांची राजधानी ही सर्व भारतवर्षात एकमेव आणि अद्वितीय अशी अजोड राज्य व्यवस्था होती.

पांडवांचा पराक्रम हाही तेवढाच अजोड होता. द्रुपदासारखा बलाढ्य साम्राज्याधिपति त्यांच्या बाजूला होता. कृष्ण-बलरामासारखे शक्ती-युक्तीचे मेरूमणी त्यांचे पाठीराखे होते. कित्येक पराक्रमी राजे आपण होऊन त्यांचे जवळचे मित्र झाले होते. श्रीकृष्णाच्या सल्ल्याने त्यांनी महाबलाढ्य जरासंधाचाही वध केला होता. युधिष्ठिराने त्यानंतर राजसूय यज्ञाची दीक्षा घेतली. आपले सैन्य अर्जुन, भीम, नकुल आणि सहदेव ह्या प्रत्येकाबरोबर देऊन त्याने चारही दिशा निर्वैर करण्याचे ठरविले. सर्व पृथ्वी पादाक्रांत करून त्यांनी जिंकून आणलेली सर्व

संपत्ती, गजाश्वधन, गोधन युधिष्ठिराच्या पायाशी अर्पण केले. कित्येक अमूल्य गोष्टींबरोबरच त्यांनी सर्व राजांवर मिळविलेला निर्विवाद विजय हा जास्त महत्त्वाचा होता. त्यामुळेच युधिष्ठिर राजसूय यज्ञ करू शकणार होता. आता पृथ्वी निष्कंटक झाली, म्हणून युधिष्ठिराने राजसूय यज्ञ केला.

श्रीकृष्णाचे इंद्रप्रस्थात आगमन झाले. देशोदेशीचे राजे-महाराजे आले. भीष्माचार्य आले. द्रोणाचार्य आले. राजा धृतराष्ट्र आला. कृपाचार्य आले. अश्वत्थामा आला. गांधारी आली. दुर्योधन, दुःशासन, कर्ण, विकर्ण आणि सर्वच कौरव राजसूय यज्ञाला आले. ज्येष्ठ-श्रेष्ठ म्हणून भीष्माचार्यांनी युधिष्ठिराला राजसूय यज्ञसिद्धीचा आशीर्वाद दिला.

युधिष्ठिराने ठरवल्याप्रमाणे राजसूय यज्ञाची तयारी होत होती. देशोदेशी गेलेले चारही पांडव विजय मिळवून अगणित संपत्ती लुटून परत येत होते. राजधानी सजली होती. राजे-महाराजे येत होते.

प्रत्यक्ष यज्ञाला सुरुवात झाली. सोमयाग सुरु झाला. त्या विधीप्रमाणे त्यावेळी उपस्थित असलेल्या सर्व व्यक्तींमधून सर्वात ज्येष्ठ आणि वरिष्ठ अशा व्यक्तीला अग्रपूजेचा मान द्यावयाचा असतो. त्यावेळी व्यक्तीची पूजा करून मगच प्रत्यक्ष यज्ञविधीला सुरुवात होते.

राजा युधिष्ठिराने राजसूय यज्ञाला उपस्थित असलेल्या सर्व राजे-महाराजे-ऋषी-मुनी ह्यांच्याकडे पाहिले. तो उठून सर्वात ज्येष्ठ अशा भीष्माचार्यांकडे गेला. त्यांना त्याने वंदन केले आणि हात जोडून विचारले, ''पितामह, आपण सर्वात वडिलधारे आहात, अनुभवी आहात. मी आपल्या पूजनाने यज्ञविधीस सुरुवात करू इच्छितो. आपली अनुमती असावी.''

भीष्माचार्यांनी युधिष्ठिराचा हात धरून त्याला थांबविले. ''राजन, मला दिलेल्या सन्मानाबद्दल मी काय म्हणणार? पण मला विचारशील तर तुमचा हितकर्ता, रक्षणकर्ता, मित्र, गुरु आणि ह्या यज्ञाचा प्रत्यक्ष भारवाहक असा श्रीकृष्णच ह्या मानाचा खरा अधिकारी आहे. येथे उपस्थित असलेल्या सर्व राजांमध्ये तोच सर्वात योग्य व पूजनीय पुरुष आहे. तू श्रीकृष्णाचीच प्रथम पूजा करावीस असे मला वाटते.''

युधिष्ठिराने भीष्माचार्यांना पुन्हा एकवार वंदन केले. त्याने श्रीकृष्णाला सन्मानाने आसनावर बसविले. त्याचे साग्रसंगीत यथासांग पूजा केली. श्रीकृष्णाची अग्रपूजा यथासांग पार पडली.

सर्व राजे-महाराजांबरोबर बसलेला राजा शिशुपाल मात्र मनस्वी संतापला. मुळातच श्रीकृष्णाला तो पाण्यात पहात असे. तो ताड्कन उठून म्हणाला, ''सर्व राजांचा अपमान

झाला आहे. श्रीकृष्णाची अग्रपूजा करून तू आम्हा सर्व राजांना कमी लेखले आहेस.'' चेदीराज शिशुपालाची कशी समजूत काढावी हे युधिष्ठिराला कळेना. चेदीराजाच्या उद्रेकाचे जर दमन केले नाही, तर राजसूय यज्ञच धोक्यात येणार होता. युधिष्ठिरने शिशुपालाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी झाला. शिशुपाल कृष्णाची निंदा करीतच राहिला. भीष्माचार्य पुढे झाले. ते म्हणाले, ''हा शिशुपाल म्हणजे वसुदेवाच्या बहिणीचा मुलगा. पण आयुष्यभर त्याने श्रीकृष्णाचा आणि त्याच्या यादवकुळाचा द्वेष केला. हा जन्मला, तेव्हा ह्याला तीन डोळे होते. चार हात होते. त्याच्या आई-वडिलांनी त्याचे हे भयानक रूप पाहिले आणि त्यांना ते सहन झाले नाही. त्यांनी ह्या अशा मुलाचा त्याग करायचे ठरविले.'' भीष्माचार्यांनी एक दृष्टिक्षेप शिशुपालाकडे टाकला आणि दुसरा श्रीकृष्णाकडे. ते पुढे म्हणाले, ''पण हा पुत्र अतिशय पराक्रमी आणि बलवान होईल. थोड्याच कालावधीत हा कोणाच्या तरी मांडीवर बसेल आणि त्याचे दोन हात आणि तिसरा डोळा नाहीसा होईल. हा मुलगा त्याच क्षणी सर्वसाधारण दिसू लागेल. परंतु ज्या कोणाच्या मांडीवर बसल्यामुळे हा सामान्य मुलाप्रमाणे दोन डोळे आणि दोन हात असलेला होईल, त्याच 'व्यक्तीकडून ह्याचा वधही होईल' अशी आकाशवाणी झाली. ती ऐकताच ह्याच्या आई-वडिलांनी ह्याचा त्याग करण्याची कल्पना सोडून दिली. एकदा बलराम आणि श्रीकृष्ण आपल्या आत्याला भेटायला गेले. श्रीकृष्णाने प्रेमाने आपल्या आतेभावाला म्हणजे शिशुपालाला आपल्या मांडीवर घेतले आणि त्याचक्षणी त्याचे दोन हात आणि तिसरा डोळा नष्ट झाला. शिशुपाल सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे दोन डोळे, दोन हात असलेला मुलगा झाला.'' भीष्माचार्यांनी पुन्हा एकवार चेदीराज शिशुपालाकडे पाहिले आणि ते पुढे सांगू लागले,

''श्रीकृष्णाची आत्या मात्र चमकली. तिथे त्याचक्षणी शिशुपालाचा वध श्रीकृष्णाने करू नये असे वचन श्रीकृष्णाकडून मागितले. श्रीकृष्णाने तिची समजूत काढली आणि शिशुपालाचे शंभर अपराध माफ करीन आणि त्यानंतरच त्याला मारण्याचा निर्णय घेईन, असे आपल्या आत्याला सांगितले.''

चेदीराज शिशुपाल रागाने लालेलाल झाला. भीष्माचार्यांची त्याने निंदा केली आणि श्रीकृष्णावर तो आपल्या द्वेषाचे, मत्सराचे गरळ ओकू लागला.

आपल्या आसनावर श्रीकृष्ण शांतपणे बसला होता. भीष्माचार्यांचे बोलणे आणि शिशुपालाचे गरळ ओकणे तो ऐकत होता. शेवटी तो उठला आणि आपल्याच आतेभावाची-चेदीराज शिशुपालाची त्याने समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला.

''शिशुपाला, तू तुझ्या स्वतःच्या इच्छेने युधिष्ठिराने मांडलेल्या राजसूय यज्ञाला आला आहेस. तू माझ्या विरुद्ध बोलत राहण्यामुळे यज्ञासारख्या पवित्र कार्यात अडथळा होत आहे. तू कृपया शांत हो. हा यज्ञ यशस्वीपणे यजमानांच्या मनाप्रमाणे पार पडू दे.'' असे शिशुपालाला सांगण्याचा प्रयत्न केला. पण शिशुपाल कोणाचेही काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता.

श्रीकृष्ण पुढे झाला. त्याने यज्ञस्थानाच्या मध्यभागी येऊन सर्व राजांना वंदन केले. शिशुपालाने केलेले सर्व अपराध सर्वांना सांगितले. शंभर अपराध मोजून दाखविले. आपल्या तर्जनीच्या टोकावर आलेले सुदर्शन चक्र त्याने क्षणार्धात शिशुपालावर सोडले. पापणी लवेल न लवेल, एवढ्या वेळात गरळ ओकणारे शिशुपालाचे शिर धडापासून वेगळे झाले. शिशुपालाचा वध झाला.

युधिष्ठिराचा राजसूय यज्ञ निर्विघ्नपणे पार पडला. युधिष्ठिर हा चक्रवर्ती सम्राट झाला आणि द्रौपदी सम्राज्ञी झाली.

प्रश्न:

१) अहंकार आणि घमेंड माणसाच्या आत्मनाशाला कारणीभूत ठरते हे शिशुपालवधाच्या कथेवरून समजते. तुम्ही स्वत: अहंकाराने वागला आहात असे तुमच्या आयुष्यातले तीन प्रसंग लिहा.

२) श्रीकृष्णामुळे शिशुपालाचे व्यंग दूर होऊन त्याच्या मातापित्यांनी त्याचा स्वीकार केला. असे असूनही शिशुपालाने उपकारकर्त्या श्रीकृष्णाचा द्वेषच केला. आपल्या उपकारकर्त्याचे ऋण अशा तऱ्हेने फेडणे योग्य वाटते का? उपकारकर्त्याविषयीची कृतज्ञता कशी व्यक्त करावी?



१९. मयसभा



राजसूय यज्ञ निर्विघ्नपणे पार पडला. दुर्योधन यज्ञ संपल्यावरही इंद्रप्रस्थातच राहिला. तेथील संपन्नता पाहून तो अस्वस्थ झाला. द्वेषाने, संतापाने तो फुलून आला. मत्सरग्रस्त होऊन तो ह्या दालनातून त्या दालनात असा फिरू लागला. मयसभेत तो गेला आणि आश्चर्याने थक्क झाला. चांदीचे खांब, सोन्याचे खांब, रत्नजडित खांब, स्फटिकाचे दरवाजे हे सर्व पाहून त्याचा संताप वाढतच गेला. मुठी वळवून ताडताड पावले टाकीत तो वेगाने जाऊ लागला आणि धाडकन भिंतीवर आपटला कारण ती भिंतच होती. बांधकामाचा चमत्कार होता. भिंत असूनही ती अदृश्य असल्यासारखी वाटत होती. दुर्योधन वेदनेने कळवळला!

सुळसुळ फिरणाऱ्या माशाला खेळवण्यासाठी म्हणून त्याने तिथल्या पाण्यात बोट घातले तर ती फरशीच निघाली.

फुलांच्या गालिच्यावरून जावे, म्हणून रस्ता बदलून तो गालिच्यावर आला, तर धाडकन पाण्यातच पडला. कसला गालिचा, अन कसली फुले!

तर

बंद असलेले दार उघडून जावे म्हणून तो समोरचे दार उघडायला गेला, आणि धाडकन् वेडावाकडा आपटला. तिथे दार नव्हतेच. पण भिंती इतक्या चकचकीत आणि गुळगुळीत होत्या, की आरशासारखे त्यात प्रतिबिंब पडत होते आणि ते समोर असलेल्या दाराचे होते.

प्रत्येक वेळी हे असेच घडत होते. सारखी फजितीच फजिती होत होती. त्यात आसपास असलेले राजसेवक निर्विकार नजरेने त्याच्याकडे पहात होते. तो पुढे जाताच ते अस्फुटपणे हसत आहेत असा त्याला भास होई. दोन-तीनदा तर असे झाले की भीम, नकुल, सहदेव असे वेगवेगळ्या दिशेने येऊन विरुद्ध दिशेला असलेल्या दरवाजातून पुढे निघून गेले, पण तिथे फक्त भिंतच आहे' असे दुर्योधनाला वाटले. तो हिरमुसला. कुठूनतरी भीम, नकुल, सहदेव आपल्याकडे पहात आहेत, आणि हसत आहेत असे दुर्योधनाला वाटत राहिले. द्रौपदी आणि तिच्या दासी तर सारख्या त्याला हसतच होत्या. ''अंध पिता-अंध माता असले म्हणून काय, पुत्रानेही तसेच असावे? बघावे थोडे पायाखाली'' असे त्या म्हटल्याचेही दुर्योधनाने ऐकले. तो रागाने वेडापिसा झाला. ''अंध पित्याची मुलेही आंधळीच असतात वाटतं?'' असे द्रौपदीचे शब्द त्याच्या कानावर पडले आणि त्याचा संताप शिगेला पोहोचला.

पांडव पांचाल देशाच्या राजधानीत कांपिल्य नगरीत प्रकट झाले आणि द्रौपदी स्वयंवराचा 'पण' जिंकून द्रौपदीला पत्नी म्हणून घेऊन गेले, तेव्हाच दुर्योधन संतापला होता, घाबरला होता. त्यांना खांडववन दिले, तर त्यांनी त्याचे सुसंपन्न असे खांडवराज्य केले. उजाड माळावर इंद्रप्रस्थासारखी विलक्षण सुंदर राजधानी उभारली आणि तिथेच ही मयसभा! मयसभा कसली? ही तर आपली फजितीदशा. प्रत्येक गोष्ट दुर्योधनाला काट्यासारखी सलत होती आणि त्यात हा राजसूय यज्ञ! पराक्रमाची ग्वाही. पांडव सर्वश्रेष्ठ असल्याची पृथ्वीवर वाजवलेली दवंडी!

ताडताड पावले टाकत दुर्योधन तेथून निघून गेला.

प्रश्न:

१) दुर्योधनाला पांडवांच्या इंद्रप्रस्थ नगरीचा व वैभवाचा हेवा, मत्सर लोभ वाटला. त्यातून त्याचा पांडवांबद्दलचा द्वेष वाढला. इतरांचा जेव्हा आपल्याला मत्सर वाटतो तेव्हा त्याचे परिणाम काय होतात?

२) दुर्योधनाकडून नकळत घडलेला कृत्यांमुळे त्याची मयसभेत फजिती झाली. द्रौपदीने त्याची 'अंध पित्याची मुले आंधळीच असतात' असे म्हणून अपमान व कुचेष्टा केली. याबद्दल तुम्हाला काय वाटते?

२०. द्यूत

महाराज धृतराष्ट्रांनी, वडिलांसमान असलेल्या प्रत्यक्ष काकांनी स्वतःहून पाठविलेले द्यूत खेळण्याचे आमंत्रण सम्राट युधिष्ठिराने शिरोधार्य मानले. आपल्या सर्व बंधूंचा विरोध बाजूला ठेवून भीष्म, द्रोण, विदुर हे सर्व उपस्थित असताना शकुनी कपट करणार नाही, असा विचार करून आपले चारही बंधू आणि पत्नी द्रौपदीसह युधिष्ठिर द्यूत खेळण्यासाठी हस्तिनापुरात उपस्थित झाला.

सम्राट युधिष्ठिराशी द्यूत खेळण्यासाठी दुर्योधनाने हस्तिनापुरात एक भव्य मंडप उभारला होता. द्यूत खेळणाऱ्यांसाठी वेगळी आसनव्यवस्था केली होती. मंडप विविध पुष्परचनांनी सुशोभित केला होता. द्यूताचा खेळ पाहण्यासाठी अनेक राजे-महाराजांना आमंत्रित केले होते. युधिष्ठिर आपल्या चारही बंधूंसह मंडपात आला. त्या मागोमागच धृतराष्ट्र महाराज, भीष्म, द्रोण, कृप, विदुर आणि इतर मान्यवर हेही मंडपात आले. सर्वांना वंदन करून युधिष्ठिराने आपले आसन घेतले. महाराज धृतराष्ट्रांनी द्यूत सुरू करण्याचा आदेश दिला. 'आपल्याशी समबल असलेल्या कोणाशीही आपण द्यूत खेळण्यास तयार आहोत.' असे युधिष्ठिराने महाराजांना सांगितले. हे ऐकताच दुर्योधन पुढे झाला. ''मी तुझा समबल म्हणून तुझ्याशी द्यूत खेळण्यास तयार आहे. माझी संपत्ती मी पणाला लावेन. माझ्या वतीने माझा मामा शकुनी फासे टाकेल.'' असे त्याने युधिष्ठिराला सांगितले. युधिष्ठिराने ''फासेही दुर्योधनानेच टाकावेत तरच तो द्यूत खेळला असे होईल'' असे सांगितले. पण सर्वांच्या आरडा-ओरड्यात ते कोणालाच ऐकू गेले नाही. कोणी त्याकडे लक्ष दिले नाही.

''ही माझी सुवर्णमंडित रत्नजडित अमूल्य माला माझा पहिला 'पण'!'' युधिष्ठिराने आपला रत्नहार समोर ठेवला.

''जितं मया. जितं मया'' असे ओरडत छद्मीपणे हसत हसत शकुनीने आपल्या हातात काही वेळ उगाचच फासे खुळखुळत ठेवले. लोकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे असे पाहून अलगद जमिनीवर टाकले. युधिष्ठिराची रत्नमाला दुर्योधनाच्या मालकीची झाली युधिष्ठिर पहिला 'पण' हरला.

''हजारो सुवर्ण मोहरांनी भरलेल्या ह्या माझ्या सुवर्ण पेट्या'', युधिष्ठिर अधीरपणे ओरडला.

युधिष्ठिराच्या हातून रत्नमाला गेली, सुवर्ण मोहरांनी भरलेल्या पेट्याही गेल्या. पण

युधिष्ठिराच्या लेखी ही सर्व संपत्ती धुळीच्या एका कणाएवढीही नव्हती. युधिष्ठिराने आपल्या अंगावरील सर्व सुवर्णरत्न अलंकार 'पणा'ला लावले. आपले गोधन 'पणा'ला लावले. आपले अश्वधन 'पणा'ला लावले. आपले गजधन 'पणा'ला लावले. इंद्रप्रस्थ पणाला लावले. युधिष्ठिर जे जे पणाला लावत होता ते ते हरत होता. एकही दान त्याच्या बाजूने पडत नव्हते. भीष्म, द्रोण, कृप, विदुर, महाराज धृतराष्ट्र ह्यांच्यासमोर शकुनीचे कपटी फासे पडत होते आणि दुर्योधनाचे ऐश्वर्य आणि सामर्थ्य वाढत होते. पण युधिष्ठिराच्या हे लक्षातच येत नव्हते. तो पूर्णपणे द्यूतात बुडाला होता, बेभान झाला होता. चारही पांडव हे हताशपणे पहात होते, पण भर सभेत सम्राट युधिष्ठिराला अडवू शकत नव्हते.

शकुनीही बेभान होता. दुर्योधन त्याच्याकडे कौतुकाने पहात होता. सर्व उपस्थित राजे महाराज ही आपल्या आसनाला खिळून होते. निःस्तब्ध! धृतराष्ट्र महाराजांच्या चेहऱ्यावर अधून-मधून समाधानाच्या, अधून-मधून चिंतेच्या रेषा उमटत होत्या. पण क्षणभरच! भीष्म, द्रोण, कृप गंभीर होते. विदुर चिंताग्रस्त! त्याने पुढे होऊन ''हे द्यूत आता आपण थांबवावे, महाराज'' असे धृतराष्ट्राला सांगायचा प्रयत्न केला. पण धृतराष्ट्राने त्याचे ऐकूनही न समजल्यासारखा चेहरा केला. द्यूत तसेच पुढे चालू राहिले.

युधिष्ठिराने आपले राज्य 'पणा'ला लावले. राज्यातील सर्व संपत्ती 'पणा'ला लावली. अर्जुन, भीम, नकुल, सहदेव आणि स्वतःला देखील 'पणा'ला लावले. पण शकुनीचे फासे दुर्योधनाला हवे तसेच पडत राहिले. सर्व काही दुर्योधनाचे होत होते. युधिष्ठिर क्षणोक्षणी निर्धन होत होता. आता तर त्याची स्वतःवरसुद्धा मालकी राहिली नव्हती. तो आणि त्याचे चारही बंधू कौरवांचे दास झाले होते. दुर्योधन त्यांचा सर्वांचा स्वामी झाला होता. पांडवांनी स्वतःच्या सामर्थ्यावर उभे केलेले खांडवराज्यही कौरवांच्या नव्हे, दुर्योधनाच्या वैयक्तिक मालकीचे झाले होते.

युधिष्ठिराजवळ आता पणाला लावण्यासाठी काहीही शिल्लक नव्हते.

''सम्राट युधिष्ठिर महाराज, तुम्ही अजूनही एक खेळी खेळू शकता. गेलेले सर्व वैभव परत मिळवू शकता. पण फक्त एकच खेळी. कारण आता तुमच्याकडे फक्त एकच गोष्ट शिल्लक आहे. 'पणा'ला लावण्यासाठी तुझी प्रिय राणी-सम्राज्ञी द्रौपदी. लावताय तिला पणाला? टाकू फासे?'' शकुनीने युधिष्ठिराला डिवचले.

खाली घातलेली युधिष्ठिराची मान वर झाली. क्षणभर त्याने डोळे मिटले.

''मी माझी प्रिय पत्नी द्रौपदी आता 'पणा'ला लावत आहे'' असे त्याने एक एक शब्द सावकाश उच्चारत सर्वांना सांगितले. चारही पांडव संतापाने पेटून उठले. सर्व राजे-महाराज आश्चर्याने अवाक् झाले. कर्ण मनाशीच हसला. दुर्योधन अंतःपुराकडे पाहू लागला. शकुनी आपल्या हातातील फासे खेळवत ह्याच क्षणाची वाट पहात होता. युधिष्ठिराने सर्वस्व गमावले. पूर्णपणे निर्धन झाले. त्यांना वनवास स्वीकारावा लागला.

प्रश्न:

१) जुगार किंवा इतर वाईट सवयींच्या आहारी गेलेला माणूस योग्य/अयोग्य, चांगले/वाईट याचा विचार करू शकत नाही. असे युधिष्ठिराच्या द्यूतक्रीडेवरून दिसते. अशा वेळी इतर पांडव गप्प का राहिले? त्यांनी काय करायला हवे होते?

२) वाईट सवयींपासून दूर कसे राहता येईल, असे तुम्हाला वाटते. तुमचे विचार इतरांनाही सांगा.



२१. दिव्यास्त्रप्राप्ती

पांडवांच्या वनवासाला सुरुवात झाली, पण त्यापूर्वी हे असे घडू नये, धृतराष्ट्राने हे थांबवावे असे अनेक संकेत धृतराष्ट्राला मिळाले होते. अपशकुनही घडले होते. हे घडले, तर ह्यापुढची पायरी ही सर्व कुरूकुळाचा नाश करणारी असेल, असे त्यातून स्पष्ट सूचित होत होते. क्षत्रिय जातच नष्ट होण्याचा धोका त्यातून दिसत होता. पण भीष्म, द्रोण, कृप, विदुर, धृतराष्ट्र गांधारी कोणीच पांडवांचा वनवास टळावा असा विचारही करताना दिसत नव्हता.

'तेरा वर्ष वनवास आणि अज्ञातवास संपवून तुम्ही सुखरुप परत याल. तुमचे राज्य स्वपराक्रमाने तुम्ही परत मिळवाल.' असा विश्वास एकट्या विदुराने व्यक्त केला. एवढेच नव्हे तर तो कुंती मातेला आपल्या स्वतःच्या घरी नेऊन तिची राजमातेसारखी व्यवस्था ठेवणार होता.

बारा वर्षांचा वनवास चुकणार नव्हता. पांडव ह्या वनातून त्या वनात जात होते. निसर्गामध्ये रममाण होत होते. सुख, दुःख, ज्ञान याची देवघेव होत होती. अशाच एका क्षणी युधिष्ठिराने अर्जुनाकडून दिव्यास्त्राची माहिती करून घेतली. ''अर्जुनाने पांडवांसाठी दिव्यास्त्राची प्राप्ती करावी,'' असे त्याने अर्जुनाला सांगितले.

दिव्यास्त्र इंद्राकडे होते. इंद्राकडून दिव्यास्त्र आणायचे म्हणजे इंद्रलोकात जायला हवे. इंद्रलोकात जाण्यासाठी अर्जुनाचा प्रवास सुरू झाला. पण वाटेतच त्याला एक तेजस्वी, वृद्ध ब्राह्मणाने अडवले. त्याने अर्जुनाला अनेक प्रश्न विचारले. अर्जुनाने नम्रपणे त्याच्या सर्व प्रश्नांची योग्य उत्तरे दिली. तो वृद्ध ब्राह्मण म्हणजे साक्षात इंद्रच होता. अर्जुनावर तो प्रसन्न झाला. अर्जुनाने त्याच्याकडे दिव्यास्त्र मागितले. इंद्राने अर्जुनाला ''आधी पाशुपतास्त्र मिळव, त्यानंतर मी तुला दिव्यास्त्र देईन'' असे सांगितले. पाशुपतास्त्र होते शंकराकडे. ते मिळविण्यासाठी शंकराची आराधना करणे, तपश्‍चर्या करणे आवश्यक होते. अर्जुनाने शंकराची पूजा करून तपश्चर्या सुरु केली. दीर्घकाल घोर तपश्चर्या केल्यानंतर शंकराने अर्जुनाची वेगवेगळ्या प्रकारे परीक्षा घेतली. अवघडात अवघड समस्या त्याने अर्जुनासमोर उभ्या केल्या, त्या सर्व समस्या अर्जुनाने लीलया पार केल्या. शंकर मूर्त स्वरुपात अर्जुनासमोर प्रकट झाले आणि त्यांनी पाशुपतास्त्र अर्जुनाला दिले. त्याचबरोबर शंकराने अर्जुनाला अतिमानवी आणि अमानवी

शक्तींपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्यावर विजय मिळविण्यासाठी वरदानही दिले. देवाधिदेव इंद्र, यम, कुबेर, वरुण हे सर्वच अर्जुनासमोर प्रकट झाले. त्या सर्वांनी त्याला विविध अस्त्रे दिली. इंद्र स्वतः त्याला इंद्रलोकात घेऊन गेला. इंद्रलोकात राहून त्याने दिव्यास्त्राचे ज्ञान मिळविले. एवढेच नव्हे, तर चित्रसेन गंधर्वांकडून त्याने नृत्य आणि गायन कलेचेही शिक्षण घेतले आणि तो त्यात पारंगत झाला.

नृत्यकलेचे बारकावे आणि जागा तो अतिशय सहजतेने ओळखू लागला. त्यामुळेच त्याने जेव्हा उर्वशीला इंद्रसभेत नृत्य करताना पाहिले, तेव्हा तो एकटक तिच्याकडे पहात राहिला. तिचे पदलालित्य आणि पदन्यास मनात साठवीत राहिला. इंद्राने हे पाहिले आणि उर्वशीला नटून-थटून अर्जुनाकडे जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे उर्वशी अर्जुनासमोर उभी राहिली. तिला पाहताच अर्जुनाने तिच्या पायावर डोके ठेवले. तिला आपले नृत्य गुरु मानले. उर्वशीला हे सर्व अनपेक्षित होते. ती संतापली. ''देवी तू मला माझ्या कुंतीमातेसमान आहेस, इंद्रपत्नी शचीदेवीसमान वंदनीय आहेस, पूजनीय आहेस. तुझे प्रत्यक्ष दर्शन झाले म्हणून मी तुझ्याकडे एकटक पहात राहिलो.'' असे अर्जुनाने उर्वशीला सांगितले. पण उर्वशी अर्जुनाकडून हे असले काही ऐकून घ्यायला तयार नव्हती कारण तिला अर्जुन आवडला होता पण अर्जुन तर तिला 'माता' म्हणत होता. रागाच्या भरात तिने अर्जुनाला नपुंसकत्वाचा शाप दिला. अर्जुन धावतच इंद्राकडे गेला. इंद्राने मात्र हसत हसत अर्जुनाची समजूत काढली आणि ''एक वर्षाच्या अज्ञातवासात ह्या शापामुळे तुला कोणीच ओळखू शकणार नाही'' असे त्याला सांगितले. तसा उःशापही दिला. एव्हाना बाकीचे पांडव इंद्रकील पर्वतानंतर इतर अनेक वने-उपवने पार करून गंधमादन पर्वतावर आले होते. अनेक ऋषीमुनींबरोबर त्यांनी तीर्थयात्रा केल्या होत्या. अर्जुन त्या सर्वांना गंधमादन पर्वतावर भेटला.

प्रश्न:

१) अडचणी आल्या तरी ध्येय प्राप्ती कोणकोणत्या गुणांमुळे होऊ शकते?

२) 'स्त्रीपुरुष, उच्चनीच, लहानमोठा यांचा विचार न करता ज्यांच्याकडून विद्या मिळेल, त्याला गुरु मानावे,' अशी आपली संस्कृती सांगते. त्यामुळे कोणता लाभ होतो?

२२. यक्षप्रश्न

द्युतात हरल्यावर पांडवांना बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास भोगावा लागला. पाचही पांडव, द्रौपदी, त्यांचे कुलपुरोहित धौम्य ऋषी, असे काहीजण द्वैतवनात रहायला गेले. राजकुमार म्हणून वाढलेल्या पांडवांना हा वनवास बराच त्रासाचा झाला. पण सगळे एकमेकांना सांभाळून हसतमुखाने दिवस काढत होते.

वनवासाचा काळही त्यांनी काम करण्यात घालवला. प्रत्येकानं आपल्या आवडत्या विषयाचा अभ्यास केला आणि प्रशिक्षण घेतलं. युधिष्ठिरानं द्यूतविद्येवरची पुस्तकं अभ्यासली. भीमाला खाण - पिणं आवडायचं, म्हणून मग त्यानं स्वयंपाकशास्त्राचे धडे घेतले. अर्जुन मोठा पराक्रमी धनुर्धर. त्यानं इंद्राकडे जाऊन अस्त्रविद्येतलं प्रगत शिक्षण घेतलं. नकुल - सहदेवांनी पशुवैद्यकाचा अभ्यास केला. एक गाईगुरांच्या वैद्यकात, तर दुसरा अश्ववैद्यकात पारंगत झाला.

याच सुमारास एकदा हे पाच जण शिकारीसाठी वनात गेले. उन्हातून ससे आणि हरणांच्या मागे धावता धावता थकून गेले. घामाघूम झाले सगळे. तहान लागली सर्वांनाच. थोरला युधिष्ठिर आंब्याच्या झाडाखाली सावलीत बसला आणि धाकट्या भावाला, नकुलाला, हाक मारून म्हणाला,

''बाळा नकुला, दमलो बाबा मी. जा, जरा आसपास बघ कुठे गार पाणी मिळेल का ते. एखाद झरा, एखादं तळं...''

''हो दादा, हा मी निघालोच'', नकुल म्हणाला आणि वळलाच जायला. मोठ्या भावाची इच्छा म्हणजे आज्ञाच जणू. पुरवलीच पाहिजे ती.

इकडे-तिकडे पाण्याच्या शोधात फिरत असतानाच नकुलाला एक छानसं सरोवर दिसलं. आकाशासारखं निळं आणि स्फटिकासारखं नितळ पाणी होतं त्यात. हातातला मातीचा घडा धुऊन घेण्यासाठी तो काठावर जाऊन किंचित वाकला. घडा पाण्यात बुडायच्या आधीच त्याच्या कानावर एक करडा आवाज आला.

''थांब, थांब, नकुला, हात लाऊ नकोस त्या पाण्याला.''

हा आवाज कोणाचा आणि त्या आवाजाला आपलं नाव कसं बुवा माहित, याचं आश्चर्य करत नकुल मागे वळला. समोरच्या डेरेदार झाडाखाली एक रुबाबदार यक्ष उभा होता. नकुलानं हात जोडून त्याला म्हटलं,

''क्षमा करा, पण माझ्या थोरल्या भावासाठी पाणी...''

''हां हां, माहित आहे आम्हाला ते. पाणी जरुर ने, पण मी विचारीन त्या प्रश्नांची उत्तरं दिल्यावर, मगच.''

नकुलाला युधिष्ठिराचा थकलेला चेहरा आठवला. दादाला लगेच पाणी मिळालंच पाहिजे, एवढी एकच गोष्ट त्याच्या मनात होती. यक्षाकडे पूर्ण दुर्लक्ष करत त्यानं घडा परत उचलला. ते बघून यक्ष काहीसा रागावला, म्हणाला,

''अरे, माझ्या मालकीचं आहे हे तळं. आधी प्रश्नाचे उत्तर, मगच पाणी, मान्य नसेल, तर तत्क्षणी तू मूर्च्छित होशील. विचार कर.''

नकुलाला वेळच नव्हता विचार करायला. त्यानं घडा पाण्याजवळ नेला मात्र. त्याच क्षणी तो काठावर मूर्च्छित होऊन पडला.

अर्धी घटिका उलटली. तरी नकुलचा पत्ता नाही असं दिसल्यावर युधिष्ठिरानं सहदेवाला हाक मारली.

''जा रे, बघून ये; कुठे पडला बिडला तर नाही हा?''

युधिष्ठिरांना नमस्कार करून सहदेव तरातरा निघाला, तो सरळ त्या तळ्यापाशीच आला. आधी त्याला दिसला तो मूर्च्छित पडलेला नकुल. त्याच्या तोंडावर पाणी शिंपडून त्याला भानावर आणावं म्हणून तो वाकला. तेवढ्यात यक्षाचा आवाज आलाच ''आधी प्रश्नांची उत्तरं, मगच पाणी. नाहीतर, या भावासारखीच अवस्था होईल तुझी.''

यक्षाकडे पूर्ण दुर्लक्ष करत, नकुलाच्या काळजीनं सहदेव पाण्यात हात घालणार, तर तोही मूर्च्छित होऊन पडला काठावर.

सहदेवही आला नाही, म्हटल्यावर युधिष्ठिरानं भीमाला पाठवलं, पण त्याचीही गत नकुल - सहदेवांसारखीच झाली. भीमासारखा वीरही परत आला नाही म्हटल्यावर अर्जुन आपण होऊनच निघाला त्यांच्या शोधात. आपल्या भावांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत तो तळ्यापाशी पोचला. पण त्याचीही तीच अवस्था झाली आणि तोही मूर्च्छित होऊन पडला.

आता मात्र युधिष्ठिर घाबरला. ज्या दिशेने ते चौघे गेले होते, त्याच दिशेने तो निघाला. तळ्याकाठी जाऊन बघतो तर काय ! चौघे भाऊ मूर्च्छित होऊन पडलेले. त्यांच्यासाठी पाणी घेण्यासाठी तो वाकला, तोच मागून आवाज आला,



''अंहं, धर्मराज. माझ्या प्रश्नांची उत्तरं दिल्याशिवाय पाण्याला स्पर्श नाही करायचा.''
क्षणाचाही विलंब न लावता युधिष्ठिर म्हणाला, ''विचार, लवकर विचार तुझे प्रश्न.
यक्ष जरा चपापला आणि त्यानं प्रश्न विचारायला सुरुवात केली :
''स्वर्गसुख कशाने मिळतं?'' लगेच युधिष्ठिरानं उत्तर दिलं: ''खरेपणाने वागल्याने.''
आणि मग ही प्रश्नोत्तरी सुरूच राहिली.
''पृथ्वीहून श्रेष्ठ कोण?''
''माता, आपली आई.''
''आकाशाहून उंच कोण?''
''पिता, अर्थात आपले वडील.''
''सर्वात मोठं सुख कशात आहे?''
''संतोषात. समाधानात.''
''वाऱ्यापेक्षा जास्त चपळ काही आहे का?''
''हो तर ! माणसाचं मन.''

''सगळ्यांत उत्तम धन कोणतं?''

''विद्याधन.''

''सगळ्यात उत्तम दान?''

''विद्यादान.''

''व्यक्तीचा खरा सोबती कोण?''

''धैर्य.''

यक्ष एकामागून एक प्रश्न विचारत राहिला आणि युधिष्ठिर त्याची अचूक उत्तरं देत गेला. यक्ष थक्कही झाला आणि प्रसन्नही. त्यानं काही कोड्यासारखेही प्रश्न विचारले.

उदाहरणार्थ :

''एकदा वाढणारं, मग कमी होणारं, पुन्हा वाढत जाणारं... असं काही असू शकेल का?''

युधिष्ठिरानी तत्काळ उत्तर दिलं: ''हो, चंद्र. तो दर महिन्यात कृष्ण पक्षाला कमी होत जातो आणि शुक्ल पक्षात वाढत जातो.''

''कोण झोपला असता डोळे मिटत नाही? उत्पन्न होऊनही कोण हालचाल करीत नाही? कोणामध्ये अंत:करण नाही?''

मासा झोपला असताही डोळे मिटत नाही. अंडे उत्पन्न होऊनही हालचाल करीत नाही आणि दगडात अंत:करण नाही.''

''मधुर वचन बोलणाऱ्याला काय मिळते? विचार करुन काम करणारा माणूस काय मिळवितो?''

''मधुर वचन बोलणारा सर्वांना आवडतो. विचार करून काम करणाऱ्याला अधिकाधिक फल मिळते.''

यक्ष आता पूर्णपणे समाधान पावला.

त्याने युधिष्ठिराला म्हणाला. ''मी तुझ्या भावांपैकी एकाला जिवंत करीन. कोणाला जीवंत करायचे ते तू सांग.''

युधिष्ठिराने नकुलाला जिवंत करण्यास सांगितले. यक्षाने आश्चर्याने विचारले ''अतुल पराक्रमी भीम किंवा अपराजित अर्जुनाला सोडून तू नकुलाला का निवडलेस?

''माझ्या पित्याच्या कुंती व माद्री दोन पत्नी आहेत. कुंतीपुत्र मी जिवंत आहे तर माद्रीपुत्र नकुल जिवंत होणेच योग्य आहे.

यक्षाने युधिष्ठिराच्या चारही भावांना पुन्हा भानावर आणलं. मग म्हणाला, '' तुम्हाला त्रास देण्याचा हेतू नव्हता माझा. तुमची परीक्षा घेण्यासाठीच मी हे सगळं केलं. जा हवं तेवढं पाणी प्या. आता उरलेला वनवासाचा काळही सुखकर जावो, हा माझा आशिर्वाद आहे.''

पांडवांनी यक्षाला अभिवादन केलं आणि तळ्याचं थंडगार आणि गोड पाणी पिऊन ते आश्रमात परत जायला निघाले.

महाभारताचा भारतीय मनावर खूप प्रभाव आहे. कळत नकळत त्यातले विचार, व्यक्तिरेखा कथाकहाण्या आपण वापरत असतो. आजही जेव्हा एखाद्यासमोर अवघड प्रश्न किंवा समस्या उभी रहाते, तेव्हां तो सहज म्हणून जातो:

''माझ्या समोर एक फार मोठा 'यक्षप्रश्न' उभा आहे.'' या शब्दाचा आणि वाक्प्रचाराचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल, तर महाभारतातील ऐतिहासिक कथांची ओळख करून घ्यायलाच हवी.

प्रश्न:

१) पांडवांनी वनवासाचा काळ आवडीची कामे करण्यात घालवला. त्याप्रमाणे तुम्ही सुट्टीचा काळ कसा घालवाल?

१.

२.

३.

४.

२) तुम्हाला कुठला पांडव व्हायला आवडेल? का?

३) दहा जणांचे गट करा. पाच पांडव होतील व एकजण यक्ष होईल. यक्ष झालेल्याने तुमच्या भावविश्वातले प्रश्न विचारावेत. पांडवातला युधिष्ठिर उत्तरे देईल. त्याला उत्तर न आल्यास इतर चार जणांनी मदत करावी.

२३. अज्ञातवास



वनवासाचा काळ चालू होता. वना-उपवनातून फिरावे, तीर्थक्षेत्रांना भेटी द्याव्यात, पर्वत शिखरे पहावीत. निसर्गात रममाण व्हावे. कंदमुळे खावी, शिकार करावी, असा अनेकविध गोष्टींचा आस्वाद घेत पांडवांचा वनवास चालू होता. त्यांचे वैयक्तिक बलसंवर्धनही चालू होते. विविध देशातल्या लोकांशी संपर्क वाढविणेही चालू होते. सुरुवातीला वाटत होते, हा बारा वर्षांचा काळ कसा संपणार आणि कधी संपणार! पण ती बारा वर्षे कधी संपत आली, हेही पांडवांच्या लक्षात आले नाही.

वनवासाची बारा वर्षे संपत आली, हे लक्षात येताच त्यांनी अज्ञातवासाचा विचार सुरु केला. कुठे जायचे? कसे जायचे? भूमिगत व्हायचे की वेशांतर करून रहायचे? सगळ्यांनी एकाच ठिकाणी एकत्रीत जायचे आणि रहायचे, की प्रत्येकाने वेगवेगळ्या ठिकाणी जायचे आणि एकएकटे रहायचे? एकापेक्षा अधिक प्रश्न होते आणि त्याला एकापेक्षा अधिक उत्तरेही

होती. विविधांगी विचार केल्यावर सर्वानुमते ठरले, की विराट नगरीत जायचे. सर्वांनी विराट राजाकडे चाकरी करायची आणि एकत्रच रहायचे.

ठरल्याप्रमाणे पाचही पांडवांनी आपली सर्व शस्त्रे एका गाठोड्यात बांधली. विराट नगरी बाहेर येताच तेथे असलेल्या एका शमीवृक्षाच्या ढोलीत थोडी उंचावर ठेवली.

युधिष्ठिर ब्राह्मणवेशात विराट राजाच्या दरबारात गेला. ''आपले नाव 'कंक'. द्यूतक्रिडेत निष्णात आहे. धर्मशास्त्राचा गाढा अभ्यास व राज्य कारभारात बहुमोल सल्ला देऊ शकतो.'' असे सांगून विराट राजाच्या मंत्रीमंडळातील एक सदस्य, म्हणून त्याने आपले स्थान पक्के केले.

अर्जुन उर्वशीकडून उत्तम नृत्य आणि गायन शिकलेला होता आणि इंद्राने दिलेल्या उ:शापाप्रमाणे फक्त वर्षभरच नपुंसक राहू शकणार होता. ह्या गोष्टींचा विचार करून त्याने 'बृहन्नडा' नावाच्या नर्तिकेचे रूप घेतले आणि तो विराटकन्या उत्तरेचा नृत्य शिक्षक म्हणून काम करू लागला. अश्वविद्येत प्रविण असलेला नकुल 'ग्रंथिक' हे नाव धारण करून अश्वशाळा सांभाळू लागला. भीम 'बल्लव' असे नाव घेऊन कुस्तीगीर आणि पाककुशल तज्ज्ञ म्हणून विराट राजाच्या पदरी राहिला. गोपालनतज्ज्ञ म्हणून सहदेव 'तंतिपाल' ह्या नावाने विराट दरबारी रुजू झाला. विराट राजाची महाराणी सुदेष्णा हिची वैयक्तिक दासी म्हणून द्रौपदी 'सैरंध्री' ह्या नावाने काम करू लागली. अशा प्रकारे पाचही पांडव आणि द्रौपदी विराट राजाच्या पदरी राहून त्याची चाकरी करू लागले. जरी ते एकाच ठिकाणी आणि एकत्रच असले, तरी ते पांडव आहेत ह्याचा कोणालाही पत्ता लागला नाही. निश्चिंतपणे आणि आनंदात त्यांचे आयुष्य चालू होते. अचानक एक प्रश्न समोर उभा राहिला.

विराट राजाचा सेनापती कीचक होता. त्याने सैरंध्रीला पाहिले. तिला पाहून तो तिच्यावर अनुरक्त झाला. तिने कुठल्याही प्रकारचे उत्तेजन त्याला दिले नाही. तरीही त्याने एकदा सुदेष्णाराणी जवळपास नाही असे पाहून सैरंध्रीचा हात धरला व तिला जवळ ओढले. सैरंध्रीने जोरात हिसडा मारून त्याच्यापासून स्वत:ची सुटका करून घेतली आणि ती दूर पळाली. सर्व दासींमध्ये मिसळून गेली. कीचक दूरवरून तिच्याकडे पहात राहिला.

सैरंध्रीने ही घटना भीमाला सांगितली ''त्याच्याशी सलगी करायची आहे, असे तू एक-दोन दिवस भासव आणि तिसऱ्या दिवशी रात्री त्याला नृत्यशाळेत बोलावून घे आणि मला सांग. मी बघतो काय करायचे ते. तू चिंता करू नकोस.'' असे सैरंध्रीला म्हणजे द्रौपदीला भीमाने सांगितले.

त्यानंतर सैरंध्री कीचकाच्या जाण्यायेण्याच्या मार्गात मुद्दाम त्याच्यासाठीच थांबली आहे असे भासवू लागली. तो जवळ आला तर लाजून त्याच्याशी हळुवार बोलू लागली. एके दिवशी, जवळपास कोणी नाही असे पाहून तिने कीचकाला त्या रात्री नृत्यशाळेत येण्यास सांगितले आणि ती घाईघाईने निघून गेली.

कीचक आनंदाने वेडापिसा झाला. मद्यपान करून सैरंध्रीला आपल्या मिठीत घेण्यासाठी आतुर होऊन नृत्यशाळेत आला. तिथे अंधारात घोंगडी पांघरून भीमाने त्याला आपल्या बगलेत घेतले आणि त्याची मान पिरगाळून ठार मारले. त्यानंतर भीम शांतपणे नृत्यशाळेतून बाहेर पडला आणि पाकशाळेत गेला. दुसऱ्या दिवशी विराट नगरीत हलकल्लोळ झाला. सेनापती कीचकाचा संशयास्पद मृत्यू लोकांच्या चर्चेचा विषय झाला. विराटराजा चिंताक्रांत झाला. सुदेष्णा राणी दु:खी झाली.

पांडवांच्या अज्ञातवासात पडलेली कीचकाची अशुभ छाया भीमाने चतुराईने दूर केली.

प्रश्न:

१) 'कुठल्याही एका गोष्टीत पारंगत असणे पुरेसे नसते. विविध गुण, कला कौशल्य अंगी असावे लागते. कठीण काळात त्यांचा उपयोग होतो,' या विधानाशी तुम्ही कितपत सहमत आहात, चर्चा करा.

२४. दानशूर कर्ण

कर्ण

दानशूरपणाचे वलय लाभलेला कर्ण.

अधिरथपुत्र कर्ण

दुर्योधनाचा परममित्र आणि निष्ठावंत आधारस्तंभ कर्ण.

परशुरामाकडून अमोघ धनुर्विद्येचे शिक्षण घेतलेला कर्ण.

सूर्यदेवाकडून कवचकुंडल मिळाले असल्याने अजिंक्य झालेला कर्ण.

त्या कवच कुंडलामुळेच पांडवांच्या चिंतेचा विषय झालेला कर्ण.

जोपर्यंत ती कवचकुंडले त्याच्याकडे आहेत, तोपर्यंत त्याला कोणीही पराभूत करू शकणार नव्हते.

'ऐनवेळी तुला तुझी धनुर्विद्याही मदत करू शकणार नाही, कारण तू मला ''मी ब्राह्मणपुत्र आहे.' असे असत्य सांगून माझ्याकडून विद्या मिळविलीस.'' असे परशुरामाने त्याला सांगितले, तरीही अजिंक्यच राहिला असा कर्ण.

महारथी कर्ण!

कवच कुंडले सदैव परिधान करणारा कर्ण अजिंक्यच होता. त्याची कवचकुंडले जोपर्यंत त्याच्या अंगावर आहेत, तोपर्यंत तो अजिंक्यच राहणार होता.

पांडवांना त्याचीच भीती होती. त्याने पांडवांना समूळ नष्ट करण्याची प्रतिज्ञा केली होती. आपण अर्जुनाला दिलेले दिव्यास्त्र त्याच्याकडे आहे. हे इंद्रदेवाला माहित होते. तरीही सूर्यदेवाने कर्णाला दिलेली कवच कुंडले काढून घेणे आवश्यक आहे असे त्याला वाटले. इंद्राने त्याचाच विचार करायला सुरुवात केली.

दारी आलेल्या अतिथी ब्राह्मणाला कर्ण कधीही विन्मुख पाठवत नाही, हे इंद्राला माहित होते. ते कर्णाचा पिता सूर्यदेवालाही माहित होते. रोज सकाळी ब्राह्मण कर्णाच्या दारी येत आणि त्यांना जे हवे ते कर्ण देई, हे सूर्यदेवही रोज पहात होताच. सूर्यदेवही ब्राह्मणाचे रूप घेऊन कर्णाच्या दारी त्याला सावध करण्यासाठी आला. त्याने कर्णाला आशीर्वाद दिला. ''तुझ्या दारी इंद्र ब्राह्मणाचे रुप घेऊन येईल. दान म्हणून तुझी जन्मजात कवचकुंडले तुझ्याकडे मागेल. ते तू त्याला देऊ नकोस, राजा, सावध रहा.'' असे सूर्यदेवाने कर्णाला सांगितले. कर्णाने ते

मन:पूर्वक ऐकले. आपल्या पित्याला सूर्यदेवाला त्याने आदरपूर्वक नमस्कार केला. ''गुरुवर, आपण सांगता ते माझ्या कल्याणासाठीच हे मी जाणतो. पण दारी आलेला याचक मी विन्मुख कसा पाठवू? तो जे मागेल ते त्याला देण्यासाठी मी बांधील आहे. भले त्याने माझे प्राण मागितले तरी... क्षमस्व. आपला आशीर्वाद असावा.'' असे कर्णाने त्या ब्राह्मणाला - सूर्यदेवाला नम्रपणे सांगितले.

सूर्यदेवाने कर्णाला सांगितल्याप्रमाणे काही दिवसांनी भल्या सकाळी एक ब्राह्मण कर्णाच्या दारी याचक म्हणून आला. कर्णाने त्याला साष्टांग नमस्कार घातला आणि त्याला 'काय हवे आहे' असे विचारले.



''मला तुमची कवचकुंडले हवी आहेत महाराज. मला ती फारच आवडली आहेत. त्या ब्राह्मणाने कर्णाला सांगितले. कर्णाने ओळखले की हा ब्राह्मण म्हणजे दुसरा-तिसरा कोणी नसून प्रत्यक्ष इंद्रदेवच आहे. तरीही शांतपणे तो म्हणाला, ''अवश्य, माझी कवचकुंडले

आपल्याला आवडली आहेत हे माझे भाग्यच आहे. मी ती तुम्हाला अवश्य देईन. दारी आलेल्या याचकाला तो मागेल ते मी देईन आणि त्याला संतुष्ट करीन देवा.''

''देवा, आज आपण प्रत्यक्ष इंद्रदेव असूनही माझ्या दारी याचक म्हणून आलात हे माझे भाग्यच आहे. मी आपल्याला माझी कवचकुंडले आताच काढून देतो. आपण मला त्यासम दुसरी काही अमोघ शक्ती दिलीत तर मी आपला जन्मोजन्मी ऋणी राहीन, देवेंद्रा.'' असे कर्णाने विनविले. कर्णाने जन्मजात स्वत:च्या अंगावर असलेली कवचकुंडले इंद्राला काढून दिली. तो रक्तबंबाळ झाला. पण त्याच्या चेहऱ्यावर तेच तेज होते, जे कवचकुंडले काढण्यापूर्वी होते. शिवाय आता त्याच्या चेहऱ्यावर एक अलौकिक समाधानही दिसत होते.

''कर्णा, तुझे दानशूरत्व अलौकिक आहे. मीच तुला वंदन करतो. माझे वैजयंती-अस्त्र आणि त्यामागील सर्व शक्ती मी तुला ह्या क्षणीच देत आहे. तिचा तू केव्हाही, कधीही पण फक्त एकदाच वापर करू शकशील. त्यानंतर ती शक्ती माझ्याकडे परत येईल. 'विजयी भव'.'' इंद्राने संतुष्ट होऊन कर्णाला सांगितले.

कर्णाची कवचकुंडले मिळाली, अर्जुनाचा जय निश्चित झाला म्हणून इंद्र संतुष्ट झाला. प्रत्यक्ष देवेंद्र आपल्या दारी याचक म्हणून आला आणि आपण त्याला विन्मुख परत पाठविले नाही, म्हणून कर्णही संतुष्ट झाला. कवचकुंडलांच्या मोबदल्यात आपल्याला ''वैजयंती'' मिळाली म्हणूनही त्याला बरे वाटले. सर्व काही माहित असूनही कर्णाने आपली जन्मजात कवचकुंडले इंद्राला दिली, जणू आपले जीवन त्याने इंद्राला दान म्हणून दिले. म्हणून कर्ण दानशूरांतला मेरूमणी झाला.

प्रश्न:

१) दान करण्याचा आनंद मोठा असतो, हा आनंद तुम्ही अनुभवला आहे काय?

२) आताच्या काळातील कोणती 'दाने' माहिती आहेत?

२५. श्रीकृष्णाची मदत

पांडवांचा बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास संपला. द्यूतात ठरल्याप्रमाणे आता त्यांना त्यांचे इंद्रप्रस्थ राज्य परत मिळायला हवे होते. ते कौरवांकडून परत मागणे आवश्यक होते. त्यासाठी सर्वांबरोबर विचार विनिमय चालू होता. पांडवांचे साह्यकर्ते राजा द्रुपद, बलराम, श्रीकृष्ण आणि इतर राजे उपस्थित होते. 'आपण कौरवांकडे आपला दूत पाठवावा. राज्याची मागणी करावी' असे ठरले. राजा द्रुपदाने एक वेगळा विचार मांडला. तो म्हणाला, ''दुर्योधन आपले राज्य आपल्याला देणार नाही. तो आपल्याशी युद्ध करेल. आपल्या मदतीसाठी आपण आताच सगळ्या राजांकडे जावे आणि मदत मागावी. माझ्या माहितीप्रमाणे दुर्योधनाने सैन्याची जमवाजमव सुरु केलेली आहे. आपण त्यात मागे राहू नये. विना लढाई, राज्य मिळाले तर उत्तम, पण तसे होईल, असे मला वाटत नाही.'' युद्ध म्हटले, की जेवढा फौजफाटा गोळा करता येईल तेवढा चांगला. आपली बाजू जास्तीत जास्त सबल असावी असे कौरव - पांडव दोघांनाही वाटत होते. द्रुपद राजाने सुचविले त्याप्रमाणे पांडवांनी आपला दूत कौरवांच्या दरबारी पाठविला. मदत मागण्यासाठी सगळे पांडव वेगवेगळ्या राजांकडे गेले. अर्जुन श्रीकृष्णाकडे गेला. अर्जुन श्रीकृष्णाकडे पोहोचला, तेव्हा दुर्योधन श्रीकृष्णाच्या उशाशी बसला होता. श्रीकृष्ण गाढ झोपलेला होता. अर्जुन श्रीकृष्णाच्या पायाशी बसला. श्रीकृष्ण जेव्हा जागा झाला तेव्हा त्याची दृष्टी पायाशी बसलेल्या अर्जुनावर प्रथम पडली. त्याने अर्जुनाची विचारपूस केली. दुर्योधनाने तात्काळ त्याला थांबविले आणि ''श्रीकृष्णा, मी प्रथम आलेलो आहे.'' असे श्रीकृष्णाला सांगितले.

''दुर्योधना, अर्जुना, मला माहित आहे तुम्ही दोघे येथे कशासाठी आला आहात ते. तुम्हाला निवड करायची असेल तर दोनच गोष्टी उपलब्ध आहेत. एक मी आणि दुसरे माझे दहा लाख यादवांचे सैन्य. मी कोणत्याही बाजूने उभा राहिलो तरी हातात शस्त्र धरणार नाही. युद्धात भाग घेणार नाही. तुम्हाला काय हवे ते तुम्हीच ठरवा.''

दुर्योधन काही मागणार, तेवढ्यात अर्जुन म्हणाला, ''देवा तू काया-वाचा-मने आमच्या बाजूला ये. तुझी सेना मला नको. तूही हातात शस्त्र धरू नकोस, आम्हाला फक्त तूच हवा आहेस. तू जिथे असशील तिथे फक्त विजयच असेल. पराजय त्याच्या जवळपासदेखील फिरकणार नाही.''

अर्जुनाचे हे भावनिक मागणे ऐकताच दुर्योधन मोठ्यांदा हसला. ''देवा, आता अर्थातच तुझी दहा लाख यादवसेना माझ्या बाजूने लढेल असे मी गृहित धरतो. दुर्योधन श्रीकृष्णाला खोडसाळपणे म्हणाला आणि मनातला हेतू पूर्ण झाल्याने तो फार आनंदी झाला.



पांडवाचा दूत कौरवांकडे गेला होता, तो परत आला. धृतराष्ट्राने सर्वांचे क्षेमकुशल विचारले होते पण राज्य परत देण्याच्या मागणीवर त्याच्याकडून काहीच प्रतिक्रिया आलेली नव्हती. हे असे काहीसे होईल हे सर्वांना माहित होते आणि युद्ध अटळ आहे ह्याचीही कल्पना होती. पण तरीही पांडवांचा दूत म्हणून कौरवांकडे जाण्याचे कृष्णाने ठरविले. त्याप्रमाणे श्रीकृष्णाने कौरवांकडे निरोप पाठविला आणि तो हस्तिनापुरी कौरवांच्या दरबारात दाखल झाला.

त्याने महाराज धृतराष्ट्राला वंदन केले. पांडवांना इंद्रप्रस्थाचे राज्य नाही पण किमान इंद्रप्रस्थनगरासह इतर चार गावे तरी द्यावीत, कारण सर्व राज्यावर त्यांची समान सत्ता आहे आणि द्यूतातही तसेच मान्य केले गेले होते, ह्याची आठवण करून दिली. पांडवांनी अन्यायाने सोसलेल्या हालअपेष्टा, त्रास, वेदना, फसवणूक, वंचना ह्या सर्व गोष्टी त्याने विस्ताराने

सांगितल्या. धृतराष्ट्र महाराजांनी ह्या सर्व गोष्टींचा विचार करावा आणि आपल्या सख्ख्या भावाच्या मुलांना न्याय द्यावा, अशी त्याने विनंती केली. हे कानी पडताच दुर्योधनाने उन्मत्तपणे सांगितले, की तो पांडवांना काहीही देणे लागत नाही, हे राज्य कौरवांचे आणि कौरवांचेच राहील. ह्या राज्यातील एक तसूभरही जमीन पांडवांना मिळणार नाही.

श्रीकृष्णाने महाराज धृतराष्ट्रांना पुन्हा एकदा विनंती करून हा अन्याय त्यांनी स्वत:हून दूर करावा असे सांगितले. नाहीतर अनर्थकारी युद्ध होईल. कुरु वंश पूर्णत: नष्ट होऊ शकेल असे सांगितले. पण धृतराष्ट्राकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी ''आता युद्ध!'' असे सांगून श्रीकृष्ण बाहेर पडला. पांडवांची बाजू योग्य रितीने मांडून त्याने युद्ध टाळायचा प्रयत्न केला. कौरवांना आपले दशलक्ष यादव सैन्य दिले आणि स्वत: मात्र पांडवांच्या पाठीशी उभा राहिला.

प्रश्न:

१) भांडून, लढून दोन्हीही पक्षांना त्रास होण्याची शक्यता जास्त. म्हणून नेहमी श्रीकृष्णाप्रमाणे समेटाचा, तडजोडीचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. लढाईचा मार्ग अधिक योग्य, का तडजोडीचा?

२) विचारी, चतुर, जाणकार, अनुभवी, ज्येष्ठ अशी व्यक्ती सल्लागार व आधार म्हणून असेल, तर अवघड प्रसंगात ती व्यक्ती आपल्याला योग्य असा यशाचा मार्ग दाखवते. तुम्हीही अशा एखाद्या व्यक्तिबराबेर आपले प्रश्न, विचार बोलून दाखवा व सल्ला विचारा.

३) योग्य उत्तरावर बरोबरची खूण करा.

तुम्हाला जर जबरदस्तीने देश सोडायला भाग पाडले तर...

अ) तुम्हाला हायसे वाटेल

ब) तुम्हाला हायसे वाटणार नाही.

क) आपला हक्क हिरावून घेतल्याचे दु:ख व राग येईल.

ड) तुम्ही कोणत्याही प्रतिक्रिया देणार नाही. 'जे नशिबात होते ते झाले' असे म्हणाल.

२६. कुरुक्षेत्र

पांडवांचे राज्यच काय पण पाच गावेही त्यांना द्यायला दुर्योधनाने साफ नकार दिला. श्रीकृष्णाने युद्ध टाळण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न दुर्योधनाने निष्फळ ठरविले. कौरव-पांडवांचे युद्ध निश्चित झाले. कुरुक्षेत्र ही रणभूमी ठरली. दृष्टद्युम्न पांडवांचा सेनापती झाला तर भीष्म कौरवांचे सेनापती झाले. पांडवांचे सैन्य सात अक्षौहिणी होते. कौरवांचे सैन्य अकरा अक्षौहिणी होते. एक अक्षौहिणी म्हणजे २१,८७० हत्ती, ६५,६१० घोडे व १,०९,३५० पायदळ मिळून होणारे सैन्य.

'युद्धस्य कथा' ऐकण्यापेक्षा प्रत्यक्ष युद्ध चालू असतानाच काय चालले आहे हे धृतराष्ट्राला कळावे म्हणून महर्षी व्यासांनी संजयला 'दूरदृष्टी' दिली. त्यामुळे युद्धभूमीवर काय चालले आहे हे संजयाला प्रत्यक्ष दिसणार होते व तो ते धृतराष्ट्राला सांगू शकणार होता. 'युद्धात ज्या बाजूला धर्म आहे त्या बाजूचा जय होईल' असे भाकित व्यासमुनींनी केले होते. पांडवांचे सर्व सैन्य पायदळ, घोडदळ, गजदल, रथदल, वेगवेगळे योद्धे, अतिरथी-महारथी कौरवांच्या अफाट

सैन्यदळासमोर उभे ठाकले. पांडवांपेक्षा कौरवांचे सैन्य दीडपटीने जास्त होते. कौरवांच्या सैन्यात भीष्म, द्रोण, कृप असे पांडवांचे महागुरु होते.

अर्जुनाचा सारथी झालेल्या श्रीकृष्णाने जेव्हा अर्जुनाचा रथ युद्धभूमीवर आणला तेव्हा अर्जुनाने सर्वांना पाहिले, वंदन केले. पण 'आपल्याच गुरुंना, बांधवांना मारून मिळणारा विजय काय कामाचा?' असा विचार त्याच्या मनात आला, आणि ''मी युद्ध करणार नाही.'' असे त्याने श्रीकृष्णाला सांगितले. श्रीकृष्णाने त्याची मन:स्थिती आणि द्विधा विचार जाणून त्याला कर्माची व्याख्या समजावून सांगितली. ''तू तुझे कर्तव्य कर आणि मला शरण ये. तुझ्यासह आणि तुझ्याविना जे घडायचे आहे ते घडणारच आहे. तू स्वत:ला दोषी समजू नकोस. तू फक्त तुझे कर्तव्य कर.'' असे सांगून कृष्णाने त्याला युद्ध करण्यास प्रवृत्त केले. ह्या विविधांगी उपदेशाला 'भगवद्‌गीता' असे म्हणतात. त्यामुळे अर्जुनाच्या मनात आलेले मळभ व नैराश्य दूर झाले. तो कौरवांसमोर युद्धाला उभा ठाकला.

पण त्याचवेळी युधिष्ठिर आपल्या रथातून खाली उतरला. आपले शिरस्त्राण, शस्त्रे, कवच सर्व काही त्याने रथात काढून ठेवले. अनवाणी चालत चालत तो कौरव सेनेसमोर आला. भीष्माचार्यांसमोर येऊन त्याने त्यांना साष्टांग नमस्कार घातला. त्यांचा आशीर्वाद मागितला. गुरु द्रोणाचार्य, कृपाचार्य ह्या सर्व गुरुंना त्याने एका पाठोपाठ एक वंदन केले. त्यांचे आशीर्वाद घेतले. भीष्म, द्रोण, कृपाचार्य ह्या सर्वांना त्यानं ''गुरुवर आम्ही आपल्याला कसे हरवू शकू?'' असे स्पष्टपणे विचारले. ''मला कसे हरवावे हे मी तुला नंतर वेळ येताच सांगेन.'' असे भीष्माचार्य म्हणाले. ''शोकातिरेक झाला तर मी शस्त्र खाली ठेवेन. मग मला मारणे शक्य आहे.'' असे द्रोणाचार्यांनी त्याला सांगितले.

युधिष्ठिराने नंतर सर्व कौरव वीरांना वंदन केले. ''आमची बाजू सत्याची आहे. धर्माची आहे. योग्य आहे. नीतीची आहे.'' असे सांगितले. त्यामुळे दुर्योधनाचा एक भाऊ - युयुत्सू पांडवांना येऊन मिळाला.

त्यानंतर प्रत्यक्ष युद्धास प्रारंभ झाला. पायदळाच्या पावलांनी आसमंत धुळीने भरून गेला. घोड्यांच्या टापांनी आणि रथाच्या चाकांच्या आवाजाने कुरुक्षेत्रावर आवाजच आवाज झाला. ढाल-तलवार एकमेकांवर आपटू लागले. प्रत्येक योद्‌ध्याने स्वत:चे शंख फुंकले. त्यांच्या आवाजाने केवळ रणभूमीच नव्हे तर सैन्यदळही हादरले. झंझावाती वेगाने दोन्हीकडील सैन्य एकमेकांवर आदळत होते. सू... सू... करत बाण वेध घेत होते. हत्तीही शत्रूच्या सैन्यात

पळत जात होते. सैनिक कोसळत होते, ओरडत होते, मरत होते. चिरडले जात होते. घोड्यावर स्वार असलेले सैन्य वेगात जायचा प्रयत्न करीत होते आणि कोणाच्या तरी बाणाने, भाल्याने धुळीत पडत होते. पहिल्या दिवशीचा उत्साह तर विलक्षण होता. पण तरीही हे युद्ध सूर्योदय ते सूर्यास्त एवढ्या वेळातच चालू राही. सूर्योदय होताच वीरश्रीने भारलेले योद्धे रणांगणावर येत. सूर्यास्त होताच हातघाईची लढाई असली तरी ती जेथे आहे तेथेच थांबवून सर्व योद्धे आपापल्या मुक्कामी परत जात असत.

कुरुक्षेत्री चालू असलेले कौरव-पांडव युद्ध हे एका अर्थी महायुद्धच होते. भारताचे - महाभारताचे - शासक हे कपटी, पाताळयंत्री, शब्दाला न जागणारे, लोकांची पर्वा न करणारे असावेत, की पराक्रमी, सचोटीने वागणारे, जनतेच्या मताची कदर करणारे, सुसंस्कृत बांधव असावेत हेच जणू कुरुक्षेत्र ठरवणार होते.

ह्याच कुरुक्षेत्रावर नंतर झालेल्या युद्धात घटोत्कच मारला गेला. अभिमन्यू मारला गेला. भीष्म, द्रोण, कृप सगळे धारातीर्थी पडले. कर्ण गेला. दुर्योधन गेला. दु:शासन गेला. कौरव सगळे नामशेष झाले. व्यासमुनींनी जसे सांगितले होते तसेच घडले. धर्माचा जय झाला. जवळजवळ १८ अक्षौहिणी सैन्य कुरुक्षेत्री नष्ट झाले. रक्तामांसाचा चिखल तुडवीत पांडवांनी विजय पाहिला. ह्याच कुरुक्षेत्रावर पांडवांची, भीमाची, अर्जुनाची प्रतिज्ञा पूर्ण झाली. अठरा दिवस तुंबळ युद्ध पाहिलेल्या कुरुक्षेत्राने कुंतीला समाधान दिले. कारण इथेच तिच्या पुत्रांनी त्यांच्याच प्रदेशावर नव्हे तर सर्व भारतवर्षावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले.

ह्या कुरुक्षेत्राने सूड पाहिला. प्रेम पाहिले. माया पाहिली. तळमळ पाहिली. तडफड पाहिली. धर्म पाहिला. अधर्म पाहिला. भीती पाहिली. ह्याच कुरुक्षेत्राने भगवद्‌गीतेला जन्म दिला.

प्रश्न:

१) ज्यावेळी कर्तव्य श्रेष्ठ मानले जाते त्यावेळी नातीगोतीही दूर ठेवावी लागतात. तुम्हाला अशी उदाहरणे देता येतील का?

२) भारतीय तत्त्वज्ञान काय सांगते? अंतिम विजय कोणाचा होतो?

२७. भगवद्गीता

महाभारत या महाकाव्याची, म्हणजे खूप मोठ्या काव्याची मध्यवर्ती गोष्ट आहे. ती कौरव आणि पांडव या चुलत भावंडात झालेल्या युद्धाची. हस्तिनापूरचं साम्राज्य कौरवांचंच रहावं, की ते पांडवांना मिळावं यासाठी पांडवांकडून सामोपचाराने अनेक प्रयत्न झाले. श्रीकृष्णाने दोन्ही पक्षांचा समेट घडवून आणण्यासाठी मध्यस्थी केली. पण ती निष्फळ ठरली. युद्ध होणे अटळ झाले.

पांडवांच्या बाजूला त्यांचे मित्रराजे धाऊन आले. तर कौरवांची बाजू घेणारे कौरव सैन्याला मिळाले. कृष्ण हा पांडवांचा सखासोबती. तो तर अर्जुनाच्या रथाचा सारथी म्हणून आला.

युद्धाची सुरुवात मोठी विलक्षण होती. कुरुक्षेत्रावर अठरा अक्षौहिणी सैन्य जमलं. पांडवसेना आणि कौरवसेना म्हणजे दोन्ही बाजूंनी बंधूच एकमेकांविरुद्ध उभे ठाकले. युद्धाला सुरुवात करायचीय हे सैनिकांना कळावं, म्हणून मोठ्याने शंखनाद होऊ लागले. आधी सेनापती, मग अतिरथी - महारथी असे वीर पुरुष शंख वाजवू लागले.

अर्जुनानंही त्याचा देवदत्त नावाचा शंख फुंकला. मग तो सहज कृष्णाला म्हणाला, चल. आपण दोन्ही सैन्याच्या मधोमध जाऊ या. बघू दे तरी, कोण कोण माझ्या शत्रूपक्षात आहेत ते. कृष्णाने तसं केलं. अर्जुन रथात उभा राहिला आणि त्यानं शत्रूसैन्यावर नजर फिरवली आणि त्याच्या पोटात गोळाच आला. त्याला वाटलं, ''शत्रू' म्हणायचं तरी कसं यांना? हे तर माझेच नात्यागोत्याचे लोक. माझी चुलत भावंड, मित्र, मेहुणे, लहान भाचे आणि पुतणे आणि अरे, हे तर माझे आजोबा - भीष्माचार्य. यांच्यावर मी कसे काय बाण सोडणार? अरे बापरे, हे तर माझे गुरु द्रोणाचार्य. यांनीच तर माझा हात धरून मला धनुष्याला बाण लावायला शिकवलं. यांना मी मारणार होतो. केवढं पाप. किती वेडेपणा हा माझा. छे. छे. नकोच ते.''

हात पाय थरथरतायत, तोंडाला कोरड पडलीय. काही सुचेनासं झालंय. असा अगदी भेदरुन गेलेला तो अर्जुन हातातलं धनुष्य खाली टाकून मटकन् खालीच बसला आणि कसेबसे त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले, ''नाही बा मी लढू शकत.'' आणि एकदम सुन्न-खिन्न होऊन गेला तो.

कृष्णाला क्षणभर काही कळेचना. हा एवढा मोठा पराक्रमी अर्जुन असा हातपाय गाळुन काय बसतोय? त्यानं मग अर्जुनाला चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. थोडं रागावला.

थोडा उपदेश केला. एक क्षत्रिय वीर पुरुष म्हणून अर्जुनाचं काय कर्तव्य आहे आणि ते पार पाडताना त्यानं आपल्या भावना कशा दूर सारल्या पाहिजेत. हे सगळं त्यानं अर्जुनाला पटवलं. हा जो सगळा प्रबोधनाचा भाग आहे, त्यालाच भगवद्‌गीता म्हणतात.

एकूण १८ अध्यायात विभागलेल्या गीतेत ७०० श्लोक आहेत. श्लोक म्हटले म्हणजे अर्थातच ते छंदबद्ध असतात. चालीवर म्हणता - गाता येतात. जे गाता येतं ते गीत. तशी ही गीता आणि ती साक्षात भगवान श्रीकृष्णानं सांगितली म्हणून तिचं नाव पडलं भगवद्‌गीता. आजही गीतापठण फार मोठ्या प्रमाणात चालतं आणि ते काही फक्त भारतातच होतं, अशातला भाग नाहिये, तर जगभर गीता म्हटली जाते, तिचा अर्थ लावला जातो, तिच्यातलं तत्त्वज्ञानही वाचलं जातं.

साधारण पाच हजार वर्षांपूर्वी लिहिलेली गीता आजही जगाच्या कानाकोपऱ्यात पोचून मानाचं स्थान मिळवते आहे. म्हणजे काहीतरी वेगळं, महत्त्वाचं आणि आपल्या सगळ्यांना

उपयोगी पडेल असं ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञान गीतेत असलंच पाहिजे, एवढं मात्र नक्की. काय सांगते गीता नेमकं? गीता कृष्ण-अर्जुन यांचा संवादरुपी ग्रंथ आहे. त्यात भक्तियोग, ज्ञानयोग, विज्ञानयोग, कर्मयोग इत्यादींची चर्चा विस्ताराने केली आहे.

कृष्ण सर्वात आधी अर्जुनाला सांगतो, त्याला कर्मयोग म्हणतात. नाव अवघड वाटलं. तरी तो आचरणात आणणं अगदीच सोपं आहे. प्रत्येकाने आपापलं कर्तव्य नेटानं आणि नेमकेपणाने करत रहायचं; खरं तर, तसं ते प्रत्येकानं केलंच पाहिजे. अर्जुन कोण आहे? एक योद्धा. मग रणांगणावर 'मरु किंवा मारु' या निर्धाराने युद्ध करणं हे त्याचं कर्तव्यच आहे. ते त्यानं केलंच पाहिजे. त्यापासून पळून जाऊन चालणार नाही हा कर्मयोगाचा सिद्धान्त आणि त्यातलं तत्त्वज्ञान जगातील सर्व तत्त्वज्ञांनी आणि विचारवंतांनी अभ्यासले आणि स्वीकारले आहे. महाराष्ट्रात तेराव्या शतकात गीतेचे तत्त्वज्ञान जनसामान्यांना कळावे म्हणून संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. हा ग्रंथ ७०० वर्षे महाराष्ट्रात बहुजनांपासून विद्वानांपर्यंत सर्वमुखी झाला. आधुनिक काळात आचार्य विनोबांनी 'गीता' गीताईच्या रुपाने अतिशय सोप्या मराठीमध्ये भाषांतरित केली.

प्रश्न:

१) विद्यार्थी म्हणून तुमचे कर्तव्य काय?

अ) शाळेत जाऊन शिकणे, ब) टीव्ही पहाणे, क) मन लावून अभ्यास करणे, ड) मित्रांबराबेर निरर्थक भटकणे. इ) परीक्षा देत प्रगती करणे.

२) जोड्या लावा : समाजातल्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्यकर्म काय?

शिक्षक	समाजसेवा	डॉक्टर	साफसफाई
समाजसेवक	टपालसेवा	झाडूवाला	रुग्णसेवा
पोस्टमन	ग्राहकसेवा	दुकानदार	अध्यापन

यालाच कर्मयोग म्हणतात.

२८. चक्रव्यूह

चक्रव्यूह भेदण्याची शक्ती आणि ज्ञान फक्त अर्जुन, अभिमन्यू, कृष्ण आणि दृष्टद्युम्न ह्या चौघांकडेच होते. कृष्ण प्रत्यक्ष युद्धात भाग घेणार नव्हता, घेतही नव्हता. अर्जुनाला तेथून दूर नेले तर अधिक बरे असे कौरवांनी ठरविले. त्या योद्ध्यांनी ठरवल्याप्रमाणे एकत्रितरित्या अर्जुनावर चाल केली आणि त्याला मुख्य युद्धभूमीपासून दूर नेले.

द्रोणाचार्यांनी आपली सैन्यरचना चक्रव्यूहात्मक ठेवली, जेणेकरून कोणीही योद्धा सहजरीत्या त्या सैन्याला पराभूत करून आत शिरू शकत नव्हता. चुकून माकून एखाद्या वीराने आत प्रवेश केलाच, तर तो परत फिरू शकत नसे एवढी घट्ट विणीची ती सैन्यरचना असे. जसजसा एखादा शत्रूसैनिक चक्रव्यूहात आत आत जाई, तसतसा त्याच्याभोवती सैनिकांचा वेढा पडत असे. त्यानंतर त्याचे नखही दृष्टीस पडत नसे. ही व्यूहरचना शत्रूचे जास्तीत जास्त नुकसान करी आणि त्याला जागच्या जागी थोपवून धरी.

युद्धाच्या तेराव्या दिवशी द्रोणाचार्यांनी ही व्यूहरचना केली तेव्हा युधिष्ठिर आपले सैन्य घेऊन पुढे आला पण चक्रव्यूह कसा भेदायचा हे त्याला माहित नव्हते. त्याच्याबरोबर अभिमन्यू होता. युधिष्ठिराने त्याला 'चक्रव्यूह भेद' अशी आज्ञा केली. ''काका, मला फक्त चक्रव्यूहात शिरता येते, पण चक्रव्यूहातून बाहेर कसे पडावे हे मात्र माहित नाही.'' असे अभिमन्यूने युधिष्ठिर काकाला सांगितले. आपला पुतण्या, अर्जुनाचा पुत्र असे म्हणत आहे आणि त्याला पूर्ण शक्तीनिशी सहाय्य केल्याशिवाय आपण हा चक्रव्यूह भेदू शकणार नाही. पुढे सरकू शकणार नाही ह्याची युधिष्ठिराला पूर्ण कल्पना होती. अभिमन्यूच्या पाठोपाठ त्यानेही चक्रव्यूहात प्रवेश केला.

मुखाशीच द्रोणाचार्य होते. अभिमन्यूने एका तडाख्यात त्यांचा पराभव केला आणि तो चक्रव्यूहात शिरला. त्याच्या पाठोपाठ चारही पांडव, सात्यकी, दृष्टद्युम्न हेही चक्रव्यूहात शिरले. अभिमन्यू वेगाने चक्रव्यूहाच्या मध्यस्थानी जात होता. पांडव, सात्यकी आणि दृष्टद्युम्न हे कौरव सेनेची दाणादाण उडवत त्याच्या मागोमाग जात होते. जयद्रथाने मारलेला एक बाण मात्र ही परिस्थिती अचानक बदलून टाकणारा होता. भगवान शंकराने जयद्रथाला एक वर दिला होता. त्याचे स्मरण करूनच जयद्रथाने तो बाण अभिमन्यूचा रथ आणि मागोमाग येणारे पांडव ह्यांच्या मध्यस्थानी मारला होता. त्यामुळे तो बाण ओलांडून जाणे पांडवांना शक्य होत नव्हते.

परिणामी अभिमन्यू एकटाच पुढे पुढे जात होता. युधिष्ठिराने दिलेल्या वचनाप्रमाणे पांडव त्याच्या मागोमाग जाऊ शकत नव्हते. त्याचे संरक्षण करू शकत नव्हते आणि अभिमन्यू तर चक्रव्यूह भेदून त्याच्या मध्यावर केंद्रस्थानी पोहोचला होता. त्याने कर्णाचा रथ मोडला आणि कर्णाला खाली उतरून लढावे लागले. त्याने दु:शासनाला बेशुद्ध केले. त्याने दुर्योधनाचा पराभव केला. अभिमन्यू लीलया सगळ्यांशी लढत होता. विजयी होत होता. द्रोणाचार्य हे सहन करू शकत नव्हते. त्यांनी कृपाचार्य, अश्वत्थामा, कर्ण, बृहद्‌बल आणि कृतवर्मा या सर्वांना एकत्र केले. या सहाही जणांनी अभिमन्यूवर हल्ला केला. अभिमन्यू त्या सर्वांना अगदी सहजपणे तोंड देत होता. पण कर्णाने त्याचे धनुष्य तोडले, कृपाचार्यांनी त्याचा सारथी मारला, कृतवर्म्याने त्याचे रथाचे घोडे मारले, अभिमन्यू त्याही परिस्थितीत हातात ढाल-तलवार घेवून खाली उतरला. पण गुरु द्रोणाचार्यांनी त्याची तलवार मोडली. त्याच्या ढालीचे तुकडे तुकडे होतील अशाप्रकारे कर्णाने त्याच्यावर शरसंधान केले. अभिमन्यूने रथाचे चाक हातात घेवून त्यांच्यावर प्रतिहल्ला केला. चाक मोडले. त्याचे तुकडे तुकडे झाले.

अभिमन्यूने गदा हातात घेतली. अश्वत्थाम्याचा पराभव केला. दु:शासनाच्या मुलाबरोबर त्याचे द्वंद्व झाले आणि दोघेही एकमेकांच्या प्रहारामुळे बेशुद्ध झाले. दु:शासनाचा मुलगा दौ:शासनी पहिल्यांदा शुद्धीवर आला. त्याने बेशुद्ध अभिमन्यूच्या डोक्यावर गदेचे प्रहार केले. अभिमन्यूचे डोके छिन्नविछिन्न झाले. सहा रथी-महारथी चारी बाजूंनी उभे होते. पांडवांचे गुरुही त्यातच उभे होते. त्या सगळ्यांच्या समोर कोवळ्या वयाच्या अभिमन्यूने प्राण सोडला. अभिमन्यू मेला. त्याबरोबर सर्व कौरवांनी विजयनाद केला.

ऐन विशीत चक्रव्यूह भेदून त्याच्या केंद्रापर्यंत पोहोचलेला अभिमन्यू आपल्या अलौकिक पराक्रमाने तळपणारा अभिमन्यू. द्रोणाचार्य, कृपाचार्य, दुर्योधन, कर्ण, अश्वत्थामा ह्या सर्वांना पराभूत करणारा अभिमन्यू ह्या सर्वांच्या उपस्थितीत दु:शासनाच्या पुत्राने बेशुद्ध अवस्थेत एकाकी असलेल्या अभिमन्यूच्या डोक्यात गदेचे प्रहार करून त्याला मारले. कौरव-पांडव ह्यांच्या कुरुक्षेत्रावर झालेल्या महायुद्धात वीर ठरला, तो एकमेव अभिमन्यू.

प्रश्न:

१) स्वत:हून ज्येष्ठ श्रेष्ठ असे वीर समोर असताना न डगमगणारा, सर्व शस्त्रांचा उपयोग करून शेवटच्या क्षणापर्यंत लढणारा आणि लढाई अर्ध्यावर न सोडणारा अभिमन्यू युद्धात कोण ठरला?

२) अधर्माने, कट रचून अभिमन्यूला एकटे पाडले व त्याचे प्राण घेतले. हे कृत्य कौरव वीरांना शोभले का?

३) आजच्या काळात अन्यायाने वागलेल्या प्रसिद्ध व्यक्तीचे उदाहरण देता येईल का?



२९. कर्णाचा पराभव

भीष्म गेले, अभिमन्यू गेला. द्रोणाचार्य गेले. इतर अनेक राजे - महाराजे आणि लक्षावधी सैनिकही गेले. युद्धाला एव्हाना पंधरा दिवस झाले होते. कौरवांचे मोहरे एका मागून एक धारातीर्थी पडत होते. द्रोणाचार्य गेल्यावर महारथी कर्ण कौरवांचा सेनापती झाला. सोळाव्या दिवशी त्याने दुर्योधनाला संपूर्ण विजय मिळवून देण्याचे वचन दिले. पण सोळाव्या दिवशीही कर्णाच्या अधिपत्याखाली कौरवांच्या हाती यश आले नाही.

''श्रीकृष्ण अर्जुनाचा सारथी आहे. मलाही तेवढाच कुशल सारथी हवा.'' असे कर्णाने दुर्योधनाला सांगितले. ''शल्यराजाने माझे सारथ्य करावे असे मला वाटते. तो माझा सारथी होऊ दे आणि मग माझा पराक्रम पहा.'' असेही त्याने दुर्योधनाला म्हटले. हे एकून संतापलेल्या शल्यराजाला दुर्योधनाने मोठ्या मिनतवारीने कर्णाचे सारथ्य करण्यास राजी केले. कट्टर शत्रू अर्जुनाच्या शोधात कर्ण निघाला.

अर्जुनही कर्णाच्या शोधात युद्धभूमीवर फिरत होताच व वाटेत आलेल्या कौरव सैन्याचा पराभव करीत तो पुढे सरकत होता. कर्णाजवळ जायचा प्रयत्न करीत होता. कर्णाचा मुलगा वृषसेन मध्ये येताच अर्जुनाने एका बाणात त्याचे शिर आकाशात उडविले. कर्ण संतापला. आपल्या डोळ्यादेखत अर्जुनाने वृषसेनाला मारले हे त्याला सहन झाले नाही. त्याने आपल्याजवळील अमोघ अस्त्रे वापरली. अर्जुनाने ती सर्व निष्प्रभ केली. संतापलेल्या कर्णाने आपल्या सारथ्याला - शल्यराजाला - अर्जुनाच्या रथाजवळ आपला रथ वेगाने न्यायला सांगितले. त्या वेगात त्याच्या रथाचे चाक जमिनीत अडकले. ते बाहेर काढण्यासाठी कर्ण रथाखाली उतरला. त्याने अर्जुनाला बाण सोडू नकोस, तो अधर्म होईल असे ओरडून सांगितले.

श्रीकृष्ण अर्जुनाचा सारथी होता. त्याने अर्जुनाला ''बाण सोड'' असे सांगितले. ''अधर्माला अधर्माने मारण्यात कुठले पाप?'' असा उपदेश केला. अभिमन्यू मूर्च्छित होता तेव्हा ह्या कर्णानेच दौ:शासनाला अभिमन्यूला मारायला सांगितले. ह्याची आठवण श्रीकृष्णाने अर्जुनाला करून दिली. कर्ण काकुळतीने श्रीकृष्णाची विनवणीच करत होता. ''कृष्णा, मी नि:शस्त्र आहे, मी एकाकी उभा आहे. जमिनीवर राहून मी माझ्या रथाचे जमिनीत रुतलेले चाक बाहेर काढीत आहे. तोवर थांब कृष्णा.''

अर्जुन, बाण सिद्ध करून तयारीत होता. ''अर्जुना, अरे ह्या कपटी कर्णाचे काय ऐकतोस? सोड बाण. मार ह्या स्वार्थी, अधर्मी कर्णाला.'' असे श्रीकृष्णाने पुन्हा एकवार अर्जुनाला सांगितले. अर्जुनाचा पहिला बाण सुटला. त्याने कर्णाच्या रथावरील कर्णाचा ध्वज उडाला आणि खाली पडला. अर्जुनाने दुसऱ्या बाणाने कर्णाच्या डोक्यावरील छत्र उडविले. आपल्या प्रिय पुत्राचे-अभिमन्यूचे त्याने स्मरण केले. भीष्म, द्रोण, कृप ह्या सर्व गुरुंचे स्मरण केले आणि त्याने तिसरा बाण सोडला. तिसऱ्या बाणाने कर्णाचे डोके आकाशात उंच उडाले.

सूर्यास्त होत होता. त्या दिवशीचे युद्ध समाप्त होत होते. त्याबराबेर कर्णाचा अद्वितीयपणाही समाप्त झाला होता. परशुरामाने कर्णाला दिलेला शाप प्रत्यक्षात आला होता. इंद्राने कर्णाचे

कवच कुंडल आधीच काढून घेतले होते. उरले होते ते कर्णाचे निष्प्राण, मस्तकहीन कलेवर. जणू दुर्योधनाचे युद्धच निष्प्राण होवून पडले होते.

त्याच दिवशी इतरत्र भीमानेही दु:शासनाला मारून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली होती. त्याने त्याचबरोबर दहा कौरवांनाही यमसदनाला पाठविले.

युद्धाच्या सतराव्या दिवशी कर्ण गेला. कर्णाचा पुत्र वृषसेन कर्णासमोर मृत्यु पावला. दु:शासन गेला. इतर अनेक कौरव गेले.

कर्ण पांडवाचा कट्टर शत्रू होता. त्याने दुर्योधनाच्या प्रेमापोटी ते शत्रुत्व केले होते. पण तो कौरवांचा सेनापती होता. दुर्योधनाचा पाठीराखा होता. त्याचा आधारस्तंभ होता. तोच कोसळून पडला. दुर्योधन तर ते ऐकून मोडूनच पडला. कर्ण गेला. युद्ध संपल्यातच जमा झाले होते.

प्रश्न:

१) शौर्य असूनही शेवटी कर्ण का पराभूत झाला?



३०. युद्ध संपले

अठरावा दिवस उजाडला. शल्यराजा कौरवांचा सेनापती झाला. बरेचसे कौरव आधीच मारले गेले होते. पंडुपुत्र सहदेवाने कर्णाचे उरलेले सातही पुत्र मारले. दृष्टद्युम्नाने दुर्योधनाचे आणखी अकरा भाऊ यमसदनाला पाठविले. युधिष्ठिराने शल्यराजाला मारले. भीमाने सुदर्शनाला मारले. शकुनीचा वध सहदेवाने केला. कौरव सैन्याची वाताहत झाली. ते पाचोळ्यासारखे उडून गेले, पळून गेले. पळून जाणाऱ्यांत प्रमुख होते दुर्योधन, कृप, अश्वत्थामा, कृतवर्मा आणि संजय. कौरवांचे जवळ जवळ अकरा अक्षौहिणी सैन्य आणि त्यांचे अनेक मदतनीस राजे-महाराजे ठार झाले होते. त्यांचा संपूर्ण पराभव झाला होता. पांडव संपूर्ण विजयी झाले होते. धर्माचा विजय झाला होता.

शेवटच्या टप्प्यात दुर्योधन पळाला. थकला भागला दुर्योधन, पराभूत दुर्योधन एका सरोवराच्या तळाशी योगक्रियेने विश्रांती घेत पडला. युद्धाचे मूळ तोच होता. त्याला मारणे पांडवांना क्रमप्राप्तच होते. त्याशिवाय 'संपूर्ण विजय' मिळाला असे म्हणणे शक्य नव्हते.

युधिष्ठिर, कृष्ण आणि पांडवसैन्य सरोवरापाशी आले. त्यांनी दुर्योधनाला हाका मारून युद्धाचे आमंत्रण दिले. मी एकाएकाशी क्रमाने युद्ध करीन आणि तुम्हा सर्वांना मारीन, असे सांगत दुर्योधन तळ्यातून बाहेर आला.

दुर्योधन आणि भीमाचे गदायुद्ध सुरु झाले. दुर्योधन पराभवाचा वचपा काढण्यासाठी प्राणपणाने लढत होता. भीम त्वेषाने त्याला मारण्यासाठी झुंज देत होता. दुर्योधन चपळ होता. भीम शक्तीचे प्रतीक होता. श्रीकृष्णाने भीमाला मांडीवर थाप मारल्याची खूण केली. भीमाचा घाव चुकवणाऱ्या दुर्योधनाची मांडी भीमाच्या गदेच्या प्रहारात सापडली. दुर्योधनाच्या मांडीचा चुराडा झाला. दुर्योधन प्राणांतिक वेदनांनी खाली कोसळला. पांडव सैन्य आपल्या शिबीरात परत गेले. पण श्रीकृष्णाने पांडवांना शिबिरात राहू दिले नाही. ते नदीकाठी राहिले.

वेदनांनी तळमळणाऱ्या दुर्योधनाने अश्वत्थाम्याला सेनापती केले आणि त्याच्याकडून पांडववधाचे वचन घेतले. अश्वत्थाम्याने पांडवांना रात्री झोपेतच मारावे अशी योजना आखली. कृप आणि कृतवर्मा यांनी रात्री पांडवांच्या शिबिरात शिरकाव केला. अश्वत्थाम्याने दृष्टद्युम्नाचा वध केला. द्रौपदीच्या पाच पुत्रांना झोपेतच मारले. अश्वत्थामा योगबळाने अदृश्य रुपात होता. तो शिबिरातील सर्व पांडव योद्ध्यांना मारत होता. पळून जाणाऱ्या पांडव



सैन्याला कृप आणि कृतवर्मा मारत होते. अश्वत्थाम्याने मनाशी ठरवले होते त्याप्रमाणे पांडवांचा सूड घेतला. त्याने दुर्योधनाला हे सर्व सांगितले. दुर्योधनाने समाधानाने प्राण सोडला. अश्वत्थामा, कृतवर्मा आणि कृप निघून गेले.

सकाळी उठताच पांडवांच्या शिबिरात दिसली ती फक्त अतोनात प्राणहानी. पांडव, द्रौपदी दु:खातिरेकाने वेडे झाले. ''अश्वत्थामा मेल्याशिवाय मी पाणीही ग्रहण करणार नाही.'' असे द्रौपदीने निक्षून सांगितले. पांडव अश्वत्थाम्याच्या शोधात निघाले. दर्भाच्या वस्त्रात, ऋषीमुनींच्या मेळाव्यात बसलेला अश्वत्थामा त्यांनी शोधून काढला आणि त्याला युद्धाचे आव्हान दिले. अश्वत्थाम्याने ब्रह्मशिरस अस्त्राने मंत्रित केलेला दर्भ ''अपांडवाय - पांडवांचा नाश होवो,'' असे म्हणून हवेत सोडला. अर्जुनानेही ब्रह्मशिरस अस्त्र सोडले. ह्या दोन्ही अस्त्रांच्या प्रभावाने सर्व सृष्टीच नष्ट होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. व्यासमुनी आणि नारदमुनी तेथे प्रकट झाले आणि त्या दोघांनाही ब्रह्मशिरस अस्त्र मागे घ्यायला सांगितले. अर्जुनाने सोडलेले अस्त्र मागे घेतले. अश्वत्थाम्याला ते शक्य झाले नाही. म्हणून त्याने ते ब्रह्मशिरस अस्त्र सर्व पांडव स्त्रियांच्या गर्भाशयात सोडले. पांडवांची पुढची पिढी जन्मण्यापूर्वीच नष्ट झाली.

ह्या हीन कृत्याचा सर्वच पांडव, व्यास व नारदमुनी यांनी धि:कार केला. शक्तिपात झालेला अश्वत्थामा गलितगात्र होऊन पडला. त्याच्या मस्तकावर असलेला दिव्य मणी श्रीकृष्णाने काढून घेतला. 'अश्वत्थामा जराजर्जर होऊन हजारो वर्ष रानोमाळ हिंडत राहील, पण त्याला मुक्ती मिळणार नाही' असा श्रीकृष्णाने शाप दिला. युधिष्ठिराने तो मणी द्रौपदीला दिला. ''अश्वत्थाम्याचा सूड घेतला आहे तो आता मेल्यातच जमा झाला आहे. हा त्याच्या डोक्यावर असलेला जन्मजात मणी काढून आणला आहे. आता तू शोक आवर.'' असे त्याने द्रौपदीला विनवले. द्रौपदीने तो मणी युधिष्ठिराला परत दिला.

आता युद्ध सर्वार्थाने संपले.

अश्वत्थाम्याच्या कृत्यांनी पांडवांची प्रत्यक्ष युद्धात झाली नव्हती, तेवढी हानी झाली. ज्या कपटीपणाने युद्ध पांडवांवर लादले गेले, त्याच कपटीपणामुळे हे कौरव-पांडव युद्ध संपले.

प्रश्न:

१) सूडाच्या भावनेमुळे काय होते?

३१. अश्वमेध

कौरव-पांडव युद्ध संपले. कौरव तर सगळेच नष्ट झाले. पांडवांचीही अपरिमित हानी झाली. द्रौपदीचे पुत्र मारले गेले. अभिमन्यूही मारला गेला. आता त्याची पत्नी उत्तरा गर्भवती होती. तेवढाच काय तो पांडवांचा वंश चालू रहावा ह्यासाठी आशेचा किरण होता. युद्धानंतर पांडव हस्तिनापुरी आले. धृतराष्ट्र आणि गांधारीला भेटले. आपले सर्व पुत्र मेल्यामुळे दोघेही अपार शोकाने वेडे झाले होते. गांधारीने संतापाने, 'कृष्णा, तुझा सर्व यादव वंश नष्ट होईल.' असा शाप दिला.

'पांडवांनी धृतराष्ट्र महाराज आणि गांधारी देवीला त्यांनी हस्तिनापुरच्या राजवाड्यातच रहावे' असा आग्रह केला. त्यानंतर सर्व पांडव आपल्या मातेला-कुंतीला भेटले. तेरा वर्षांनी त्यांची भेट होत होती. कुंतीने आपल्या सर्व पुत्रांना जवळ घेतले. तिचे सुरकुतलेले हात सर्वांच्या चेहऱ्यावरून, अंगाखांद्यावरून फिरले. कुंतीला उभारी आली.

सर्वांच्या साक्षीने, वेदमंत्राच्या घोषात युधिष्ठिराला राज्याभिषेक झाला. भीमाने त्याच्या रथाचे सारथ्य केले. अर्जुनाने त्याच्या मस्तकावर छत्र धरले. नकुल आणि सहदेव हे चवऱ्या ढाळीत उभे राहिले सुवर्ण रथात बसून आपल्या प्रिय बंधूंच्या समवेत द्रौपदीसह युधिष्ठिराने आपल्या राजधानीत-हस्तिनापुरात प्रवेश केला.

त्यानंतर सर्वजण भीष्माचार्यांच्या दर्शनास गेले. भीष्म शरपंजरी होते. ते युद्धातून केव्हाच बाजूला गेले होते. पण ते इच्छामरणी असल्यामुळे अजुनही जीवित होते. युद्धाच्या दहाव्या दिवसापासून ते उत्तरायणाची वाट पहात शरपंजरी पडून होते. उत्तरायण सुरु होण्यास छपन्न दिवस होते. ह्या काळात भीष्माचार्यांनी युधिष्ठिराला राज्य चालविण्यासाठी आवश्यक अशा विविध विषयांवर राजनीति, धर्म, राजधर्म, क्षत्रियधर्म, आश्रमव्यवस्था याबद्दल मार्गदर्शन केले. उत्तरायण सुरु होताच त्यांनी सर्वांचा निरोप घेतला. श्रीकृष्णचरणी आपल्या काया-वाचा-मनाने ते एकाग्र झाले. श्रीकृष्णाने त्यांना वंदन करून सांगितले. ''गुरुवर, आपण मुक्त झाला आहात.'' त्याचक्षणी त्यांच्या मस्तकातून एक तेजोगोल बाहेर पडला आणि भीष्मांची चेतना आकाशात विलीन झाली. शरपंजरी राहूनही त्यांचे सर्व ज्ञान त्यांनी युधिष्ठिराला दिले होते.

युधिष्ठिर राजकारभार करीत होता. सर्व पांडव त्याच्या आज्ञेप्रमाणे वेगवेगळी कामे पार पाडत होते. अभिमन्यूची गर्भवती पत्नी उत्तरा हिचा पुत्र पांडवांचा उत्तराधिकारी होता. पण प्रसूत होताच तिने जन्म दिला तो एका मृत मुलाला. अश्वत्थामाचे ब्रह्मशिरस अस्त्र त्यानं पांडव स्त्रियांच्या गर्भाशयात सोडले होते. त्यामुळे पांडवांचा वंश पुढे चालणार नव्हता. मृत अर्भक पहाताच सर्वांच्या शोकाला पारावार राहिला नाही. सर्व पांडवस्त्रिया आणि पांडव शोकाकुल झाले. त्यावेळी श्रीकृष्ण पुढे आला. त्याने डोळे मिटले आणि शांतपणे तो सर्वांना आणि निसर्गसृष्टीला उद्देशून म्हणाला, ''मी जर कधीही अधर्माने वागलो नसेन, सत्याचा पाठपुरावा केला असेल, सर्वांप्रती न्याय्य भूमिका घेतली असेल तर हे मृत मूल पुनर्जिवित होवो. त्याच्यावर झालेला ब्रह्मशिरस अस्त्राचा परिणाम नष्ट होवो.''

त्याचे हे बोलणे संपते न संपते, तोच ते मृत अर्भक रडू लागले. सर्व पांडव कुळाचे रक्षण करणारा म्हणून त्याचे नाव 'परीक्षित' असे ठेवण्यात आले.

त्यानंतर व्यासमुनींनी सांगितले, त्याप्रमाणे अश्वमेघ यज्ञाची तयारी सुरु झाली. दिग्विजय मिळवण्यासाठी अर्जुन अश्वमेधाच्या घोड्यासह गेला. युधिष्ठिराच्या वर्चस्वाची साक्ष म्हणून अश्वमेध यज्ञ यथावकाश पार पडला. युधिष्ठिर राजाधिराज झाला.

पांडवयुगाची सुरुवात झाली. बारा वर्षांचा वनवास संपला. एक वर्षाचा अज्ञातवास संपला. युद्ध संपले. विजयाची पताका फडकत राहिली.

प्रश्न:

१) अन्यायाने आणि अधर्माने वागण्याचा परिणाम काय होतो? तुम्हाला याचा अनुभव आला असल्यास मित्र-मैत्रिणींशी चर्चा करा.

२) श्रीकृष्णाचा कोणता असा गुण होता ज्यामुळे मृत बालकही (परीक्षित) जिवंत झाले?



३२. श्रीकृष्णायन

श्रीकृष्ण पांडवांचा मामेभाऊ, पांडव त्यांचे आतेभाऊ. पण तो त्यांचा भाऊ म्हणून त्यांच्या आयुष्यात आला नाही. आला तो त्यांचा साह्यकर्ता म्हणूनच. त्याने केवळ पांडवांनाच साह्य केले असेही नाही. अनेक अन्यायी असुरांनी, राजांनी अधर्म सोडून धर्माने, सदाचाराने, न्यायाने वागावे म्हणून त्याने प्रयत्न केले. आपण कोणतीही गोष्ट का करावी, त्याचे काय परिणाम होतात, त्यापासून होणाऱ्या त्रासाचे निवारण आपण कसे करावे, आपले कर्तव्य आपण करावे, हेच त्याने पांडवांना सांगितले. युधिष्ठिराने आपले राज्य उत्तम ठेवले आणि त्याचे श्रीकृष्णाबरोबर सख्य होते. त्यामुळे यादव साम्राज्यही सुखनैव होते. वाद, भांडणे व युद्ध ह्यापैकी काहीच तेथे नव्हते. यादवांना वाटू लागले की आपणच सर्वश्रेष्ठ. ते उन्मत्त झाले. एकमेकांना पाण्यात पाहू लागले. आपआपसात वाद व भांडणे सुरु झाली. एकदा यादव सैन्य आणि नागरिक सर्वच प्रभास क्षेत्री जमले. उत्सव साजरा करावा, हा हेतू होता. पण उत्साहाच्या भरात सर्वांनी यथेच्छ सुरापान केले. शब्दाने शब्द वाढला, भांडणे झाली. मारामारी झाली. शस्त्रास्त्रे निघाली आणि सर्वांनी जणू युद्धच सुरु केले. एकमेकांवर प्रहार झाले आणि परिणामत: सर्व यादव ठार झाले.

श्रीकृष्णाला हे समजतात तो धावत आपल्या वडील बंधूकडे - बलरामाकडे - गेला. तो कुठे सापडेना म्हणून त्याचा शोध घेतला. बलराम वनात ध्यानस्थ बसलेले होते. पण कृष्ण तेथे पोहोचताच बलरामांनी योगक्रियेने आपले प्राण विसर्जित केले. आपल्या वडील बंधूची ही कृती पहाताच श्रीकृष्णाचे मन चरकले. कुठेही अन्याय होत आहे, हे कानावर येताच नांगर घेऊन त्याचे पारिपत्य करण्यासाठी धावणारा, रागावणारा आपला भाऊ असे काही करू शकेल हे श्रीकृष्णाच्या ध्यानीमनीही नव्हते. पण त्याने ओळखले. यादवकुळ आता संपले आहे. आपले येथील कार्यही संपले आहे. बलरामदादाने तेच तर प्रत्यक्ष करून दाखविले. आता आपणही आपल्या आयुष्याची समाप्ती करायला हवी.

श्रीकृष्णही वनात एका झाडाखाली जाऊन पहुडला. डाव्या पायावर उजवी टाच ठेवून योगनिद्रा करून पहुडला. एका पारध्याला श्रीकृष्णाचे हे पाय हरणाच्या पायासारखे दिसले. त्याने नेम धरून एक बाण मारला तो नेमका श्रीकृष्णाच्या उजव्या टाचेत घुसला. पारधी वेगाने पुढे धावला. मेलेले हरिण त्याला ताबडतोब घेऊन जायचे होते. पारधी श्रीकृष्णाजवळ पोहोचल्यावर त्याची चूक त्याच्या लक्षात आली. परंतु श्रीकृष्णाने त्याची समजूत काढली. त्याला अभय दिले. आपल्या शरीरातील सर्व ऊर्जा बाहेर फेकली. खाली उरले ते श्रीकृष्णाचे मर्त्य शरीर. ऊर्जेच्या चेतनेचा स्त्रोत त्याच्या शरीरातून बाहेर पडला. श्रीकृष्णाने त्याचे मूळ रुपातले दिव्य शरीर घेतले. देवदेवतांनी केलेल्या जयघोषात श्रीकृष्ण चराचरात मिसळून गेला. जळी स्थळी काष्ठी पाषाणी असलेला सर्वसाक्षी परमेश्वर झाला. श्रीकृष्णावतार संपला. धर्मांच्या आणि अहिंसेच्या भ्रामक कल्पनात न गुरफटता आपल्या अंगी असलेले सुप्त, अलौकिक सामर्थ्य आपण ओळखावे आणि लोककल्याणासाठी आपले जीवन निरपेक्षपणे व्यतीत करावे, हीच त्या चैतन्यरुपी श्रीकृष्णाची शिकवण असावी.

प्रश्न:

१) तुमच्या अंगी कोणते सामर्थ्य आहे, याचा विचार करा आणि त्याचा जीवनात उपयोग करण्याचा प्रयत्न करा.